सोलापूर तरुण भारत
आसमंत



# याचना नहीं, रण होगा...

**रणांगण**
**प्रतिनिधी**

भारतीय लष्कर, हवाईदल आणि नौदलाच्या डायरेक्टर जनरल-ऑपरेशन या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सोमवारी दुपारी पत्रकार परिषदेस संबोधित केले. पत्रकार परिषदेच्या प्रारंभीच भारताने पाकिस्तानची कशी दाणादाण उडवली, हे दाखवणारी एक चित्रफीत दाखवण्यात आली. त्या चित्रफितीस पार्श्वसंगीत दिले होते ते, राष्ट्रकवी रामधारी सिंह दिनकर यांच्या 'कृष्ण की चेतावनी' या अजरामर काव्याचे. 'जब नाश मनुज पर छाता हैं, पहले विवेक मर जाता हैं।' या ओळींसह भारताने पाकसह संपूर्ण जगाला दिलेला संदेश स्पष्ट आहे. त्याचप्रमाणे, यापूर्वी रविवारी सार्वजनिक करण्यात आलेल्या चित्रफितीमध्ये 'शिवतांडव स्तोत्रा'चे पार्श्वसंगीत होते. त्याविषयी विचारले असता एअर मार्शल एके भारती अगदी सहजपणे म्हणाले की, विनय न मानत जलधि जड़, गए तीनि दिन बीति। बोले राम सकोप तब, भय बिनु होइ न प्रीति।।. याद्वारे भारतीय सैन्यदलाने पाकचे कमकुवत लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांच्या जिहादी मानसिकतेवरच प्रहार केला.

भारताच्या 'मोस्ट वॉन्टेड' यादीत असलेले अनेक दहशतवादी मारले गेले. एकाच रात्रीत अनेक दहशतवादी मॉड्यूलचे प्रमुख नष्ट करण्यात आले. दि. ९ आणि दि. १० मे रोजीच्या रात्री प्रत्युत्तर देऊन, भारत अण्वस्त्रधारी देशाच्या हवाई दल तळांना लक्ष्य करणारा पहिला आणि एकमेव देश बनला. तीन तासांत नूर खान, रफीकी, मुरीद, सुक्कर, सियालकोट, पसुर, चुनिया, सरगोधा, स्करू, भोलारी आणि जेकोबाबादसह ११ एअरबेसवर हल्ले करण्यात आले. भारतीय सैन्याने आपल्या प्रलयंकारी कारवाईत पाकिस्तानी हवाई दलाच्या २० टक्के पायाभूत सुविधा नष्ट केल्या.

भारताने पाकिस्तानच्या भोलारी एअरबेसवर हल्ला केला, ज्यामध्ये पाकिस्तानचे स्कॉड्रन लीडर उस्मान युसूफ, चार एअरमन आणि इतरांसह ५०हून अधिक लोक ठार झाले, तसेच पाकिस्तानची लढाऊ विमानेही उद्ध्वस्त केली. त्यामुळे ज्या कारणासाठी 'ऑपरेशन सिंदूर' जाहीर करण्यात आले होते, ते दहशतवादी आणि त्यांच्या आश्रयदात्यांना नेस्तनाबूत करण्याचे ध्येय साध्य झाले.

पाकिस्तानने या लष्करी कारवाईला आपल्या नागरिकांवरील हल्ला म्हणून वर्णन केले परंतु, पत्रकार डॅनियल पर्लचा मारेकरी आणि इतर दहशतवाद्यांच्या मृत्युच्या बातम्या समोर येताच,

> **'ऑपरेशन सिंदूर'मध्ये नेमके काय झाले, कसे झाले, किती प्रमाणात झाले याचे सप्रमाण सादरीकरण भारतीय सैन्यदलाने केल्याने पाकिस्तानची बनवाबनवी संपुष्टात आली. कालपर्यंत थापा मारत विजयाची शेखी मिरवणाऱ्या पाकी पंतप्रधानांचा बुरखा अखेर फाटला. भारताच्या बेधडक कारवाईने पाकिस्तानलाही धडकी भरली असेल, हे नक्की!**

जागतिक स्तरावर पाकिस्तानची बदनामी झाली. हेदेखील स्पष्ट झाले की, जर पाकिस्तानने दहशतवादाला पोसण्याचे आणि संरक्षण देण्याचे धोरण सुरू ठेवले, तर भविष्यात त्याच्या समस्या वाढतील. पाकिस्तान आर्थिक आणि अंतर्गत आघाड्यांवर संघर्षरत असताना या अडचणी वाढतील. भारताच्या राजनैतिक रणनीतीचा दुसरा पैलू खूप महत्त्वाचा आहे. पाकिस्तानने लष्करी कारवाईद्वारे केलेल्या चिथावणीला भारत बळी पडला नाही. भारताने आपले अचूक हल्ले सुरूच ठेवून जगाला यशस्वीरित्या संदेश दिला की, भारताची लढाई पाकिस्तानविरुद्ध नाही तर दहशतवादी संघटनांविरुद्ध आहे. जोपर्यंत पाकिस्तान दहशतवाद्यांना पोसेल, तोपर्यंत भारत असेच प्रत्युत्तर देईल. भारताच्या लष्करी कारवाईनंतर, जागतिक पातळीवरही लक्ष देण्याची गरज आहे. पाकिस्तानला सर्वांत मोठा धक्का म्हणजे, एकाही आखाती देशाने त्याच्या समर्थनात आवाज उठवला नाही. १९९८ साली पोखरण येथे झालेल्या अणुचाचणीनंतर सौदी अरेबियापासून इराणपर्यंत अनेक इस्लामिक देश, त्याच्या समर्थनार्थ उभे राहिले. सौदीने चाचणी होईपर्यंत पाकिस्तानला दररोज ५० हजार बॅरल तेल मोफत देण्याची घोषणाही केली होती. आता, भारताच्या प्रत्युत्तराच्या कारवाईनंतर, तुर्की वगळता एकही इस्लामिक देश त्याच्या समर्थनार्थ उभा राहिला नाही. उलट, रशियासह इतर पाश्चात्य देश प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे भारताच्या समर्थनात उभे राहिल्याचे दिसून आले. राहता राहिला प्रश्न अमेरिकेचा. पाकने अमेरिकेद्वारे भारतास प्रस्ताव पाठवला तर खरा. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांना योग्य त्या शब्दांत भारताची भूमिका समजावून सांगितली. अर्थात, रशिया-युक्रेन, इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्षात ट्रम्प यांनी काय केले ते जगासमोर आहेच. त्यामुळे आता भारत- पाक संघर्षात तरी काहीतरी करून दाखवतो, या उतावीळपणातून शस्त्रसंधी झाल्याचे 'ट्विट' केले आणि पाकने त्यांना अवघ्या तीनच तासांत तोंडघशी पाडले. त्यानंतरही त्यांनी काश्मीर प्रश्नातही मध्यस्थी करतो, अशी दर्पोक्ती केली. यावरून त्यांना केंद्र सरकारच नव्हे, तर भारतातल्या विरोधी पक्षांनीही झोडपून काढले. ट्रम्प यांच्या श्रेयवादाची उरलीसुरली हवा भारतीय सैन्यदलांच्या पत्रकार परिषदेतून निघून गेली.

भारताच्या कृतींमुळे रणनीतीमध्ये प्रतिसादाच्या सिद्धांताचे रूपांतर निर्णायक कृतीच्या सिद्धांतात झाले. 'ऑपरेशन सिंदूर'ने लक्ष्मण रेखा निर्माण केली आहे, जी पाकिस्तान आता दुर्लक्ष करू शकत नाही. जर दहशतवादाला राज्य धोरण बनवले तर त्याला थेट, मजबूत आणि दृश्यमान उत्तर मिळेल. पहिल्यांदाच भारताने दहशतवादी आणि त्यांचे आश्रयदाते यांच्यात कोणताही फरक करण्यास नकार दिला आणि दोघांविरुद्ध एकाच वेळी कारवाई केली.

(पान ४ वर)

# ऑपरेशन सिंदूर आणि भारताची कूटनीती

> **'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून भारताने पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाला चोख प्रत्युत्तर दिले. त्याचवेळी भारताने या कारवाईची महिती देताना, ह संघर्ष वाढवण्यात रस नसल्याचे देखील स्पष्ट केले होते. मात्र, युद्धाची खुमखुमी असलेला पाकिस्तानमुळे आज संर्घष टिपेला पोहचला आहे. या सर्व काळामध्ये भारताची लष्करी ताकद, त्याचा संयम , परराष्ट्रनितीमधील परिपक्वता आणि सामर्थ्याबरोबर असलेला संयम याचेच दर्शन जगाला झाले आहे. या संघर्षाच्याकाळात भारताच्या कुटनितीचा घेतलेला आढावा...**



**वेधक**
**डॉ. रश्मिनी कोपरकर**

काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानातील दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्याच्या उद्देशाने भारताने सुरू केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'ला, आता तीन दिवस पूर्ण झाले आहेत. यादरम्यान भारताने एका जबाबदार आणि सामर्थ्यशाली राष्ट्राची भूमिका निभावली आहे. एकीकडे सामर्थ्यवान तरीही संयमी, कणखर तरीही संतुलित असे भारताचे धोरण म्हणजे विशेष अभ्यासाचा विषय आहे. दहशतवादाविरुद्धची कारवाई आणि स्वसंरक्षण याबरोबरीनेच, सशक्त कूटनीती हादेखील विषय येथे महत्त्वाचा ठरतो. ही भारताच्या नव्या परराष्ट्रनीतीची नांदीच म्हणावी लागेल.

'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने भारत सरकारकडून घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदा याबद्दल खूप काही सांगून जातात, ज्याचे नेतृत्व भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री, तसेच लष्करी अधिकारी विंग कमांडर व्योमिका सिंह आणि कर्नल सोफिया कुरेशी यांनी केले. या परिषदांमधून काही महत्त्वाचे मुद्दे समोर आले. पहिला मुद्दा, यापूर्वीच्या दहशतवादविरोधी कारवायांपेक्षा आताची कारवाई ही मोठी आणि व्यापक स्वरूपाची आहे. यामध्ये पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील एकूण नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यात आले.

दुसरा मुद्दा म्हणजे हा केवळ पहलगाम हल्ल्याचा बदला नसून, गेल्या तीन दशकांमधील सततचे अत्याचार आणि सीमापार दहशतवादी कारवायांना दिलेले एक व्यापक उत्तर आहे. तिसरा मुद्दा, ही दहशतवादी तळांविरुद्धची अचूक, प्रमाणबद्ध आणि परिपक्व कारवाई असून, त्यातून पाकिस्तानी लष्कर किंवा नागरिकांना हानी पोहचवण्याचा भारताचा मानस नव्हता. तसेच, हा संघर्ष वाढवण्याचादेखील भारताचा इरादा नाही, हे सुद्धा पत्रकार परिषदांमध्ये वारंवार नमूद केले.

'ऑपरेशन सिंदूर'मधील प्रतिकात्मकतादेखील येथे अत्यंत महत्त्वाची आहे. पहलगाम हल्ल्यात ज्या महिलांच्या कपाळावरील कुंकू पुसले गेले, त्याचा हिशोब चुकता करणे ही त्यामागील भूमिका होती. तसेच, सांडलेल्या कुंकवाचे चित्र हे या हल्ल्यात सांडलेल्या रक्ताचेसुद्धा प्रतीक आहे. पत्रकार परिषदेतील महिला लष्करी अधिकाऱ्यांचे प्रतिनिधित्व हे त्या महिलांच्या भावनांना दिलेली वाट असून, त्यामधून भारताचे पुरोगामित्व आणि महिला सक्षमीकरणदेखील अधोरेखित होते. परिषदांमध्ये दिसणारा कमालीचा आत्मविश्वास, परिपक्वता आणि परराष्ट्र सचिवांचे मोजके पण प्रभावी भाष्य ही बाब लक्षणीयच. या सुरक्षा आव्हानांच्या काळात भारतीय कूटनीती पणाला लागलेली दिसते. अत्यंत काळजीपूर्वक परंतु, समर्थ आणि सशक्त असे परराष्ट्रधोरण या काळात पाहायला मिळत आहे. एकीकडे भारताची बाजू ठामपणे मांडणे आणि दुसरीकडे पाकिस्तानचे 'खोटे नॅरेटिव्ह' उद्ध्वस्त करणे, असा दुहेरी उद्देश्य यामागे ठळकपणे दिसतो. दि. २२ एप्रिल रोजीच्या पहलगाम हल्ल्यानंतर लगेचच भारताने, पूर्वलक्ष्यी राजनयिक प्रयत्न सुरू केले होते. दहशतवादाचा बळी म्हणून आपल्याकडे असलेला स्वसंरक्षणाचा अधिकार आणि त्याविरुद्धच्या कारवाईची वैधता यामध्ये अभिप्रेत होती. यासंबंधात संपूर्ण जगाला आपल्या पाठीशी उभे करण्यात भारत यशस्वी ठरला. जगभरातील राष्ट्रप्रमुख, त्यांची परराष्ट्र मंत्रालये आणि संबंधित आस्थापनांशी सातत्यपूर्ण संवादाने यामध्ये महत्त्वाची भुमिका निभावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्रमंत्री जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि भारताचे विविध देशातील राजदूत हे त्यांच्या त्यांच्या पातळीवरून, भारताची बाजू इतर देशांपुढे मांडत आहेत. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाची संपूर्ण यंत्रणा यासाठी कार्यरत आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स हे स्थायी सदस्य, तसेच इतर अनेक प्रभावशाली देश जसे जपान, इस्रायल, जर्मनी, सौदी अरब, संयुक्त अरब अमिराती, हे आज दहशतवादाविरुद्धच्या कारवाईत भारताला पाठिंबा देताना दिसत आहेत. यामागे भारतीय परराष्ट्रनीतीची एक व्यापक पार्श्वभूमी आहे.

गेल्या काही वर्षांत भारत जागतिक पटलावरील एक महत्त्वपूर्ण खेळाडू बनला आहे. यामध्ये भारताचा आर्थिक उत्कर्ष, राजकीय महत्त्व, तसेच अनेक छोट्या देशांसोबत विस्तारणारे संबंध हे घटक महत्त्वाचे आहेत. एकीकडे, पंतप्रधान मोदींनी भारताच्या 'शेजार' संकल्पनेचा विस्तार केलेला दिसतो, ज्यामध्ये आखाती देश, मध्य अशिया, दक्षिणपूर्व आशिया आणि आफ्रिकी देशांशी विस्तारित शेजार म्हणून संबंध प्रस्थापित केले. यामुळे आपल्या 'शेजार' धोरणातील पाकिस्तानचे अवाजवी महत्त्व संपुष्टात आले.

भारताच्या परराष्ट्रनीतीमध्ये आणि जागतिक भूमिकेमध्ये, पाकिस्तानचे स्थान आता नगण्य राहिले आहे. दुसरीकडे, अनेक महत्त्वाच्या इस्लामी देशांशी प्रस्थापित केलेले संबंध, छोट्या देशांना विकासकामात दिलेली मदत, 'कोविड' काळातला लस-पुरवठा, वैद्यकीय सहकार्य आणि 'ग्लोबल साऊथ' देशांचे नेतृत्व यामुळे आज जगात भारताची सकारात्मक प्रतिमा उभी राहिली आहे.

(पान ४ वर)

# अमेरिकेचा डबल गेम!

**लक्ष्यवेध**
**राहुल बोरगांवकर**

भारताने पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांचे पुरावे दिले, तरी अमेरिकेकडून त्या देशावर कोणत्याही कारवाईची शक्यता नाहीच. कारण अफगाणिस्तान, रशिया, चीन, इराण आणि भारतावरही नजर ठेवण्यासाठी अमेरिकेला पाकिस्तानी भूमीचा आणि हल्ल्यांसाठी विमानतळांचा वापर करता येतो. परिणामी भारताला दहशतवादाची लढाई स्वबळावरच लढावी लागेल. भारतातील दहशतवादी हल्ल्यांना पाकिस्तानची फूस असते, ही गोष्ट पहलगाममध्ये इस्लामी दहशतवाद्यांनी निरपराध पर्यटकांच्या केलेल्या हत्याकांडाने ज्या सुस्पष्टपणे सिद्ध केली, तितकी ती भारताने आजवर दिलेल्या पुराव्यांमुळेही झाली नसेल. ज्या पद्धतीने बायका-मुलांसमोर त्यांच्या पतींची त्यांचा धर्म विचारून हत्या केली गेली, त्यामुळे संपूर्ण जग भारतामागे उभे राहिले. या हत्याकांडाचा दोषी कोणता देश आहे, याची विचारणाही जगाने केली नाही आणि भारतही कोणाला पुरावे देण्याच्या भानगडीत पडला नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला कायमचा धडा शिकविण्यासाठी जय्यत तयारी केली आणि 'ऑपरेशन सिंदूर' या नावाने पाकिस्तानवर मर्मघातक हल्ला केला. त्यात पाकिस्तानचे एखाद्या पूर्ण युद्धाने होणार नाही, इतके नुकसान झाले. आता तर त्याच्या अण्वस्त्र साठ्यालाही धोका निर्माण झाला आहे, असे सांगितले जाते. इतके सगळे होऊनही अमेरिकेने पाकिस्तानविरोधात एकही शब्द उच्चारलेला नाही, हे सूचक म्हणावे लागेल.

अमेरिकेच्या दृष्टीने पाकिस्तानचे महत्त्व आहेच. तो एक पूर्णपणे फसलेला आणि कुटिल देश आहे, याबद्दल अमेरिकेच्या मनात जराही शंका नाही. तरीही तिच्याकडून पाकिस्तानवर कोणतीही दंडात्मक कारवाई केली जात नाही, यामागे आहे पाकिस्तानचे भौगोलिक महत्त्व! ज्या ओसामा बिन लादेनचा शोध घेण्यासाठी अमेरिका दहा वर्षे जंग जंग पछाडत होती, तो ओसामा रावळपिंडीजवळ असलेल्या अबोटाबाद या गावात दडून बसलेला सापडला. त्याचे घर पाकिस्तानी लष्करी प्रशिक्षण अकादमीपासून केवळ एक किमी अंतरावर होते. असे असूनही अमेरिकेने पाकिस्तानविरोधात साधे अवाक्षरही काढले नाही; मग कोणतीही दंडात्मक कारवाई करणे दूरच राहो!

ओसामाचे उदाहरण एकमेव नाही. अमेरिकेला हवे असलेले बहुतेक सर्व दहशतवादी हे पाकिस्ताननेच अमेरिकेच्या हवाली केले आहेत, हा योगायोग नव्हे. उलट पाकिस्तान या दहशतवादाच्या खेळात किती खोल गुंतलेला आहे, त्याचाच हा पुरावा.

(पान ४ वर)



विश्वसंचार

**मल्हार कृष्ण गोखले**

# एम.आय.६ची विजयध्वजा आणि कर्नल गोर्दियेव्हस्की

## भाग २

एम.आय.६ म्हणजेच 'मिलिटरी इंटेलिजन्स-सेक्शन ६' किंवा एस.आय.एस. म्हणजे 'सीक्रेट इंटेलिजन्स सर्व्हिस' हे ब्रिटन या देशाचे परराष्ट्रीय गुप्तवार्ता संकलन करणारे खाते आहे. लोकप्रिय भाषेत बोलायचे तर जगभर सर्वांना आवडणारा काल्पनिक गुप्तहेर जेम्स बॉण्ड हा एम.आय.६ चा हस्तक आहे.

'बॉण्ड' ही व्यक्तिरेखा काल्पनिक असली, तरी त्याच्या कादंबऱ्यांची कथानके संपूर्ण काल्पनिक नाहीत. एम.आय.६ च्याच अनेक हस्तकांची व्यक्तिमत्त्वे एकत्र करून त्यांची बॉण्ड ही एक व्यक्तिरेखा बनवण्यात आलेली आहे तसेच या खऱ्याखुऱ्या हस्तकांनी पार पाडलेल्या अनेक कामगिरी एकत्र गुंफून त्यांची कथानके बनवलेली आहेत. जेम्स बॉण्ड या व्यक्तिरेखेचा लेखक इयान फ्लेमिंग हा स्वतःच ब्रिटिश नौदल खात्यात गुप्तवार्ता संकलन करीत असल्यामुळे, त्याला असंख्य गुप्त घटना माहीत होत्या. ब्रिटिश साम्राज्य आणि रशियन साम्राज्य यांच्यात तीव्र स्पर्धा होती. पण २० व्या शतकात या स्पर्धेने वेगवेगळी वळणे घेतली. १९१४ साली जर्मनीने फ्रान्सवर आक्रमण केले. तेव्हा ब्रिटन आणि रशिया फ्रान्सच्या बाजूने लढाईत उतरले. मग जर्मनी बोल्शेव्हिक क्रांतिकारकांना रशियन साम्राज्याविरुद्ध उठाव करायला मदत करू लागला. तेव्हा ब्रिटनने रशियाच्या झारला मदत करण्याचा बराच प्रयत्न केला. पण त्याचा उपयोग न होता झारशाही कोसळलीच.

बोल्शेव्हिक क्रांतिकारक सत्तारूढ झाले. म्हणजे आता ब्रिटन आणि बोल्शेव्हिक उर्फ सोव्हिएत सरकार यांची मैत्री असायला हवी होती; पण तसे घडले नाही. उलट सोव्हिएत नेते हे झार सम्राटांपेक्षाही अधिक साम्राज्यपिपासू निघाले. झार सम्राट निदान उघड-उघड साम्राज्यवादी होते. आपली साम्राज्यतृष्णा त्यांनी लपवून ठेवलेली नव्हती. सोव्हिएत नेते साम्यवाद नावाच्या अतिशय मोहक भासणाऱ्या बुरख्याखाली आपले साम्राज्य पसरवू पाहात होते. साम्यवादी सरकार म्हणजे श्रमिकांचे, कष्टकऱ्यांचे, रंजल्या-गांजल्या शोषितांचे राज्य हा त्यांचा बाह्य बुरखा अत्यंत मोहक होता. त्यांनी जगभरच्या विचारवंतांना, बुद्धिमतांना आवाहन केले की, तुमच्या देशातली राजेशाही, लोकशाही सरकारे उलथून टाकण्यासाठी साम्यवादी पक्षाला मदत करा. जगात सर्वत्र शोषित-वंचितांचे राज्य आले पाहिजे.

आजवर राजे-सरदार-जमीनदार वर्ग काय किंवा लोकशाहीवादी राजकीय पक्ष काय, सर्वांनीच समाजातल्या शेतकरी-कामकरी वर्गाचे फक्त शोषणच केले आहे. आता या 'बूर्ज्वा' म्हणजे पांढरपेशा लोकांना बाजूला करा आणि 'प्रोलटरियेट' म्हणजे सर्वसामान्य श्रमिकांच्या हातात राज्याची सूत्रे द्या. आम्ही (म्हणजे रशियन साम्यवाद्यांनी) बघा, आमच्या देशात सोव्हिएत राज्यप्रणाली आणली. त्यामुळे आज आमचा देश म्हणजे पृथ्वीवरचा स्वर्ग बनला आहे. कुणी लहान नाही, कुणी मोठा नाही, सगळे समान आहेत. कुणी नोकर नाही, कुणी मालक नाही. सगळे जण मालकही आहेत आणि स्वतःच्या इच्छेने नोकरही आहेत. कुणी कुणाचे शोष करीत नाही, कुणी कुणावर अन्याय करीत नाही.

'श्रमिकांचे राज्य' या कार्ल मार्क्सने मांडलेल्या संकल्पनेत मुळातच एक प्रचंड अपील होते. त्यात रशियन साम्यवाद्यांनी आपल्या सरकारचा प्रचार इतक्या उत्तम रीतीने केला की, जगभरचे बुद्धिजीवी, विचारवंत अगदी भारून गेले आणि... आणि आपापल्या देशातल्या सरकारशी दगाबाजी करण्यास प्रवृत्त झाले. अनेक संशोधक, वैज्ञानिक, लष्करी तज्ज्ञ, राजकीय नेते, सामाजिक विचारवंत यांनी आपापल्या क्षेत्रातले नवे संशोधन रशियाला दिले. गुप्त संवेदनशील माहिती रशियाला पुरवली. स्वदेशाचे सरकार उलथवून तिथे रशियाचे बाहुले असणाऱ्या साम्यवादी पक्षाचे सरकार आणण्याचे मनापासून प्रयत्न केले.

अनेक ब्रिटिश विचारवंत, वैज्ञानिक, लेखक हे मनातून साम्यवादाला अनुकूल बनले होते. उदा. प्रख्यात नाटककार जॉर्ज बर्नार्ड शॉ हा साम्यवादी बनला होता. विश्वविख्यात हास्य अभिनेता चार्ली चॅप्लिन साम्यवादाबद्दल सहानुभूती बाळगून होता. त्यामुळे रशियन हेरखाते एन.के.व्ही.डी. किंवा नंतर के.जी.बी. यांना युरोपअमेरिकेतली गुप्त माहिती मिळवायला फारसे प्रयास पडत नसत. याउलट युरोप-अमेरिकेला म्हणजे मुख्यतः ब्रिटिश हेरखाते एम.आय.६ आणि अमेरिकन हेरखाते सी. आय. ए. यांना रशियातल्या गुप्त बातम्या काढण्यासाठी फार प्रयास पडत. त्यांच्याकडे मोहक तत्त्वज्ञान नव्हते. पण मुक्त स्वातंत्र्य सुबत्ता, समृद्धी, सुखसोयींची विपुलता हे मात्र होते.



ओलेग गोर्दियेव्हस्कीला ते आवडले. गोर्दियेव्हस्कीचा बाप एन.के.व्ही.डी.चा हस्तक होताच. त्याचा मोठा भाऊ वासिलको हा पण के.जी.बी.मध्ये नोकरी करू लागला. मॉस्को विद्यापीठातून आंतरराष्ट्रीय संबंध या विषयातून पदवी घेतानाच ओलेग गोर्दियेव्हस्कीने, जर्मन, डॅनिश, स्वीडिश आणि नॉर्वेजियन या भाषा आत्मसात केल्या.

साहजिकच १९६१ साली त्याला के.जी.बी. या रशियन गुप्तहेर खात्याचा हस्तक म्हणून बर्लिनमध्ये नेमणूक मिळाली. ओलेग तिथे असतानाच पूर्व जर्मनीच्या साम्यवादी राज्यकर्त्यांनी कुप्रसिद्ध बर्लिन भिंत उभारली. साम्यवादी तत्त्वज्ञान विरोधाची ठिणगी तेव्हाच ओलेगच्या मनात पडली. त्यानंतर १९६८ साली झेकोस्लोव्हाकियाचा नेता अलेक्झांडर ड्युबचेक याने बंड पुकारले. ड्युबचेक साम्यवादीच होता. पण सोव्हिएत नेत्यांचे आदेश मानायला त्याने नकार दिला. तेव्हा सोव्हिएत राष्ट्राध्यक्ष लिओनिद ब्रेझनेव्ह याने सरळ रणगाडे पाठवून ते बंड अक्षरशः चिरडून टाकले.

गोर्दियेव्हस्की त्यावेळी डेन्मार्कची राजधानी कोपनहेगनमध्ये होता. श्रमिकांचे राज्य म्हणवणाऱ्या रशियनांच्या या गुंडागिरीचा त्याला फारच राग आला. त्याने ब्रिटनला गुप्त माहिती पुरवण्याचा पक्का निश्चय केला. चोरांच्या वाटा चोरांना माहीत, या म्हणीनुसार त्याने त्याच्या खास मार्गाने एम.आय.६ शी संपर्क केला. मग तो मॉस्कोला गेला. तिथे त्याने इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविले. मग १९७४ साली त्याची लंडनला नेमणूक झाली. १९७४ ते १९८५ या काळात त्याने एम.आय. ६ ला रशियाबद्दलची भरपूर गुप्त माहिती पुरवली. एम.आय. ६ ने मोठ्या कौशल्याने, त्याच्यापेक्षा वरिष्ठ असणाऱ्या रशियन दूतावासातल्या अधिकाऱ्यांना काही ना काही कारण काढून लंडनमधून हलवले. एप्रिल १९८५ मध्ये सर्वात वरिष्ठ या नात्याने त्याची नेमणूक रेसिडेंट या सर्वोच्च पदावर झाली. मग घरी आल्यावर ओलेगने कपाटातून 'शेक्सपिअरची सुनीते' हे पुस्तक काढले. लंडनहून आणलेले अतिशय सुबक असे ते पुस्तक त्याने बेसिनमध्ये ठेवले आणि नळ सोडला. पूर्ण भिजल्यावर त्याला लावलेला उत्कृष्ट कपडा बाजूला झाला. आत एक प्लॅस्टिकची पिशवी होती. तिच्यातल्या सूचनांनुसार गोर्दियेव्हस्की मॉस्कोतल्या एका विशिष्ट रस्त्यावर संध्याकाळी ७ वाजता एका माणसाला भेटला. दोघांनी फक्त एकमेकांच्या डोळ्यांत रोखून पाहिले. मग काही दिवसांनी मॉस्कोतल्या एका प्रसिद्ध चर्चमध्ये एका माणसाने त्याला 'ब्रशपास्ट' केला. म्हणजे खांद्याने हलकासा धक्का देऊन तो पुढे गेला. त्या धक्क्यासरशी त्याच्या खिशात एक चिटोरे आले. त्यात दोन रेल्वे गाड्यांची नावे होती. त्या गाड्या बदलत तो रशिया-फिनलंड सीमेवर पोचला. तिथे एक मोटार गाडी, तिच्यात दोन पुरुष, स्त्रिया आणि एक लहान मूल होते. ओलेगला गाडीच्या डिकीमध्ये लपवण्यात आले. सीमा ओलांडून जाताना काही चेकपोस्टवर कुत्रे होते. कुत्रे गाडीजवळ आले की, एक बाई त्या छोट्या मुलाचा डायपर बदलायला घ्यायची. त्या सुगंधा त इतर गंध लपवायचे. अशा तऱ्हेने गोर्दियेव्हस्की प्रथम फिनलंडला आणि तिथून लंडनला पोचला. एम.आय.६ ने आपला मौल्यवान डबल एजंट सुखरूप परत आणला. आता खरे म्हणजे गोर्दियेव्हस्कीचे गुप्त माहिती पुरवण्याचे काम संपले होते. पण एम.आय.६ साठी तो महत्त्वाचा आणि मौल्यवान माणूस होता. त्याला गमावून चालणार नव्हते.

१९७४ ते १९८५ या कालखंडात गोर्दियेव्हस्कीने विविध प्रकारची गुप्त माहिती पुरवली होती. त्यापैकी फारच महत्त्वाच्या तीन गोष्टी म्हणजे डबल आर्चर ८३ ची माहिती, मिखाईल गोर्बाचेव्ह या उभरत्या सोव्हिएत नेत्याबद्दलची माहिती आणि ब्रिटिश पंतप्रधान मार्गरेट थॅचर आणि (त्यावेळी) सोव्हिएत परराष्ट्रमंत्री असलेले गोर्बाचेव्ह यांची त्याने लंडनमध्ये घडवून आणलेली भेट. १९६४ सालापासून सत्तेवर घट्ट पकड ठेवून असलेले सोव्हिएत राष्ट्राध्यक्ष लिओनिद ब्रेझनेव्ह १९८२ साली मरण पावले. त्यांच्यानंतर के. जी. बी. चे प्रमुख असणारे युरी आंद्रोपोव्ह हे राष्ट्राध्यक्ष झाले. पण फेब्रुवारी १९८३ मध्ये त्यांच्या दोन्ही किडन्या पूर्ण निकामी झाल्या. त्यांना त्याचवेळी गोर्बाचेव्ह यांनी राष्ट्राध्यक्ष म्हणून हवे होते. पण पक्षाने १९८४ मध्ये त्यांच्या मृत्यूनंतर कॉन्स्टन्टिन चेनेन्को यांना राष्ट्राध्यक्ष बनवले. गोर्बाचेव्ह पराष्ट्रामंत्री बनले. गोर्दियेव्हस्कीने ब्रिटिश पंतप्रधान मार्गरेट थॅचर यांना गोर्बाचेव्ह हे उद्या राष्ट्राध्यक्ष होणार, तुम्ही त्यांना भेटले पाहिजे असे पटवून दिले. मग १६ डिसेंबर १९८४ या दिवशी लंडनमध्येही भेट त्याने घडवून आणली. नोव्हेंबर १९८३ मध्ये नाटो राष्ट्रांनी म्हणजे अमेरिकेच्या नेतृत्वाखालील एकूण ३२ देशांनी एबल आर्चर ८३ नामक संयुक्त युद्ध सरावाचा एक फारच भव्य कार्यक्रम आखला होता. बेल्जियम देशातल्या कॅस्टो या शहरातून या युद्ध सरावाचे संचालन करण्यात आले होते. हा युद्ध सराव म्हणजे प्रत्यक्षात नाटो देश सोव्हिएत गटातील वॉर्सा करार देशांवर आण्विक हल्ला करणार आहेत, अशी रशियाची समजूत झाली. रशियन सेना प्रतिहल्ल्यासाठी अण्वस्त्रे सज्ज करू लागली. गोर्दियेव्हस्कीकडून ही बातमी तातडीने एम.आय.६ आणि पुढे सी.आय.ए.कडे पोचली. ताबडतोब योग्य ती कारवाई झाली. युद्धसराव पार पडला. पण तो सरावच आहे. आक्रमण नव्हे. अशी सोव्हिएत लष्करी सचिवाची खात्री पटवून देण्यात आली. अनेक लेखकांचे म्हणणे आहे की, गोर्दिव्हस्कीच्या या तातडीमुळे जवळपास सुरूच झालेले तिसरे महायुद्ध टळले, असा हा कर्नल गोर्दियेव्हस्की ४ मार्च २०२५ रोजी वयाच्या ८६व्या वर्षी मरण पावला. (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

---

सुखात्म

**डॉ. अविनाश मोहरील**

# विलग होणारी कलाकृती...

ज्या कवितांची गाणी होतात ती गाणी आपल्या लक्षात राहतात. कारण एरवी कविता लक्षात ठेवणे जरा कठीण बाब असते. बालपणीच्या कविता आपल्यापैकी अनेकांना स्मरतात. त्या काळी कविता वाचन, पठन हा सारा आनंदाचा भाग होता. दुर्दैवाने आता बालकवींची एखादी सुंदर कविता परीक्षेतील गुणांपर्यंत मर्यादित असल्याने त्या कवितांना अभ्यासणे व त्यांच्या गर्भितार्थापर्यंत पोहोचणे हा प्रकार दुर्मिळ होत जातो आहे. कवितेचे स्वरूपही एखाद्या गाण्यासारखेच असते.

एखादे गाणे जे दस्तुरखुद्द लताबाईंनी गायिले असेल तर त्याचा आनंद शब्दातीत आहे. परंतु तेच गाणे पुढे श्रेया घोषाल म्हणते, मग तेच गाणे एखाद्या गायनाच्या स्पर्धेत एखादी लहानगी पोर गाते व तेच गाणे आपणही गुणगुणत असतो. या सर्व वेळी आनंद मिळालेलाच असतो. कलाकृतीचे असेच असते. कोणतीही कलाकृती ही तिच्या निर्मात्यापासून कधी ना कधी विलग होते व नंतर खरे तर त्या निर्मात्याचा त्यावरचा अधिकार संपलेला असतो. जोवर ती कलाकृती निर्मितीच्या प्रक्रियेत आहे तोवर त्यावर वेगवेगळे संस्कार करण्याची मुभा त्या कलाकारास असते. तो स्वतःच्या सर्वोत्तम क्षमता वापरून त्याची निर्मिती करतो. परंतु एकदा ती कलाकृती पूर्णत्वास जाऊन लोकांपर्यंत पोहोचली की कलाकाराची भूमिका संपुष्टात येते व त्यानंतर त्या कलाकृतीचा हवा तसा, मनाला भावेल तसा, समजेल तसा अर्थ काढला जातो व त्या प्रक्रियेला रोखता येत नाही. ज्या व्यक्तींमध्ये कलात्मक दृष्टिकोन असतो ते त्या कलाकृतीच्या निर्मात्याच्या मनात आले नसतील असे अर्थ निर्माण करतात व त्या कलाकृतीची उंची वाढवतात. कवितेच्या संदर्भातील असाच एक प्रसंग एका वर्गात घडला होता. एक जुनी गोष्ट माझ्या ऐकण्यात आहे. मराठी पदव्युत्तर वर्गामध्ये शिक्षण घेण्याकरिता एक ज्येष्ठ कवी पोहोचले. त्यांनी नागपूर विद्यापीठात रीतसर प्रवेश घेतला व वर्ग करणे सुरू केले. गंमत म्हणजे ते जो अभ्यासक्रम शिकत होते त्या अभ्यासक्रमात त्यांनीच लिहिलेली कविता समाविष्ट करण्यात आली होती. प्रसंग मोठा गमतीदार होता. स्वतः कवी विद्यार्थी म्हणून वर्गात असताना त्यांची कविता शिकवायला एक ज्येष्ठ प्राध्यापक आले. अर्थात ते प्राध्यापक थोर समीक्षक होते. त्यांनी ती कविता शिकवायला घेतली. साधारण दोन-तीन वर्ग तासांमध्ये ती कविता त्यांनी शिकविली. त्या प्राध्यापकांना ठाऊक होते की, त्या कवितेचे रचयिता कवी विद्यार्थी म्हणून त्या वर्गात होते. कविता पूर्ण शिकवून झाल्यावर कविराज उभे राहिले व त्यांनी प्राध्यापकांना त्यांचे मत सांगितले. ते म्हणाले की, ''सर, आपण ही कविता शिकवित असताना एकूण पाच कडव्यांपैकी दोन कडव्यांचा अर्थ पूर्णपणे वेगळा सांगितला. आपण जो अर्थ सांगितला तो कुठेही माझ्या मनात नव्हता. हे कसे?'' ज्येष्ठ समीक्षक असलेले ते प्राध्यापक जे काही उत्तरले तेच खरे कलात्मक समीक्षणाचे मर्म आहे. ते म्हणाले, ''कविराज, आपण ही कविता लिहीत असताना जो काही विचार केलात तो आपल्या त्यावेळेच्या मनःस्थितीवर, आपल्या मनावर बालपणापासून झालेल्या वैचारिक संस्कारांवर, आपल्या व्यक्तिगत चिंतन क्षमतेवर व आपल्या मनाच्या एकूणच जडणघडणीवर अवलंबून असलेला होता. आता यानंतर त्या काव्याचा आस्वाद घेताना मी आताच सांगितल्याप्रमाणे आपल्या मनोभूमिकांचा नव्हे तर संबंधित वाचकांच्या मनोभूमिकेचा विचार महत्त्वाचा ठरणार व त्यांच्या मनोभूमिका आपल्यापेक्षा निश्चितच स्वतंत्र व पूर्णतया वेगळ्या राहणार. तीच बाब मला लागू आहे. त्यामुळे कवितेचे लिखाण जरी आपण केले असेल तरी या वर्गाचा शिक्षक म्हणून त्यामधून मला प्रतित होणारा अर्थच मी तुम्हा सर्वांना सांगणार व या वर्गाचे विद्यार्थी म्हणून आपणाला तोच स्वीकारावा लागणार.'' अर्थात हा सारा संवाद अत्यंत खेळीमेळीच्या स्वरूपातच झाला होता. त्यामुळे कविराज निमूटपणे खाली बसले. परंतु कोणतीही कलाकृती ही त्या कलाकाराची किती व कुठवर असते, याचे नेमके उत्तर त्या प्राध्यापक महोदयांनी अचूक सांगितले होते. कधी कधी तर कलाकृती ही जनमानसात जाताना किंवा प्रसिद्ध होताना चुकीच्या संदर्भासह लोकप्रिय होते. एखादा शब्द चुकीच्या अर्थाने स्वीकारलेला असतो.

एके दिवशी रेडिओवर माझ्या अतिशय आवडत्या कवीचीगुलजारची मुलाखत सुरू होती. त्यामध्ये सहजच बोलताना गुलजारांनी त्यांनी लिहिलेल्या दोन वेगवेगळ्या गीतांमधील मुद्दाम वापरलेल्या दोन शब्दांची गंमत सांगितली. गुलजार यांचे एक सुप्रसिद्ध गीत त्यांनीच दिग्दर्शित केलेल्या एका चित्रपटात वापरले होते. आशा भोसले यांनी गायिलेल्या त्या गीताचे शब्द होते, 'झुठे नैना बोले साची बतीया, नीत चमकावे चाँद काली रतीया...' या गीतात 'झुठे नैना' हा शब्द गुलजार यांनी खोटे किंवा फसवे डोळे या अर्थाने वापरला आहे. हे गीत अतिशय प्रसिद्ध झाले. काही दिवसांनी गुलजार, आशा भोसले व राहुल देव बर्मन यांनी 'दिल पडोसी है' नावाचा एक अल्बम काढण्याचे ठरविले. यामध्ये आर. डी. बर्मन यांना 'झुठे नैना बोले' सारख्याच आशयाचे गीत हवे होते. त्यामुळे त्यांनी तशाच पद्धतीचे गीत लिहावे, अशी विनंती त्यांनी गुलजारना केली. त्यांनी गीत लिहिले व ते गीतदेखील अतिशय लोकप्रिय झाले. सर्व रसिक श्रोत्यांनी 'जुठे तेरे नैन, सौतन की छब छु के आये' असे ते गीत आवडीने ऐकले. मी देखील ते गीत त्याच पद्धतीने ऐकले होते. त्या दिवशी मात्र त्या मुलाखतीमध्ये गुलजारांनी फारच वेगळी गंमत सांगितली. ते म्हणाले, माझे 'लेकिन' चित्रपटातील 'झुठे नैना बोले साची बतीयाँ' हे गीत लोकांना ठाऊक असल्याने या गीताचे शब्ददेखील 'झुठे तेरे नैन' म्हणजे फसवे किंवा खोटे डोळे असतील, असे सर्वांनी गृहीत धरले होते. परंतु, खरी बाब अशी आहे की, मी हे गीत लिहिताना 'फसवे डोळे' या अर्थाची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून जाणीवपूर्वक वेगळा शब्द टाकून लिहिले होते. ते असे की, 'जुठे तेरे नैन, सौतन की छब छु के आये.' येथे 'जुठे' म्हणजे 'उष्टे' असा त्याचा अर्थ गुलजारजींना अभिप्रेत होता. परंतु आधीच्या गाण्याच्या लोकप्रियतेमुळे सर्वांनी सरसकट तोच 'झुठे' म्हणजे 'खोटे' हा अर्थ गृहीत धरला. कलाकारापासून ती विलग झाल्यावर तिचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण होते. त्याचा आस्वाद प्रत्येक जण आपापल्या पद्धतीने घेऊ लागतो. त्या कलाकृतीला उत्तम विचार करणारे व सकारात्मकतेने स्वीकारणारे लोक भेटले तर तिचे नशीब उजळून ती लोकप्रिय होते व तीच कलाकृती नवनवीन आनंद दालने निर्माण करू शकते, समाधानाचा स्रोत बनू शकते. दुर्दैवाने जर तिला चांगला व संवेदनशील लोकसमूह भेटला नाही तर एखादी उत्तम कलाकृती अव्हेरली जाते. आपले आयुष्य काहीसे अशाच प्रकारचे आहे.

जीवन जगत असताना आपल्या क्रिया, आपले शब्द, आपले विचार आपल्यापासून विलग झाल्यावर आपले नसतात. म्हणूनच त्यांना योग्य पद्धतीने स्वीकारल्या जाण्याकरिता आपल्या आजूबाजूला संवेदनशील व सकारात्मक लोकांची गरज असते. तसे असल्यास आपल्याला या सर्वांकडून जीवन योग्य पद्धतीने व आनंदाने जगण्याची ऊर्जा मिळते. दुर्दैवाने असे नसल्यास आपल्याला बऱ्याच वेळी मानसिक अवहेलना व कुचंबणा सहन कराव्या लागतात. त्यासाठी उच्च व योग्य अभिरुची व कलात्मक संवेदना जागृत असलेले लोक जास्तीत जास्त आपल्या जीवनात राहावेत याकरीता प्रयत्न करायला हवा म्हणजे एखाद्या उत्तम कलाकृतीप्रमाणे आयुष्यदेखील निरंतर आनंद निर्मितीचा अक्षय स्रोत बनू शकेल. अर्थात माणसांची निवड हा आपल्या हातात नसलेला भाग आहे; प्रयत्न करायला हरकत नाही!

---

संस्कारांच्या देशा

**रमा गोळवलकर**

भारताच्या भूमीत अनेक सहस्रकांपासून चालत आलेली ज्ञानपरंपरा आहे. यात अनौपचारिक शिक्षणाबरोबरच औपचारिक अध्ययन आणि अध्यापनाचा सहभाग आहे. आजच्या भाषेत यालाच अनुक्रमे 'इन्फॉर्मल' आणि 'फॉर्मल एज्युकेशन' म्हणतात. या अनौपचारिक शिक्षणाचं वैशिष्ट्य म्हणजे एखाद्या अनुभवी व्यक्तीच्या हाताखाली मदतनीस म्हणून काम करत, तिच्या मार्गदर्शनात चुका दुरुस्त करत तिची कौशल्य आत्मसात करायची. या शिक्षण प्रकाराला आजच्या जगात 'ऑन जॉब ट्रेनिंग' म्हणतात. शिक्षण घेण्याचा हा प्रकार शिकाऊ व्यक्तीला हमखास घडवून जातो, यात शंका नाही. जिच्या हाताखाली काम करायचं त्या निष्णात व्यक्तीच्या अनुभवात स्वतःच्या प्रत्यक्ष अनुभवाची भर घालायची आणि तो वारसा पुढच्या पिढीकडे सोपवायचा. यातूनच एक ज्ञानसंपन्न समाज निर्माण होत असतो. याशिवाय औपचारिक शिक्षणाची एक स्वतंत्र प्रणाली या भूमीत विकसित झाली.



# आचार्य देवो भव

जगातल्या प्राचीनतम शिक्षण पद्धतीचा पाया इथेच घालण्यात आला. वयाच्या आठव्या वर्षी विद्यार्जनासाठी घर सोडून गुरुकुलात जायचं.तिथे असलेल्या वेगवेगळ्या विद्यापारंगत व्यक्तींकडून विद्या ग्रहण करायची. विद्यादान करण्याचं त्यांचं समाधान झाल्यानंतरच गुरुगृह सोडायचं ही पद्धत होती. इथे वेगवेगळ्या विद्यापारंगत व्यक्ती असा उल्लेख जाणीवपूर्वक केलेला आहे. एक तर विविध विषय शिकवले जात आणि ते शिकवणारे लोकदेखील वेगवेगळ्या पदांवर काम करत. अशा शिक्षण प्रणालीचा अवलंब करणारी एकाहून एक सरस विद्यापीठांची मालिकाच इथे कार्यरत होती. त्यातली ठळक म्हणजे तक्षशिला, नालंदा, वल्लभी, विक्रमशिला, ओदंतपुरी, सोमपूर, मिथिला, काशी, प्रतिष्ठान, कांचीपुरम इत्यादींची ख्याती पसरलेली होती. विद्यार्जन करण्यासाठी देशविदेशातून विद्यार्थी इथे येत आणि विद्यावंत होऊन मायदेशी परत जात. त्यामुळे अनौपचारिक म्हणजे 'नॉन फॉर्मल' आणि औपचारिक म्हणजे 'फॉर्मल' या दोन्ही प्रकारच्या शिक्षणाची परंपराच इथे नांदत होती. औपचारिक शिक्षण व्यवस्थेचा महत्त्वाची पदं होती शिक्षक, अध्यापक, उपाध्याय, आचार्य, चरक, यौजनशतिक इत्यादी. यापैकी प्रत्येक पदाचे गुणधर्म आणि कार्यक्षेत्र निश्चित होतं. यापैकी-

**१) शिक्षक** - म्हणजे जीवनात पदोपदी उपयोगी पडणाऱ्या व्यवहारात नेहमी वापरात असणाऱ्या गोष्टींचा परिचय करून देणारी व्यक्ती. यात शिकणाऱ्याकडून आर्थिक लाभाची कोणतीही अपेक्षा केली जात नाही.

केवळ आदर आणि सन्मान राखला जाणं अपेक्षित आहे. आई-वडील आसपासची सगळी मोठी आणि अनुभवी मंडळी ही आपले शिक्षक असतातच; शिवाय आयुष्यात खाल्लेले टक्केटोणपे आणि घेतलेले अनुभव यातून आपण खुपसं शिकत असतो. म्हणूनच जीवन हाच आपला खरा शिक्षक आहे, अशी उक्ती प्रसिद्ध आहे.

**२) अध्यापक** - शिष्याला संहितेचा योग्य अर्थ कळतो आहे की नाही आणि तो अर्थ समजून योग्य उच्चारांसह पाठांतर करतो आहे की नाही, याचं दायित्व सर्वस्वी अध्यापकाचं आहे. यात अध्यापक एक विषय शिकवो किंवा अधिक, प्रत्येक शिष्याशी व्यक्तिगत पातळीवर संबंध ठेवत, त्याच्या अडीअडचणी समजून घेत त्यांचं निराकरण करीत असतो.

**३) उपाध्याय** - असा अध्यापक जो आजीवन शिष्याच्या आयुष्यात मार्गदर्शकाचं कर्तव्य करीत असतो. त्याचा सल्ला घेतल्याशिवाय शिष्य निर्णय करीत नाही. उपाध्याय तो जे विषय शिकवतो त्या व्यतिरिक्त इतरही अनेक विषयात प्रावीण्य मिळवून असतो. त्यामुळे त्याचं आकलन समग्र आणि समतोल साधणारं असतं आणि दृष्टी निकोप असते. सगळ्या बाजूंचा व्यवस्थित विचार करून सल्ला देणं हे उपाध्यायाचं कर्तव्य आहे. त्यामुळे उपाध्याय सर्वसाधारणपणे संपूर्ण कुटुंबाचाच सल्लागार असतो.

**४) चरक** - म्हणजे भ्रमंतीवर असणारा, विविध ठिकाणी फिरून ज्ञानाचे कण एकत्र करून शिष्याला देणारा. हा जिथे जाईल तिथे आपल्याजवळ असलेली माहिती आणि त्यावर विचार करून काढलेले निष्कर्ष त्या त्या ठिकाणी असलेल्या शिष्यांना देत असतो.

**५) आचार्य**- या पदावर काम करणारी व्यक्ती कशी असावी, याचं नेमकं वर्णन असणारा श्लोकच उपलब्ध आहे **''आचिनोतिहि शास्त्रार्थं आचारेस्थापयत्युतब। स्वयमाचरते यस्तु स आचार्य:प्रचक्षते ।।''** जी व्यक्ती शास्त्राचा अर्थ यथावत जाणून आहे, जी तो शास्त्रार्थ सर्वसामान्य लोकांच्या आचरणात यावा म्हणून नीतिनियम बनवू शकते आणि स्वतःदेखील आचरणात आणण्याचा कसोशीनं प्रयत्न करते, विद्यार्थ्यांच्या आचरणात यावा म्हणून दक्ष असते त्या व्यक्तीला आचार्य म्हणून ओळखावे.

हे पद जो भूषवतो त्याला पाच व्रतांचं पालन करावं लागतं. तो ज्ञानपारायण असावा म्हणजे सतत त्यानं ज्ञानसाधना करावी. ज्ञानतेजानं झळाळत राहावं. तो विद्यार्थिपरायण असावा म्हणजे त्यानं विद्यार्थी घडवण्याचं व्रत पालन करावं. हे व्रत म्हणजे यात विद्यार्थी हा सर्वात महत्त्वाचा आणि त्याचं कल्याण हेच आचार्याच्या जीवनचं परम उद्दिष्ट असतं. अर्थातच त्यात आचार्याच्या स्वार्थाला कुठेही, कुठलंही स्थान नसतं. तिसरं व्रत आहे धर्मपरायणता. इथे 'धर्म' या शब्दाचा अर्थ 'कर्तव्य' असा आहे; उपासना पद्धती नव्हे.

जो आपल्या कर्तव्यात कधीही चुकत नाही आणि कर्तव्याचं पालन प्राणपणानं करतो तो आचार्य. चौथ्या व्रतामध्ये त्याला समाज आणि राष्ट्र पारायणता अंगीकारायची आहे. समाजाची उन्नती हा आचार्यांच्या नित्य चिंतनाचा विषय असायला हवा. समाजाच्या प्रत्येक घटकाचे परस्पर संबंध मित्रत्वाचे आणि सहकार्याचे असावेत हा मुख्य उद्देश मनात धरून समाजबांधणी करणं हे आचार्यांचं कार्य आहे. त्यातून धर्माचं अधिष्ठान असणारा समाज उभा राहतो आणि असा समाजच उन्नत, सशक्त, संपन्न राष्ट्राचा पाया असतो. त्यातूनच राष्ट्राची निर्मिती, जतनल, संगोपन आणि संवर्धन ही चार कार्य साधली जातात.


थोडक्यात राष्ट्र-आराधन हा त्याच्या जीवनाचा अंतस्थ: हेतू असावा. महात्मा विद्यार्थी घडवायचा, दुरात्मा नाही, हाच ध्यास असावा. महात्मन विद्यार्थी कसं असतो?

(पान ६ वर)

# करीअर निवडताय? आधीच निवडलंय?

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

आठव्या वर्गातील मुलीने सुंदर चित्र काढले व घरातील सगळ्यांना दाखवले. तेवढ्यात क्लार्कची सरकारी नोकरी करणारे तिचे मामा आले व कौतुक करायला काहीतरी बोलायचे म्हणून म्हणाले, ''तू मोठी आर्किटेक्ट होशील.'' झाले! तेच तिच्या मनात जाऊन बसले. 'आर्किटेक्चर' या व्यवसायाबद्दल तिला काहीही माहीत नव्हते. जेव्हा मी तिच्या विविध चाचण्या केल्या तेव्हा तिचे करीअर थ्रीडी ॲनिमेटर निघाले. सुरुवातीला ते तिला समजायला व पटायला वेळ लागला. आज ती परदेशात अतिशय यशस्वी थ्रीडी ॲनिमेटर म्हणून आनंदात जगते आहे.



२. त्याला कॉलेजच्या वर्गात काहीच समजत नव्हते. मग तो कॅन्टीनमध्ये बसून वेळ घालवू लागला. तेथे चुकीच्या संगतीने तो बिघडला. व्यसन लागले. व्यसनासाठी त्याने गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांकडून चार लाखांचे कर्ज घेतले. त्यांनी पालकांना धमकी दिल्यामुळे त्यांना ते फेडावे लागले. त्याशिवाय अकरावी- बारावीच्या ट्युशन व इंजिनीअरिंग कॉलेज यासाठी खर्च केलेले सात लाख रुपये व चार वर्षं पाण्यात गेले. कारण करीअर कौन्सेलिंग न करता, स्वत:ची क्षमता जाणून न घेता आईच्या इच्छेसाठी त्याने इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला होता. मग पुढे त्याला माझ्याकडे आणले. त्याचे करीअर कौन्सेलिंग करून आता तो योग्य दिशेने प्रगती करतो आहे.

३. एका मुलीने हट्टाने अमेरिकेतील एका कोर्सला प्रवेश घेतला. तिची क्षमता त्या कोर्ससाठी नव्हती. ३० लाख रुपये व चार वर्षं वाया गेलीत. अजूनही ती डिप्रेशनमधून बाहेर आलेली नाही. तिच्या उपायांसाठी अजूनही पैसा व वेळ खर्च होतोय. पालकांनी तिची इच्छा लक्षात घेऊन तिला हवे ते करू दिले. पण ती त्यांचे ऐकत नव्हती तर एवढा खर्च करण्यापूर्वी त्यांनी तिचे करीअर कौन्सेलिंग करायला हवे होते.

४. आयआयटीमध्ये प्रवेश मिळणे किती कठीण आहे ते सगळ्यांनाच माहिती आहे. तेथे पोचणारे विद्यार्थी बुद्धिमान असतात. मात्र गेल्या काही वर्षांत वेगवेगळ्या वेळी आयआयटीमध्ये शिक्षण घेणाऱ्या तीन मुलांनी आत्महत्या केल्यात. कारण? तिघेही बुद्धिमान होतेच; पण तीच चूक त्यांनी केली. आपली क्षमता त्या इंजिनीअरिंगच्या शाखेसाठी योग्य आहे का ते तपासले नाही. फक्त त्या ब्रांचमध्ये स्कोप चांगला आहे, असा विचार केला व चुकीची ब्रांच निवडली. अपेक्षित यश मिळेना म्हणून आत्महत्या केली. याच प्रकारे दरवर्षी हजारो विद्यार्थी आत्महत्या करतात किंवा डिप्रेशनमध्ये जातात. जग व करीअर्स बदलत आहेत जगात नवनवीन संशोधनामुळे नोकऱ्या व व्यवसायात अतिशय वेगात बदल होत आहेत. त्यामुळे जुने कोर्सेस बंद व्हायला हवेत, पण पालकांना व विद्यार्थ्यांना माहिती नसल्यामुळे ते प्रवेश घेत राहतात म्हणून व्यापारी दृष्टीने कॉलेजेस असे निरुपयोगी अभ्यासक्रम चालूच ठेवतात.

मुलांचे भविष्य सुरक्षित करायचे असेल तर पालकांच्या तरुणपणी महत्त्वाचे असलेले पण आज निरुपयोगी ठरलेले अनेक टाकाऊ कोर्सेस, करीअर्स आणि व्यवसाय कोणते आहेत, हे विद्यार्थी व पालकांना समजून घ्यावेच लागेल तसेच आलेल्या नवीन करीअरबाबत कळणे आवश्यक आहे. अमेरिकेत फक्त एका महिन्यात ३९०० लोकांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे नोकरी गमावली तर कारखान्यातील १४ टक्के कामगारांच्या नोकऱ्या गेल्या. अनेक कामगारांनी वेतनांत ७० टक्के घट झाल्याचे सांगितले. आर्टिफिशियल इंटेलिजेंसमुळे पुढे अनेक नोकऱ्या व व्यवसाय कायमचे बंद होणार आहेत. व्यवस्थापन, कोडिंग, ग्राहक सेवा, कायदेशीर, शिक्षण, वित्त-व्यवस्था म्हणजे फायनान्स, ग्राफिक डिझायनिंग, अभियांत्रिकी म्हणजे इंजिनीअरिंग, मानवसंसाधन व्यवस्थापन म्हणजे ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट या नऊ क्षेत्रातील रोजगाराचे स्वरूप पूर्णत: बदलणार आहे. आर्टिफिशियल इंटेलिजेंस विज्ञान माणसाची पूर्ण जागा घेऊ शकत नाही. पण आर्टिफिशियल इंटेलिजेंस वापरण्यात कौशल्य मिळविणाऱ्यांना चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळतील. कारण हे लोक शेकडो किंवा



हजारो कारागिरांचे काम एआयच्या मदतीने एकटे करू शकतील.

अनेक लोक रोजगार गमावतील हे कटू असले तरी सत्य आहे. आपली इच्छा असो वा नसो जागतिक बदलांचा परिणाम आपल्यावर होतोच, तेव्हा शाळा-कॉलेजातील विद्यार्थ्यांसोबतच प्रौढांनाही करीअर कौन्सेलिंगची गरज आहे. करीअरचा खरा आकडा आता सहा हजार पार करतो आहे. पालक आणि मुलांनाही हे माहीत नाही. अगदी सुशिक्षित डॉक्टर, इंजिनीअर, अधिकारी, वकील, प्रोफेसर, वैज्ञानिक पालकसुद्धा मुलांचे करीअर निवडताना हमखास या चुका करतात. पुढे काही वर्षांनी त्यांना आपल्या पूर्ण क्षमता नीट वापरल्या जात नाहीत हे लक्षात येतं. संशोधित सत्य ४२ हजार विद्यार्थ्यांवर केलेल्या आमच्या संशोधनानुसार सगळ्या मुलांना मिळून फक्त ३६ करीअरचीच माहिती आहे. मुलांची करीअरबद्दल तयार झालेली आवडच मुळात ९५ टक्के चुकीच्या पद्धतीने ठरली असते. या पृष्ठभूमीवर 'थ्रीइडियट्स'सारख्या चित्रपटाचं उदाहरणं मनात ठेवून जे आवडतं तेच करायचं, असे ठरवून चुकीच्या पद्धतीने ठरलेल्या पसंतीवर आधारित चुकीचे करीअर निवडणाऱ्या मुलांची टक्केवारी ९८ म्हणजे खूपच मोठी आहे. हे सत्य विद्यार्थी आणि पालक दोघांनीही लक्षात ठेवणे आवश्यक आहे. करीअरची निवड करताना मित्र-मैत्रिणींचा प्रभाव, इंटरनेट, परिचित किंवा यशस्वी व्यक्तींची उदाहरणे, शाळेत ज्या शिक्षकांनी शिकविले त्यांचा चांगला किंवा वाईट प्रभाव मुलांच्या करीअर निवडीवर अजाणतेपणी होत असतो.

शिक्षक आवडलेत की नकळतपणे अनेक मुलांना ते शिकवतात; तो विषयसुद्धा आवडायला लागतो. दहावीनंतर जर मॅथ्स आवडत नसेल तर मॅथ्स सोडून जीवशास्त्र घेतात किंवा याउलट कोणी जीवशास्त्र सोडून मॅथ्स घेतात. कुणी विज्ञान शाखा सोडून कॉमर्स किंवा आर्टस् शाखा घेतात. हा निर्णय घेताना त्यांच्या नकळत त्यांच्या वर असलेला त्या-त्या शिक्षकांचा प्रभाव व तोपर्यंतचे मिळत आलेले गुण यांचा प्रभाव असतो. अनेकदा त्या मुलांची नैसर्गिक क्षमता जर वेगळी असेल आणि एखादा विषय निवडायचा किंवा सोडायचा घेतलेला निर्णय त्यांच्या नैसर्गिक क्षमतेच्या विरुद्ध जाणारा असेल तर त्याचे परिणाम दिसायला लागतात आणि मग विपरीत परिस्थितीत अगदी आय.आय.टी.मध्ये प्रवेश मिळालेले विद्यार्थीही हताश होऊन टोकाचे पाऊल उचलतात. करीअरची निवड करताना पालकांची इच्छा, आग्रह आणि प्रभाव, कुटुंबाची आर्थिक चांगली किंवा वाईट परिस्थिती; या सगळ्या गोष्टींचा मुलांवर फार प्रभाव पडतो. जवळच्या व्यक्ती, शिक्षक यांचा भावनिक प्रभाव आणि त्या-त्या विषयात मिळालेलं यश किंवा अपयश याचा प्रभाव करीअरची निवड करताना मोठाच असतो. विद्यार्थी आणि पालकांनी काय करावं? आजच्या ज्ञान युगात स्वत:ची व करीअरची आधी माहिती घ्यावी. त्या करीअरला लागणारी क्षमता, आवड आणि आर्थिक स्थिती आपली आहे की नाही ते शास्त्रोक्त चाचण्या वापरून व अनुभवी करीअर कौन्सेलरची मदत घेऊन मगच विशिष्ट करीअर किंवा व्यवसायाची निवड करावी. योग्य प्रकारे सगळ्या आवश्यक त्या चाचण्या करून व्यवस्थित करीअर कौन्सेलिंग करण्यासाठी एका विद्यार्थ्याला सहा ते सात तास लागतात. करीअर कौन्सेलिंग योग्य पद्धतीने करण्यासाठी मानसिक, बौद्धिक, शारीरिक वगैरे २८ प्रकारच्या चाचण्या कराव्या लागतात. या चाचण्या करताना फक्त करीअरची निवडच नव्हे, तर वैयक्तिक गुण-दोषही कळतात. समुपदेशन करताना ते दोष कसे कमी करता येतील व आधी न जाणवलेले पण ॲप्टिट्यूड टेस्टमधून लक्षात आलेले चांगले गुण कसे वापरायचे त्याचेही मार्गदर्शन आम्ही मुलांना व पालकांना करीतच असतो. करीअर निवडताना चुकीची मानसिकता टाळा मुलगा-मुलगी फक्त कन्फ्युज्ड असतील तरच त्यांचे करीअर कौन्सेलिंग करायचे ही पूर्णत: चुकीची मानसिकता आहे. कन्फ्युजन असो वा नसो करीअर कौन्सेलिंग करायलाच हवे. आपल्या मित्र-मैत्रिणीने एका अभ्यासक्रमात प्रवेश घेतला तर तिथेच मी पण शिकणार, असा विचार करू नये. फक्त फोनवरून चौकशी करण्यापेक्षा भेटायची वेळ व तारीख ठरवूनच प्रत्यक्ष येऊन भेटायला हवे.

(लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)

> करीअर कौन्सेलिंग नेमकं केव्हा करावे? अनेक पालकांना असे वाटते की, दहावीची किंवा बारावीची मार्कलिस्ट हाती आल्यावर पाहू काय करायचं! पण तोपर्यंत उशीर झालेला असतो. आठवीच्या आधीच्या वयात करीअरच्या दृष्टीने घेण्यात येणाऱ्या चाचण्या वेगळ्या असतात. करीअर कौन्सेलिंगचा पहिला टप्पा : वयाच्या तिसऱ्या ते चौथ्या वर्षी करीअर कौन्सेलिंगचा दुसरा टप्पा : पाचव्या वर्गातील हिवाळ्यात करीअर कौन्सेलिंगचा तिसरा टप्पा : आठव्या वर्गातील हिवाळ्यात करीअर कौन्सेलिंगचा चौथा टप्पा : दहावीच्या हिवाळ्यात करीअर कौन्सेलिंगचा पाचवा टप्पा : बारावीच्या हिवाळ्यात करीअर कौन्सेलिंगचा सहावा टप्पा : पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षातील हिवाळ्यात करीअर कौन्सेलिंगचा सातवा टप्पा : पोस्ट ग्रॅज्युएशनच्या अंतिम वर्षातील हिवाळ्यात म्हणूनच प्रत्येक मुलाचे त्याच्या वयाच्या तीन वर्षांपासून तर बारावीपर्यंत पाच वेळा करीअर कौन्सेलिंग करायला हवे. ट्युशनसाठी लाखो रुपये खर्च करणाऱ्या पालकांना, ते पैसे व वर्ष अन् आरोग्य पणाला लावण्याआधी क्लासेसमध्ये प्रवेश घेण्याच्या आधीच करीअर कौन्सेलिंग करायला हवे. मुलांच्या आनंदासाठी व हट्टासाठी लाखो रुपये खर्च करणाऱ्या पालकांना अजूनही हे कळत नाही की, करीअर कौन्सेलिंग फक्त एकदा करून भागत नाही. जसे वाहन चालवताना आपल्या सुरक्षेसाठी रस्त्यावरील वाहतुकीकडे सतत लक्ष देण्यासाठी रस्त्याकडे सातत्याने पाहावं लागतं अगदी तसेच चांगले करीअर घडविण्यासाठी अनेकदा करीअर कौन्सेलिंग करावं लागतं.



## स्वार्थाचा सन्मान । करू नये ।।

सारासार शुद्ध । करावा विचार ।।
उगा व्याभिचार । करू नये ।।१।।

देहाचे चोचले । विनाशा कारण ।।
आयुष्य तारण । ठेऊ नये ।।२।।

संगतिचे भान । ठेवा निरंतर ।।
नामात अंतर । राहू नये ।।३।।

व्यासंगाशी संग । करावा सदैव ।।
आणिकाशी भाव । देऊ नये ।।४।।

आपुल्या हीताचा । राखा स्वाभिमान ।।
स्वार्थाचा सन्मान । करू नये ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## कर्तृत्वाची गाथा

कर्तृत्वाचे पाठ, गाती भाट असा हा हिंदू भूमीचा थाट उत्तम
कर्तृत्वाचे व्यक्ती उदात्त आदर्शाची अशी वहिवाट...१
शिवबा, ताराराणी, लक्ष्मीबाई संताजी धनाजी अहल्याबाई
किती किती नावं घ्यायची बाई उज्ज्वल परंपरा ही
भारताची...२
कर्तृत्वाची गाथा गाती इथली काळी माती कडे कपारीतुनी
झिरपती कविता अभिमानाची...३
गर्व मला माझ्या देशाचा बहरलेल्या कर्तृत्वाचा अनेक
आदर्शांचा उजळे दीप जीवनाचा...४
थांबत नाही, थकत नाही लेखणी माझी झुकत नाही सतत
नजरेसमोर असती नित्य विद्वानांची कहाणी...५
ज्ञानेश्वर, तुकोबा, रामदासी विवेकानंद, सावरकर इत्यादी
कर्तृत्वातून जाणीव कर्तव्याची राहील आमुच्या कायम उरी...६

वंदना देशपांडे



## अग्निफुले

याद राखा आतंकवाद्यांनो पार्थ झाला आता
जागा पळण्यास भुई थोडी लपण्यास नाही जागा
जाती पंथ विसरुनी सारी ज्ञाती एक झाली
जाण आली भारताला सारी भ्रांतीच निमाली
आम्ही सारी अग्निफुले वेळ येताची पेटतो
अग्नी साऱ्या अंगोपांगी काळ येताचि प्रगटतो
गांडीवाचा टणत्कार पंचजन्याचाहि रव
मारुतीचा भुभुत्कार दाखवील रौरव
झाला आहे भारताच्या हृदयावर हा वार
रक्त पिऊनीच शमेल अमुचीहि तलवार

रमेश ढाकुलकर

# रामायण नावाचा वटवृक्ष

कोणे एके काळी
स्वाती काळे (कोलारकर)

'रामायण' हे केवळ काव्य आहे की इतिहास, यावर अनेक विद्वानांनी आपली मते मांडली आहेत. आपल्या प्राचीन संस्कृतीत वाल्मीकि मुनी आद्यकवी आणि रामायण हे आदिकाव्य मानले जाते. हे आदिकाव्य सर्व रसांनी परिपूर्ण रसयुक्त काव्य आहे, असे वाल्मीकि मुनींनी बालकांडाच्या चौथ्या सर्गात सांगितले आहे. ''रसैः शृंगारकरुण हास्य रौद्रभयानकैः वीरादिभी रसैर्युक्तं काव्यमेतदगायताम्'' काही जणांनी याचा अर्थ रामायण कविकल्पित काव्य आहे असा काढला आणि हा अर्थ अतिशय चुकीचा आहे.

रामायण सर्व रसांनी परिपूर्ण आदिकाव्य आहेच; त्याचबरोबर आपल्या प्राचीन संस्कृतीचे द्योतक आहे. भारतीय समाजमन रामराज्यात वसलेलं आहे. घराघरांतील प्रत्येक श्वासावर रामायणाचं अधिराज्य आहे. रामायण भारतीय संस्कृतीचा दिव्य आरसा आहे. भारतीय संस्कृतीचे तलम प्रतिभाशाली महावस्त्र वाल्मीकि रामायण भारताचा जाज्वल्य इतिहास आहे. रामायण म्हणजे प्रत्यक्ष घडलेला इतिहास हा अर्थ एका श्लोकातून निश्चित होतो आणि रामायणाचे ऐतिहासिक महत्त्व आपल्याला पटते. वाल्मीकि रामायण या अद्भुत आणि अलौकिक इतिहास गाथेतूनच जनसामान्यांना स्फूर्ती मिळाली. अशी कथा आहे की, एके दिवशी प्रभू राम सिंहासनावर बसले असताना अचानक त्यांची अंगठी जमिनीवर पडली. त्या अंगठीमुळे जमिनीवर एक छिद्र निर्माण झाले आणि त्यातून ती अंगठी पाताळ लोकात घरंगळत गेली. तत्काळ वीर हनुमान ती अंगठी शोधायला पाताळलोकी रवाना झाले. हनुमानाजवळ अतिसूक्ष्म किंवा विराट रूप धारण करण्याची दिव्यशक्ती आहेच. पाताळ लोकीच्या राण्यांनी त्याला पकडलं आणि भूत राजाच्या जेवणाच्या थाळीत ठेवलं. हनुमानाचा रामनामाचा जप सुरूच होता. भूत राजाने त्याला विचारलं, ''तू येथे पाताळ लोकात कशासाठी आलास?'' त्यावर वीर हनुमान म्हणाले, ''मी माझ्या रामाची अंगठी घेऊन जायला आलोय.'' भूत राजा हसला. त्याने जवळच ठेवलेल्या थाळीतील हजारो अंगठ्या दाखवल्या. त्या सर्व अंगठ्या रामाच्या होत्या. ''या अंगठ्यांमधून तुझ्या रामाची आत्ता घरंगळत आलेली अंगठी ओळख आणि घेऊन जा.'' हसत हसत राजा बोलला. सर्व अंगठ्या सारख्याच होत्या. ''मला नाही ओळखू येत आहे माझ्या रामाची अंगठी.'' हनुमान बोलला. त्यावर भूत राजा म्हणाला, ''या थाळीत जेवढ्या अंगठ्या आहेत तेवढे अवतार रामाने पृथ्वीतलावर घेतले. जेव्हा तू यातील एक अंगठी घेऊन पुन्हा पृथ्वीवर जाशील तेव्हा तुझा राम तुला दिसणार नाही. कारण जेव्हा जेव्हा रामाचे अवतार कार्य संपते तेव्हा तेव्हा त्याच्या बोटातून अंगठी घरंगळत खाली येते. रामाची भेट म्हणून मी सगळ्या अंगठ्या जपून ठेवल्या आहेत.'' वीर हनुमान खिन्न मनाने पृथ्वीवर गेले. या गोष्टीचा मथितार्थ असा की, रामायण चिरकालीन आहे. काळाच्या असंख्य आवर्तनांमध्ये युगानुयुगे घडले आहे. भूत राजाच्या म्हणण्याप्रमाणे ते प्रत्येक युगात घडत असेलही. वाल्मीकि मुनींनी ते छंदोबद्ध केलेच; पण त्यातून रामायणाच्या हजारो मौखिक परंपरा जन्माला आल्या. जनमानसात रुजलेल्या या मौखिक परंपरांमुळे रामाने असंख्य जनसामान्यांच्या मनावर राज्य केले. मौखिक परंपरांमध्ये काही प्रसंगांमध्ये मूळ प्रसंगांशी फारकत आहे. काहींचे कथाबीज वेगळे आहे, पण या सर्व कथांचा अभ्यास करणे, वाल्मीकिंच्या मूळ रामकथेशी तुलनात्मक जुळवणी करणं हे सगळं करताना आपलं भावविश्व समृद्ध होतंच; त्याचबरोबर रामायण नावाच्या चिरकाल वाहणाऱ्या प्रवाहातला एक बिंदू होण्याचे भाग्य आपल्याला लाभते.



तामिळ भाषेतील कंब रामायणात सीताहरणाच्या प्रसंगात रावण सीतेला स्पर्श करायला घाबरतो. त्यामुळे पृथ्वी खणून भुयारातून तिला लंकेला घेऊन जातो. वाल्मीकिंची अहल्या इंद्राचा आपले पती समजून आनंदाने स्वीकार करते. कंबच्या अहल्येला माहीत असतं की ती चूक करते आहे, पण ती स्वत:ला आवर घालू शकत नाही. संत तुलसीदास यांचे 'रामचरितमानस' उत्तर भारतात प्रसिद्ध आहे तसंच महाकवी कंब उर्फ कंबन यांनी रचलेले रामायण तामिळनाडूमध्ये खूप प्रसिद्ध आहे. आद्यकवी वाल्मीकिंचे रामायण विविध रसांनी परिपूर्ण आहे. पण अद्भुत रस हा वाल्मीकि रामायणाचा प्रमुख रस आहे. वाल्मीकि रामायणात इतिहास आणि अद्भुतता यांचा मनोहारी संगम आपल्याला जागो जागी दिसतो. रामाला वनातून परत आणण्याकरिता जेव्हा भरत सर्व प्रजाजन आणि सैन्यासह भरद्वाज ऋषींच्या आश्रमाजवळ जातो, तेव्हा भरद्वाज ऋषीने त्याला रामाच्या चित्रकूट पर्वतावरील आश्रम दाखवला आणि एक दिवस आश्रमात राहण्याचा आग्रह केला. ऋषीने ध्यानस्थ बसून देवांचा विश्वकर्मा त्वष्टा, यम, वरुण, कुबेर, इंद्र, सर्व नद्या, देव, गंधर्व, अप्सरा, वायू इत्यादींना बोलावले आणि त्यांना भरताच्या सर्व सैन्याची आणि लोकांची उत्कृष्ट भोजन व्यवस्था करायला सांगितली. क्षणार्धात तेथे मैदाने, प्रासादे, वसतिगृहे, गायन मंदिरे, नृत्य शाळा निर्माण झाल्या. अप्सरा अवतरल्या. सैनिक म्हणू लागले, ''भरताला सांगा. आम्ही आता अयोध्येला येत नाही. इथेच राहतो.'' हे वर्णन अद्भुत, विस्मयकारक आहेच; त्याचबरोबर भरत भेटीचा ऐतिहासिक धागा आपण सोडू शकत नाही. आदिम जमातींमधल्या राम लोककथांना एक वेगळेच सौंदर्य लाभले आहे. त्यात निसर्गाशी जवळीक आहे. पशुपक्ष्यांची भाषा आहे. संथाल आणि मुंडा जनजातींमध्ये अशी कथा आहे की, सीतेचा शोध घेण्यासाठी रामाला अनेक पशुपक्ष्यांची मदत झाली.

राम-लक्ष्मणाला जेव्हा वाटेत बगळा भेटला तेव्हा त्यांनी सीतेबद्दल विचारले. बगळा म्हणाला, ''माझा काय संबंध सीतेशी? मला माझ्या पोटाची चिंता.'' त्याचे हे उत्तर ऐकून लक्ष्मण चिडला आणि त्याने त्याची मानगुट पकडली. तेव्हापासून बगळ्याची मान लांब आहे. खारुताईने मात्र रडत सीता कोणत्या मार्गाने गेली हे सांगितलं आणि रामाने तिच्या पाठीवर हात फिरवला. बोराच्या झाडानेही सीतेबद्दलची माहिती रामाला दिली आणि तेव्हापासून बोरांना महत्त्व आले. हेच महत्त्व आपल्याला शबरीच्या गोष्टींमधून दिसते. मध्य भारतातील 'कोल' ही जमात स्वत:ला शबरीचे वंशज मानते. त्यांच्या प्रचलित कथेप्रमाणे लक्ष्मणाने उष्टी बोरे खाण्यास नकार दिला. त्यानंतर एका बाणाने लक्ष्मण जखमी झाला होता. त्याला प्रचंड वेदना होऊ लागल्या. जेव्हा लक्ष्मणाने शबरीची ती बोरे खाल्ली तेव्हाच त्याची वेदना थांबली होती. वाल्मीकि रामायणात मात्र शबरीने रामासाठी चांगली बोरे निवडून ठेवली होती. ती बोरे उष्टी नव्हती. कन्नड भाषेतल्या तंबुरी दासय्यामध्ये रवुला म्हणजेच रावण आणि मंदोदरीची मुलगी म्हणजे सीता. भगवान शंकर प्रसन्न होऊन रवुलाला आंबा चाखायला देतात. मंदोदरीला देण्याऐवजी रावण स्वत:च आंबा खातो आणि त्याच्या शिंकण्यातून सीता निर्माण होते. प्रायश्चित्त म्हणून सीतेला पेटीत घालून तो जनक राजाच्या क्षेत्रात सोडतो. कर्नाटकातील नागचंद्र यांनी अकराव्या शतकात लिहिलेले रामचंद्र पुराण असो किंवा गुजरातमधील गिरिधरांच्या रामायणाची कथा असो, प्रत्येक रामायणाचे स्वत:चे वैशिष्ट्य आहे. आसाममध्ये माधव कंदली तसेच उडिया भाषेत रचले गेलेले सिद्धेश्वरांचे 'विलंका रामायण' अतिशय प्रसिद्ध आहे. विलंका रामायणाचे वैशिष्ट्य असे की, त्यात रामापेक्षा सीता श्रेष्ठ दाखवली आहे. अद्भुत रामायणात तर सीता रावणाचा वध करते. ओडिसामध्ये 'दांडी रामायण' सर्वांनाच माहिती आहे. वाल्मीकिंनी रामायण अद्भुतरसात लिहिले आहे. त्यात पुष्पक विमानाचे वर्णन डोळे दिपवणारे आहे. विमानाला सोन्याचे गगनचुंबी स्तंभ होते. दारे हिऱ्यांनी मढवली होती. हे विमान इच्छागामी होते. युद्ध संपल्यानंतर रामाने सीतेच्या इच्छेनुसार लक्षावधी वानरांना आणि त्यांच्या वानर स्त्रियांना राज्याभिषेक पाहण्यासाठी विमानात बसवून घेतले. खरं तर रामाचे आयुष्य अतिशय करुण घटनांनी भरलेले होते; पण वाल्मीकि मुनींनी अद्भुततेबरोबरच विनोदाची शिंपडणही त्यात केली. रावणाचा भाऊ कुंभकर्ण याला झोपेतून जागा करण्याचा प्रसंग अतिशय विनोदी आहे. त्याच्या अंगावर मोठमोठे दगड, झाडांची खोडे फेकली, हत्ती-उंट चालवले, नगारेशंखांचा नाद केला तरी त्याची झोप उघडत नव्हती. वाल्मीकि रामायणाची भाषा अलंकारांनी समृद्ध आहे. विश्वामित्राने रामाची मागणी केली तेव्हा राजा दशरथ आपले वय सांगतो, ''षष्ठिवर्ष सहस्राणि जातस्य मम कौशिक'' ''हे कौशिका, माझ्या वयाला आता ६०,००० वर्षे झाले आहेत.'' सहस्र, शत हे शब्द अलंकारिक जोडलेले असतात. वाल्मीकिंचे रामायण सर्वरसपरिपूर्ण असा काव्य इतिहास आहे. त्यामध्ये सीता, तारा, मंदोदरी यांचा भावनोत्कट संवाद आहे.

रामायण काळात स्त्रियाही संध्यावंदन करीत. जेव्हा हनुमान अशोकवनात गेला तेव्हा सीता संध्या करायला गेली होती. तारा मंत्रविद् होती. वर, शाप-उ:शाप, स्वर्गप्राप्ती यावर लोकांची नितांत श्रद्धा होती. महाराष्ट्रातील आदिवासी जनजातींमध्ये रामकथेसंबंधी अनेक गाणी आहेत. विदर्भातील माडिया गोंडांची रामकथेची गाणी अतिशय सुरेल आहेत. प्रत्येक जनजातीने आणि संस्कृतीने राम कथा आपल्या प्रतिभेने सजवली. देश-विदेशातील प्रत्येक रामकथेला स्वत:चा असा स्वतंत्र बाज आहे. प्रादेशिक मातीचा सुगंध आहे. वाल्मीकि रामायणाचा वटवृक्ष शतकानुशतके सश्रद्ध भारतीय मनाला सावली देत उभा आहे. त्याला प्रादेशिक रामायणाच्या असंख्य पारंब्या आहेत. भारताच्या काव्य इतिहासाला मिळालेले हे लोकप्रतिभेचे कोंदण फारच मनोहारी आहे.

# ग्रीष्माच्या वळीव- वेळात भिजलेली ओलसर स्तब्धता

ऋतूरंग.....
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

सगळीकडे एक विचित्र तगमग आणि अस्वस्थता पसरून राहिलेली असते. सारी सजीव सृष्टी होरपळून जात असताना एखाद्या शांत, संथ आणि निरव दुपारी आभाळात कुठून तरी एक काळसर ढग सूर्याच्या आड येतो. अचानकपणे आलेली ही सावली सगळ्यांना हवीहवीशीच असते. मग झाडांच्या पानांची सळसळ सुरू होते. वाऱ्याच थैमान सुरू होतं. झुळूक ते वादळ असं त्याचं रूपांतर पाहता पाहता आपल्या समोर घडून येत. आणि एकदम एखाद्या नाटकात अचानक पडदा उघडावा तसा विजेच्या लखलखीत प्रकाशात वळीव आपला खेळ सुरू करतो. हा वळीव म्हणजे पावसाची अट मोडून अचानकपणे घुसणारा, वळणं घेणारा अगदी उनाड पोरानं ट्रॅफिक तोडून ट्रॅफिक पोलिसाला चकवून निघून जावं तसा काहीसा...

चालता चालता अचानकपणे आठवलेली गाण्याची एखादी लकेर गुणगुणावी आणि त्या पुढील ओळ सापडू नये तसा हा वळीवाचा पाऊस म्हणजे आला आला आणि गेला गेला अशी अनुभूती देणारा. त्याचं नैसर्गिक रूप जितकं नाजूक आणि स्वाभाविक, तितकंच त्याचं

मानसशास्त्रीय स्वरूप क्षणाचाही भरवसा धरू नये हे सांगणार तर तत्त्वज्ञानाचं स्वरूप खोल अध्यात्मासारख प्रमाणापेक्षा दाह वाढला की तो शांत करणारी परियोजना नैसर्गिकरीत्या उपलब्ध असते हे सांगणारा.

आजकाल आपल्या शहरात वळीवाचा पाऊस बरसला की गाड्यांचे हॉर्न वाढतात, सिग्नल विस्कळीत होतात, गर्दी वाढते नव्हे चालणारी गर्दी एके ठिकाणी थांबते. अनेकांच्या चेहऱ्यावर हे काय अचानक? असे प्रश्नचिन्ह उभे राहते. घड्याळाच्या स्पर्धेत आपण हरतो की काय? अशी अनाठाई भीती उत्पन्न होते. मात्र त्याचवेळी खेड्यात हा वळीव म्हणजे जणू एक धमाल नाट्याचा आदेश घेऊन आलेला असतो.

एखादी गोष्ट पुन्हा नव्यानं सुरू होणं. उन्हातान्हाने करपलेल्या काळ्या मातीत त्या एका पावसाच्या सरीमुळे हसू फुलतं. काही गावांत अजूनही वळीवाच्या पहिल्या सरीवर वाण घेऊन डोंगरावर देवाला नैवेद्य वाहतात. लहान मुलं झिम्माड पावसात भिजायला सुरुवात करतात.



पावसात भिजून निपचीत स्तब्ध असलेले पक्षी आपले घरटे बांधण्यापूर्वीच हा पाऊस कसा आला असावा ह्यांचा विचार करत तर करत बसलेली नसतील ना? असं मला वळीवाच्या पावसानंतर विजेच्या तारेवर ओळीने बसलेल्या चिमण्या किंवा सुगरणी दिसल्या की वाटते. पाऊस आणि मोर यांचं नातं तर अतुट आहे, म्हणजे ढगांचा कापूस पिंजला की मोराचं पिसारा फुलवून नाचणं ओघान आलंच. पण अशा या अवेळीच्या पावसामुळे म्हणजे मोरही गोंधळतो.

आभाळात काळसर ढग येतात, पण हा पावसाळा नाही. मोर पिसारा फुलवतो आणि नाचतो, आणि लगेच ढग फसवतात. पिसरा फुलवून ऐटबाज मोराने पाय उचलून ठेका धरावा आणि बघता बघता पाऊस निघून जावा, ग्रीष्माच चकचकीत ऊन पडावं आणि या उन्हात जर आपण नाचत राहिलो तर संपूर्ण सृष्टी आपल्याला वेड्यात काढेल या विचाराने मोर आपला पिसारा आणि नाच आवरत घेऊन मुकाट सावली जवळ करतो.

तहानलेला चातक पहिल्या पावसाच्या सरीने तहान भागून आपला पाण्याचा उपवास सोडायचा असं ठरवून बसलेला असताना हा वळीवचा पाऊस त्याची चांगलीच गफलत करतो. हीच गफलत झाडांच्या पानांमध्ये, गुरांच्या डोळ्यांत, आणि माणसांच्या मनातही निर्माण करून हा वळीव फसवतो. तो पाऊस थेंबाच्या रूपात येतो, पण हे खरं येणं नसतंच. एक झोत येतो आणि थांबतो.

शेवटी वळीव म्हणजे निसर्गाची शंका, निश्चय नव्हे. हा वळीवाचा पाऊस म्हणजे खऱ्या अर्थाने खोटा पाऊस असे म्हणायला हरकत नाही. शंकर पाटील यांचा वळीव नावाचा एक पाठ आम्हाला होता त्यात पायाळू माणसाला विजेची भीती असते असे वर्णन पहिल्यांदा वाचले होते. पुढे नोकरीनिमित्ताने खेड्यात शिक्षक म्हणून कार्य करत असताना जवळपास प्रत्येक खेड्यात वळीवाशी निगडित अंधश्रद्धा असतात. कुणी म्हणतात, वळीव आला की खंडोबाला नारळ

**साधारण मे महिन्याचा सर्वत्र ग्रीष्माची उन्हं अस्वस्थ करणारी असतात. वैशाख निरोप घेत असतो आणि जेष्ठ साधारणपणे दारात उभा असतो आणि अश्यावेळी जणू आकाशाच्या तोफेतून सूर्याचा गोळा फुटायच्या उंबरठ्यावर येऊन थांबलेला असतो.**

फोडावा लागतो. कुणी म्हणतात, वळीव जर वाऱ्याने आला विहिरी जवळच्या आसराया आसरा शोधत गावात येतात.

वळीवाच्या पाण्यात भूतावळी उठतात की नाही ते मला माहीत नाही मात्र वळीवाच्या पावसात, विजेच्या कडकडाटात, वाऱ्याच्या थैमानात पिसाळलेली बाभूळ भूतासारखी अस्ताव्यस्तपणे झुलत असते हे मी पाहिले आहे. अनेक गूढ आणि भय कथा वळीवात जन्माला येतात. वळीवाच्या पावसाने कोणते पीक अंकुरते तर ते हे असे भ्रामक कथाचे आणि पुढे ह्या कथा पिढ्यानपिढ्या सांगितल्या जातात. जुनाट दारू सारखी त्यांची नशा वर्षानुवर्ष वाढत जाते. ह्या कथा खऱ्या की खोट्या माहित नाही, पण वळीवातल्या ह्या लोककथा लोकांच्या मनात खोल रुतलेल्या असतात.

**पहली बारिश की बूंदों में कुछ तो बात है,**
**हर दिल पुराना ज़ख़्म फिर ताज़ा कर देती है।**

ही वळीवाच्या पावसाची सर म्हणजे जणू स्मृतींचा अल्बम उघडल्यासारखी. मनाच्या पानांवर जुन्या आठवणींचा ओलसर गंधित दरवळ शिल्लक ठेवणारी तुकाराम म्हणतात:

**वळीवाचे रूप निराळे,**
**कधी हसे, कधी रडे काळे.**

अशी उदाहरणे पाहिली तर अभंगातही वळीवाचा उल्लेख येतो. संत साहित्याने या वळीवाच्या पावसाच्या रूपांना आध्यात्मिक अर्थ दिला. वळीव म्हणजे एक प्रकारचं शुद्धीकरण.

मनाच्या कोरड्या आणि वाळलेल्या जमिनीवर ओलावा पसरवणारा. अल्पायुषी असलेल्या पावसाच्या सरींचा शिडकाव झाल्यावर अंगावर गच्च पानांचे पांघरून घेतलेल्या झाडाखालची जमीन अनेक वेळा कोरडे राहते मात्र वडाच्या झाडाखाली वळीवाचा पाऊस पडलाच तर सावलीची देवता रागावते, असं म्हणतात. ते का म्हणतात हे आजपर्यंत मला कळलं नाही. आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे सावलीची देवता कोणती? याचा उलगडा अद्याप पर्यंत झाला नाही. वडाचं झाड मात्र, वळीवात सगळ्यांना आश्रय देत. लहानपणी आमची मोठी माणसं म्हणायची, की बाभळीच्या झाडावर वळीव पडलं की काटे गोड होतात. आता त्या काळात साखरेचा तुटवडा असला तरी ते गोड काटे खाऊन पाहण्याचे धाडस माझ्यासमोर तरी कोणत्या माणूस प्राण्याने केले नाही. मात्र कधीकाळी आमच्या घरचे बकरी आणि तिची पिल्ले ज्या चवीने ते कोवळे काटे खात त्यावरून ते बहुता गोडच लागत असावेत. विज्ञानाच्या नजरेतून पाहिलं, तर फुलांच्या आणि कळ्यांच्या प्रक्रियेमध्ये वळीव महत्त्वाची भूमिका बजावतो. वळीवाचा गारवा फक्त शरीरालाच नव्हे, तर मनालाही स्पर्शून जातो. अनेक वेळा वळीवाची चाहूल गंभीर असते. एकदा आमच्या मेहेकर मध्ये आमच्यासमोर वळीवाचा पाऊस गारा घेऊन आला. जमीनीवर येऊन पडलेल्या आणि फुटलेल्या दोन गारांचा बर्फ बादलीभर रुपांतरीत झाल्याचा मी स्वतः पाहिलेला आहे. त्यावेळी साडे नऊ किलो वजनाची गार मेहकर मध्ये मोजण्यात आली. या वर्षी नंतर म्हणजे साधारण १९९५-९६ नंतर मेहकर मधल्या खाजगी किंवा सरकारी कर्मचारी वसाहती, कचेऱ्या या वरील कौलारू आणि सिमेंटचे पत्रे हद्दपार झाली. कारण पाच सहा मिनिटांच्या या गारपीटीत कौलारू आणि सिमेंटची पत्रे नष्ट झाली होती. वळीवाच्या गारा पडत असल्या की मेंढ्या राखायला जाणारा धनगर तेवढा निश्चिंत असायचा कारण रपारपा पडणाऱ्या गारा तो दुसऱ्या दिशेने वळवायचा असं कुणीतरी सांगितलं होतं मला, धनगर समाजाच्या मित्रांना त्या बद्दल विचारले तर तसा प्रकार होता मात्र आता ती विद्या कोठे उरली नाही असं ते सांगतात.

वळीव म्हणजे केवळ पाऊस नव्हे- तो एक अनुभव असतो. तो निसर्गाचा हळवा आणि वेल्हाळ स्पर्श असतो, मनाच्या आत खोल झिरपणारी ओल असून. वळणं घेणारा, पण थेट हृदयाला भिडणारा गारवा पेरणारा नाठाळ सखा असतो.

वळीवाच्या पावसाचा एक वेगळा चेहरा ग्रामीण भागात त्यातही स्त्रियांना अधिक जाणवतो. उन्हाळ्यात झळाळलेली जमिनीवरची राख त्यांना कधी भानामतीच्या अंगाऱ्यासारखी वाटते. अंगण झाडत असताना माती उडते आणि श्वासावर ह्या मातीचा गालिचा पसरतो. ग्रामीण नजरेतून वळीव म्हणजे केवळ पाऊस नव्हे- तो एक उबदार थेंब असतो, जो अंगणाच्या दगडांवरून थेट मनापर्यंत पोचतो. या वळीवाच्या थेंबाना गावातील सवाष्णी वळण घेणाऱ्या वाऱ्यात ओल्या गोधडीसारख्या आठवणी लपेटून घेतात.

(पान ६ वर)



पान१ वरून

## याचना नहीं, रण होगा...

यामुळे पाकिस्तानातील त्या जिहादीचे स्वातंत्र्यदेखील संपुष्टात आले, जे आतापर्यंत कोणत्याही भीतीशिवाय दहशत पसरवत होते. त्याचप्रमाणे भारतीय हवाई दलाने पाकिस्तानच्या हवाई संरक्षणाला पूर्णपणे ठप्प केले.

अवघ्या २३ मिनिटांत केलेल्या अचूक आणि जलद कारवाईने, पाकिस्तानच्या सुरक्षा व्यवस्थेचा पर्दाफाश झाला. 'राफेल' लढाऊ विमानांच्या 'स्काल्प' क्षेपणास्त्र आणि 'हॅमर' बॉम्बमुळे, कोणतेही नुकसान न होता मोहीम पूर्ण केली, ज्यामुळे भारताची तांत्रिक आणि सामरिक धार सिद्ध झाली. धक्कादायक म्हणजे इस्लामाबाद ते कराची असा पाकचा कणाच तोडण्याचे काम भारताने केले आहे.

भारताच्या या नव्या रूपाचे वर्णन करायचे झाल्यास, राष्ट्रकवी रामधारी सिंह दिनकर यांच्या ओळीच चपखल आहे.

हरि ने भीषण हुंकार किया,
अपना स्वरूप-विस्तार किया,
डगमग-डगमग दिग्गज डोले,
भगवान् कुपित होकर बोले
जंजीर बढ़ा कर साध मुझे,

## 'ऑपरेशन सिंदूर' आणि भारताची...

आताही पाकिस्तानविरुद्ध संघर्ष सुरू असताना भारताची परराष्ट्रनीती सुरळीत सुरू आहे; ब्रिटनसोबतचा मुक्त व्यापारी करार हे त्याचेच द्योतक. भारताच्या सुरक्षा आव्हानांविषयी ठाम मतप्रदर्शन आणि आपली बाजू सशक्तपणे मांडणे, हे आता भारतीय राजदूतांना अवगत झाले आहे.

'कलम ३७०' काढून टाकल्यानंतर काश्मीरातील घडामोडी, तेथील विकासकामे, शांतता आणि स्थैर्य स्थापण्याचे प्रयत्न याविषयी जगाला माहिती देणे; त्याचबरोबर पाक-व्याप्त काश्मीरमधील समस्या, तेथील मानवाधिकारांचे उल्लंघन, हे विषयही जगासमोर मांडण्यात आपली यंत्रणा यशस्वी झालेली दिसते. सध्याच्या संघर्षातदेखील उच्च पातळीवरील सततचा संवाद महत्त्वाचा ठरला आहे.

गेल्या तीन दिवसांत भारताच्या विविध देशांतील राजदूतांनी आंतरराष्ट्रीय वृत्तवाहिन्यांना मुलाखती दिल्या आहेत. तसेच या आव्हानाच्यावेळी भारताची राजकीय परिपक्वता आणि एकीही जगासमोर आली आहे, ज्यात विरोधी पक्षांनी सरकार आणि भारतीय सैन्यदलांना दिलेला पाठिंबा महत्त्वाचा ठरतो. काँग्रेसचे शशी थरूर हेदेखील आंतरराष्ट्रीय वृत्तवाहिन्यांसमोर समर्पकपणे मुलाखत देताना दिसले, ज्यातून देशाची 'वयं पंचाधिकम् शतम्' ही भूमिका जगासमोर आली. याविरुद्ध, सदर संघर्षात पाकिस्तानची भूमिका मात्र विस्कळीत आणि आतताईपणाची दिसली. उच्चपदस्थांच्या वक्तव्यांमध्ये सुसूत्रता नसणे, नागरी आणि लष्करी नेतृत्वामधील मतभेद, नागरी नेतृत्वाचा लष्करावरील ताबा सुटलेला दिसणे, हे प्रामुख्याने जाणवले. अर्थात ही पाकिस्तानची जुनीच समस्या असून, त्याच्याकडून त्याहून वेगळ्या वर्तनाचा अपेक्षाच नाही. आज दहशतवादावरून पाकिस्तानची जागतिक विश्वासार्हता ढासळली आहे. नुकत्याच पार पडलेल्या सुरक्षा परिषदेच्या बैठकीत सदस्य राष्ट्रांनी पाकिस्तानला धारेवर धरून, त्याच्या 'लष्कर-ए-तोयबा'सारख्या दहशतवादी संघटनांशी लागेबंधे असण्याविषयी प्रश्न विचारले. पाकिस्तानचा कांगावेखोरपणा आणि खोटी माहिती पसरवण्याची मोहिमदेखील वेळोवेळी उघडी पडताना दिसते आहे.

एकीकडे खोटारडेपणा करणारा आणि आर्थिक-लष्करी सामर्थ्य नसतानाही केवळ लष्करातील दहशतवादी मानसिकतेमुळे संघर्ष वाढवण्याकडे कल असलेला पाकिस्तान आणि दुसरीकडे राष्ट्रहिताच्या रक्षणासाठी परिपक्व तरीही प्रमाणबद्ध कारवाई करणारा भारत, या दोहोंमधील फरक यातून स्पष्टपणे अधोरेखित होतो. आज भारताच्या बाजूने अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, रशिया, इस्रायल असे देश असताना, पाकिस्तानच्या मागे ठामपणे केवळ तुर्की हा एकच देश दिसतो. सध्याच्या संघर्षाचे परिणाम कसे आणि काय असतील, हे सध्या निश्चित सांगता येणार नाही. मात्र, यायोगे समोर आलेली भारताची समर्थ परराष्ट्रनीती ही मात्र एक विश्वासार्ह आणि आश्वस्त करणारी बाब आहे, यात शंका नाही.

## Summer Mating

विशेष
चन्द्रशेखर टिळक
भ्र. ९८२०२९२३७६

आज माझ्याबाबत दोन घटना एकापाठोपाठ एक घडल्या. त्या तशा न ठरवता घडल्या. म्हणून असेल कदाचित... पण माझ्या नकळत माझे मन त्या दोन घटनांची एकमेकांशी सांगड घालू लागले. झाले असे...

मी गेला महिना- सव्वा महिना आधी अमेरिका आणि आता इंग्लंडला माझ्या जवळच्या नातेवाईकांकडे आलो आहे. हे दोन्ही देश वेळेच्या बाबतीत आपल्या भारतातील वेळेच्या मागे आहेत हे आपण सगळेच जाणतो.

आज जेंव्हा मला इंग्लंडला असताना कळले की आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता आपल्या राष्ट्राला उद्देशून संबोधन करणार आहेत तेव्हा माझी आजची नियोजित भ्रमंती रद्द करून इंग्लंडमधली माझ्या नातेवाईकांच्या घरीच राहून आपल्या पंतप्रधानांचे हे भाषण ऐकले. त्या भाषणानंतर संध्याकाळी फेरी मारायला माझ्या नातेवाईकबरोबर त्यांच्या घराजवळील नदीच्या काठाने फिरायला गेलो. त्या सार्वजनिक जागेत अगदी जंगल म्हणावे झाडे- झुडपे आहेत. ती पाहून माझे नातेवाईक मला सांगत होतें की इंग्लंड- अमेरिकेत एक अशी पद्धत आहे की सार्वजनिक जागेतले अगदी एक छोटे झुडूप सुध्दा ते एप्रिल आणि मे महिन्यात छाटत सुध्दा नाहीत... कापणे तर सोडूनच द्या; त्यामुळे उपटून टाकणे तर दूरच राहीले. असे झुडपे या काळात न कापण्याचे कारण म्हणजे या काळात फुलपाखरे आणि इतर कीटक यांचा प्रजननाचा काळ असतो. त्यामुळे ही मंडळी अशा काळात झाडे- झुडपे यांच्या सहवासात जास्त असतात. त्यांच्या मनात झुडपे कापण्याची शंका- आशंका- भीती राहिली तर ती मंडळी या काळात झाडे- झुडपांकडे कमी फिरकतात. त्यांच्या अशा कमी किंवा न फिरकण्याचा फुलपाखरासहीत इतर किटकांवर तर विपरीत परिणाम होतोच; पण झाडे- झुडपाच्यावरही विपरीत परिणाम होतो. या साऱ्यांच्या सुखरूप, सकारात्मक संवर्धनासाठी निःसंदिग्ध ग्वाही देण्याची आवश्यकता असते. त्या निःसंदिग्ध ग्वाहीची पूर्तता झाडे- झुडुपे न कापण्यातून दिली जाते. आणि म्हणून एप्रिल- मे या दोन महिन्यात अशी झाडे- झुडपे न कापण्याच्या या प्रक्रियेला Summer Mating असे म्हणतात.

पंतप्रधानांचे राष्ट्राला उद्देशून केलेले विवेचन आणि summer Mating ही संकल्पना या दोन गोष्टी एकापाठोपाठ ऐकल्याने असेल कदाचित... पण तेंव्हापासून सारखे मनात येते आहे...

१. आपल्या पंतप्रधानांनी आजच्या त्यांच्या संबोधनातून तुमच्या- माझ्यासारख्या सर्वसामान्य देशप्रेमी भारतीय नागरिकांना अशीच निःसंदिग्ध ग्वाही दिली आहे की, पहलगाम हल्ल्याने विचलित होऊ नका. त्याचा यथोचित, पुरेपूर बंदोबस्त करण्यास भारतीय लष्कर समर्थ आहे आणि तसे वागण्याची केंद्र सरकारने भारतीय लष्कराला पूर्ण मुभा दिली आहे. याबाबत भारतीय लष्कराच्या सामर्थ्याचे एक पानही तोडले जाणार नाही

२. आपल्या पंतप्रधानांच्या भाषण वेळेच्या दृष्टीने छोटेखानी आहे. पण त्याची जातकुळी पक्की समझनेवाले को इशारा काफी हैं अशी आहे. उत्स्फूर्त उत्साह आणि संयमी सामर्थ्य याचे एक पानही त्या भाषणात खुडलेले नाही.

३. पहलगाममधले २२ एप्रिल २०२५ रोजीचे दहशतवाद्यांचे कृत्य आणि त्यानंतरच्या आपला भारत आणि पाकिस्तान यांच्यातील घडामोडी या पार्श्वभूमीवर जगातील सध्याच्या परिस्थितीतील एकमेव महासत्ता अशा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धबंदी घडवून आणल्याची चर्चा समाजमाध्यमे आणि प्रसारमाध्यमे यात रंगली होती. त्या चर्चेला आपल्या पंतप्रधानाच्या आजच्या विवेचनात एका शब्दानेही उल्लेखच करण्यात आले नाही. त्यामुळे त्या चर्चेचे झुडूप कापलेले नाही. पण पंतप्रधानांनी त्यांच्या विवेचनात देशाच्या सार्वभौमत्त्वाचे पाखरू मात्र अबाधित ठेवले आहे.

४. इतकेच नव्हे, तर एकाही शब्दाची काटछाट न करता अमेरिका आणि पाकिस्तान सहीत सर्वच देशांना पंतप्रधानांच्या आजच्या भाषणात निःसंदिग्ध शब्दात सांगण्यात आले आहे की आपला देश यापुढे पाकिस्तानशी फक्त दहशतवाद आणि पाकव्याप्त काश्मीर याच विषयावर बोलेल.

५. आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आजच्या भाषणात त्यांनी पाकिस्तानचा अपवाद वगळता इतर कोणत्याही देशाचा नावनिशीवार उल्लेख करण्यात आलेला नाही. त्या अर्थाने कोणतेही झुडूप तोडण्यात आलेले नाही. पण तरीही विचार आणि कृती यांचे इतके अतूट Summer Mating साधण्यात आले आहे की यापुढे रक्त आणि पाणी एकाचवेळी वाहणार नाही याचे स्पष्ट संकेत देण्यात आले आहेत.

६. नेमका असाच काहीसा प्रकार शस्त्रास्त्र- क्षेपणास्त्र यांचे भारतीय उत्पादन व त्यांचा दर्जा याचाबाबताचा उल्लेखात साधण्यात आला आहे.

असे सगळे मनामधे घोळत असताना बाजूच्या नदीत हा राजहंस पोहताना दिसला. कसलीही घाई नसलेला. जबरदस्त आत्मविश्वास असलेला. सामर्थ्य आणि संयम यांची पुरेपूर जाणीव असलेला. त्यांच्याच शांतीला अर्थ असतो ज्यांच्यात शांती पेलण्याचे सामर्थ्य असते. तो राजहंस एक...आणि हा राजहंस... भारतीय लष्कर आणि पंतप्रधान.

पान १ वरून

## अमेरिकेचा डबल गेम!

अमेरिकेला हव्या असलेल्या दहशतवादाला आधी आपल्या देशात आश्रय द्यायचा, योग्य वेळी त्याला अचानक अटक केल्याचे नाटक करायचे आणि भरभक्कम आर्थिक मदतीच्या आणि राजकीय पाठिंब्याच्या बदल्यात त्या दहशतवाद्याला अमेरिकेच्या स्वाधीन करायचे, हीच पाकिस्तानची वर्षानुवर्षांची खेळी. अशी अनेक उदाहरणे आहेत.

पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांकडे दुर्लक्ष करण्यात अमेरिकेचे सामरिक आणि राजनैतिक हितसंबंध गुंतलेले आहेत. पाकिस्तानी भूमीचा वापर करून अमेरिकेला इराण, अफगाणिस्तान, भारत, चीन आणि रशिया या साऱ्या देशांवर नजर ठेवता येते. तालिबान्यांविरोधातील संघर्षात पाकिस्तानचे महत्त्व अतोनात वाढले होते, त्यामागे हेच कारण होते. अफगाणिस्तानवर हवाई हल्ले करण्यासाठी अमेरिकेला पाकिस्तानातील जाकोबाबाद विमानतळाचा वापर करता येत होता. त्याबदल्यात पाकिस्तानला अब्जावधी डॉलर्सच्या लष्करी साहित्याची आणि आर्थिक मदत मिळत होती. आताही परिस्थिती बदलेली नाही. आता इराण आणि भारत यांच्या विरोधात कारवाईसाठी अमेरिकेला पाकिस्तानची मोठी मदत होते. गेल्या काही वर्षांत पाकिस्तान जवळपास चीनच्या आहारी गेला होता. चीनने पाकिस्तानलाअब्जावधी डॉलर्सचे कर्ज देऊ केले आणि आपला 'बेल्ट अ‍ॅण्ड रोड' हा प्रकल्प त्या देशात सुरू केला. ग्वादर बंदराची उभारणी करून तेथून बलुचिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमार्गे थेट तिबेटपर्यंत मोठा व्यापारी महामार्ग बांधला गेला. त्यामुळे चिनी माल पूर्वेकडील देशांना वळसा घालून जाण्याऐवजी थेट अरबी सागरातून युरोप व अमेरिकेला जाऊ लागला. परिणामी, चीनच्या दृष्टीनेही पाकिस्तानचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

काही राजकीय विश्लेषकांनी पहलगाम हत्याकांड हे चीनच्या सांगण्यावरूनच केले गेल्याचा तर्कदेखील मांडला आहे. कारण, चीनमधून अनेक कंपन्या आपले उत्पादन प्रकल्प अन्य देशांमध्ये नेत आहेत. त्यांचे सर्वोच्च प्राधान्य भारतालाच आहे. कारण, भारताचा औद्योगिक पाया विशाल असून तेथे स्वस्तात कुशल मजूर आणि तंत्रज्ञ उपलब्ध आहेत. शिवाय भारत हीच एक फार मोठी बाजारपेठ आहे. परिणामी, चीन भारतावर चिडला आहे.

भारतात अंतर्गत दंगली आणि पाकिस्तानबरोबर युद्धसदृश्य स्थिती उद्भवल्यास या कंपन्या आपले कारखाने भारतात हलविणार नाहीत, असा चीनचा कयास होता. यातून एकच गोष्ट स्पष्ट होते. ती म्हणजे भारताला आपल्या हितसंबंधांची जपणूक स्वतःच करावी लागणार आहे. तसेच दहशतवादविरोधातील लढाईही स्वबळावरच लढावी लागेल.

चीन आणि पाकिस्तान हे तर भारताचे उघड शत्रू देश आहेत. पण, अमेरिकाही याबाबतीत हात आखडता घेऊनच भारताची मदत करील, हे दिसून आले. एकीकडे जागतिक दहशतवादविरोधी लढ्याची आरोळी ठोकायची आणि त्या दहशतवादाचे उगमस्थान असलेल्या पाकिस्तानला चुचकारायचे, हा अमेरिकेचा 'डबल गेम' भारताने निश्चितच ओळखला असेल.

# नाना विचारणा करावी, अरिमित्रांची

संत

प्रकाश एदलाबादकर

मैत्री' किती अर्थपूर्ण शब्द आहे. एखाद्याशी आपले मैत्र जुळले तर तो आपला मित्र म्हणवतो. परंतु हे मैत्र जुळणे सोपे असते का? मुळीच नाही. स्वार्थापोटी मैत्री करणारे, आपले काम साधून घेण्यासाठी मैत्री करणारे असे अनेक जण आयुष्यात येतात. स्वार्थ साधला की यांची नाही. नातेसंबंधांच्या आणि मैत्री संबंधांच्या भ्रामक मृगजळाने आपल्यावर गारुड केलेय. कुणावर विश्वास ठेवावा आणि कुणावर ठेवू नये हा पेच पडतो. समर्थ आठवतात. **'कोणाचा भरवसा न धरावा। आपुला आपण विचार पहावा।। टाकावा उदंड धरावा। हाही एक विषयी।। एकांती चाळणा करावी। धारणा उदंड धरावी।। नाना विचारणा करावी। अरिमित्रांची।।'** आपण कुणावरही चटकन विश्वास ठेवतो, त्याला आपला मित्र मानतो, त्याच्यावर जिवापाड लोभ करतो आहेत. श्रवण, कीर्तन, स्मरण, वंदन, अर्चन, पादसंवाहन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन! यालाच नवविधा भक्ती म्हणतात. यातील आठवी पायरी म्हणजे देवाशी सख्य. देव आपला सखा झाला पाहिजे, मित्र झाला पाहिजे. तो सखा झाल्याशिवाय आपल्या मनीचे गूज त्याला कसे सांगणार? आपली सुखदु:खे त्याला कशी निवेदन करणार? आपल्या मनातील भावभावना त्याच्या मनापर्यंत कशा पोहचणार? आत्मनिवेदन कसे होणार? ते होण्यासाठी

मैत्रीही संपते. मित्रत्वाचे नाते असावे कसे? तर, ते निर्मळ, निरपेक्ष, निरलस असे असावे. तरी पुन्हा प्रश्न उरतोच की, खरी मैत्री म्हणायचे कशाला? याचे उत्तर सोपे आहे. ज्याला आपण आपला मित्र मानतो, त्याला त्याच्या गुणदोषांसकट स्वीकारणे आणि त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवणे हा खऱ्या मैत्रीचा पाया आहे. आपण ज्याला मित्र म्हणून स्वीकारतो त्याचे दोष झाकून, केवळ त्याचे गुणच समाजासमोर आणतो.



आपल्या मनातील अशा अनेक भावना, ज्या आपल्याला अन्यत्र व्यक्त करता येत नाहीत त्या आपण मित्राजवळ व्यक्त करतो. या मर्त्य जगातील मानवी व्यवहारातील मैत्रीबद्दल आपण विचार केला. परंतु या मर्त्य जगापलीकडेही जीव ओवाळून टाकणाऱ्या मैत्रीचा विचार आपण कधी केला आहे? असते अशी मैत्री? कुणी असतो असा मित्र? आयुष्याच्या एका वळणावर केव्हातरी या जगण्याचे वैयर्थ्य आपल्या लक्षात येते. एक विचित्र एकटेपणा जाणवायला लागतो. प्रापंचिक सुखदु:खाच्या जाळ्यात अडकलेले मन आणि शरीर तडफडायला लागते. असे वाटते कुणाशीही संबंध ठेवू नये. एक भयाण एकलेपण मनाला स्पर्श करते. प्रपंच म्हणजे मृगजळ ही भावना प्रबळ होते. अशा वेळी मग आठवतात त्या ग्रेसच्या ओळी'राघवा सावलीपाशी कधी थांबु नये रे बाळा; मृगजळी वाजवी उन्ह तृष्णेचा घुंगुरवाळा 'मृगजळी वाजवी ऊन तृष्णेचा घुंगुरवाळा!' आपण मनात काही योजून एखादी अपेक्षा किंवा इच्छा बाळगावी, त्या दिशेने प्रयत्न करावे आणि नंतर लक्षात यावे की, आपण फसवले गेलो आहोत. असे अनेकदा होते. यात चूक आपली असते. आपल्याला व्यक्तीची ओळख नसते आणि परिस्थितीचा अंदाज येत नाही. आपल्याला भूल पडते. आपण तहानलेल्या हरणासारखे ऊर फुटेस्तोवर धावतो, त्या आभासी पाण्याकडे! पण जसजसे आपण आशेने आणि तहानेने त्याकडे धावतो तसतसे, ते पाणीही आपल्यापासून दूर पळते. आपण इतके भ्रमित झालेलो असतो की, हे अंतर कधीच कमी होणार नाही, हे ठाऊक असूनही आपले धावणे मरेपर्यंत थांबत नाही. आपल्याला भूल पडलेली असते ती, त्या घुंगुरवाळ्याची.

आपले धावणे कधी संपतच नाही. मृत्यू हाच या धावपळीचा शेवटचा बिंदू ठरतो. कुणाकडून काही अपेक्षा करणे मृगजळामागे धावण्यासारखेच आहे. पाण्याची आशा दाखवून उजाड माळरानावर आणून सोडणे हा मृगजळाचा गुणच आहे, त्यात त्याचे काय चुकले? मुळात ते मृगजळ आहे हे, न ओळखणे ही आपली चूक आहे. चुका आपण करतो आणि त्याचे खापर अन्य कुणाच्या डोक्यावर वा परिस्थितीवर फोडून मोकळे होतो. **'जिहीं आपणपें नाही देखिलें। तेचि इहीं इंद्रियार्थी रंजले।। जैसे रंक का आळुकैलें। तुषाते सेवी।। नातरी मृगे तृषा पीडिते। संभ्रमें विसरोनी जळाते।। मग तोयबुद्धी बरडीते। ठाकूनि येती।।'** आपल्या अपेक्षाभंगाचे मूळ आहे आसक्ती.

अध्यात्माचे एक सोडा, आपण सरळसरळ व्यावहारिक पातळीवर विचार करू. हा माझा-तो माझा, ही माझी-ती माझी असे करत आपण शेकड्यांनी माणसे जमा करतो आपल्या सभोवताल! निदान माझ्यासारखा बावळट करतो. कारण मला सगळेच आपले वाटतात. आपल्या कामापुरती माणसे जवळ करून आणि वापरून झाली की तोडून टाकून, फेकून देऊनसुद्धा चेहऱ्यावर साळसूदपणाचे वरकरणी सभ्य पण अंतर्यामी ढोंगी असलेले हसू आणणे, हे कौशल्य कधी जमलेच नाही. मग कालांतराने लक्षात येते की, आपण एका फार मोठ्या गुंतवळ्यात पुरते फसलोय. यातून सुटका परंतु एक दिवस असा प्रसंग येतो की, तीच व्यक्ती तुमचे सर्व उपकार विसरते. तुमचे भावविश्व उधळून लावते. त्या क्षणी आपण केवळ एकटे आहोत, ही जाणीव आपल्या मनात दृढ होत जाते. या एकाच अनुभवाने आपण सावध होतो, व्हायला हवे. मित्र कोण आणि शत्रू कोण याची चाळणा होते. आणि लक्षात येते की, आपणच आपले शत्रू आहोत आणि मित्रही आहोत. मग लक्षात येते... उरलेली सारी बंधने, सारी नाती चक्क कापून काढावी. या तात्कालिक आणि तकलादू संबंधात काही अर्थ नाही. या मर्त्य संबंधांपेक्षा माझाच माझ्याशी असलेला घट्ट संबंध हाच खरा, शाश्वत आणि चिरस्थायी! अगदी जगाच्या अंतापर्यंत !! म्हणूनच प्रा. राम शेवाळकरांची एक कविता मला मंत्रासारखी जाणवते.

**'सारी कापून काढावी। नाती ऋणानुबंधाची।। मनी खोचून ठेवावी। खूण मेलेल्या मायेची।। ओरबाडून फाडावे । खोट्या भावनेचे दु:ख ।। पुढे उरावे केवळ। माझे माझ्याशीच सख्य।। विश्वासात आजवर। मने किती कालवली..।। उन्हे सरल्यावरही । चाचपडली सावली।।'** मग मैत्रीचे असे कोणते नाते आहे की जे शाश्वत आहे, अमर आहे, अजर आहे, अक्षय आहे आणि अजर आहे? परमेश्वराशी अनुसंधान हे ते मैत्रीचे नाते. देवाशी मैत्री करता येते? देव तर आपल्याला कधी दिसत नाही ना? त्याचे अस्तित्व खरेच आहे की नाही या संशयात आपण बुडालेलो असतो. त्याच्याशी मैत्री करणार? मैत्री ज्याच्याशी करायची तो डोळ्या समोर दिसायला तर हवा ना! त्याचे रूप कसे आहे, तो दिसतो कसा हे समजायला हवे ना!! पण देवाशी मैत्री करायला हवी असेल तर हे सारे प्रश्न निरर्थक आहेत... कारण देव देवळात नसतोच मुळी. देवळात असते ती त्याची मूर्ती. भक्तांनी त्याला दिलेले सगुण रूप. मग देवाशी मैत्री करायची असेल तर तो सापडेल कुठे? तो सापडतो आपल्या मनात. तो सापडतो आपल्या हृदयात. तो सापडतो आपल्या व्यवहारात. त्याला शोधावा लागतो. संतांना तो असा सापडला.

**'ओम नमोजी आद्या। वेद प्रतिपाद्या । जय जय स्वसंवेद्या। आत्मरुपा ।।'** ही ज्ञानेश्वरीतील ही पहिली ओवी काय सांगते? गणेशाला वंदन करण्यापूर्वी त्यांनी स्वसंवेद्य आत्मरूपाला वंदन केले आहे. कारण परमेश्वर खरा आपल्या आत्मरुपात सामावलेला आहे. त्याच्याशी मैत्री म्हणजेच देवाशी मैत्री! व्यवहारात आपले अनेक मित्र असतात. कितीतरी मैत्रिणी असतात. पण आपण आपलेच मित्र असतो का? आपली संवेदना आपली मैत्रीण असते असते का? यांच्याशी मैत्र जुळले म्हणजे देवाशी मैत्री जुळली. संतांनी परमेश्वर भक्तीच्या नऊ पायऱ्या सांगितलेल्या भक्तीच्या सात पायऱ्या पूर्ण कराव्या लागतात. आपल्याला ही जाणीव होते तेव्हा आपले वय अर्ध्याच्या वर निघून गेलेले असते ही आपली खरी शोकांतिका आहे. संतांना ही जाणीव फार लवकर झाली म्हणूनच संतप्रवर योगिराज ज्ञानेश्वरांपासून संत निळोबारायांपर्यंत आणि समर्थ रामदासांपासून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांपर्यंत प्रत्येकाने परमेश्वराशी सख्य निर्माण व्हावे हीच इच्छा व्यक्त केली आहे. ज्ञानदेवांचे मन हे आईचे मन होते. हा योगिश्वर म्हणजे संप्रदायाला आणि मानवी जीवनाला विशिष्ट उंचीवर नेणारा महापुरुष ठरला. वारकरी संप्रदायाचा कळस म्हणवणारे जगद्गुरू संत तुकोबाराय म्हणजे समाजशील सत्पुरुष. तुकोबारायांच्या अभंगातून त्यांना लागलेली विठ्ठलभेटीची तळमळ जाणवते.. **'नको ब्रह्मज्ञान आत्म स्थिती भाव। मी भक्त तू देव ऐसे करी।। दावी मज रूप गोपिकारमणा। ठेवू दे चरणावरी माथा ।। पाहेन श्रीमुख देईन आलिंगन। जीवे लिंबलोण उतरीन।। पुसता सांगेन हितगुजमात। बैसोनि एकांत सुखगोष्टी।। तुका म्हणे यासी न लावी उशीर। माझे अभ्यंतर जाणोनिया।।'** येथे तुकोबारायांनी अभ्यंतर हा शब्द वापरला आहे. ते देवाला म्हणतात माझ्या मनाला जाण. मी तुला हितगुज सांगेन.

डावाला हितगुज सांगण्याची अवस्था म्हणजेच देवाशी मैत्री. या साठी निश्चल आणि निष्ठापूर्वक भक्ती हवी. मनाची चंचलता नष्ट करायला हवी. खरंच मन किती चंचल! स्वस्थता म्हणून नाही. एका जागी टिकत नाही. मन आणि लक्ष्मी हे आपल्या चंचलतेसाठी प्रसिद्ध आहेत. लक्ष्मीचे एक सोडा पण, मनाचे काय? म्हणूनच समाधान हवे असेल तर मनावर मनावर नियंत्रण हवे, असे वारंवार सांगितले जाते. परंतु मन असे खट की, ते मनावर घेतच नाही. मुळात मन कसे आहे? काही कळत नाही. मनाच्या चंचलतेला मर्यादा नाही मुळात कुणाच्याच मनाचा भरवसा देता येत नाही. आज ते एखाद्याबद्दल चांगले बोलेल तर, दुसऱ्याच क्षणी उलटून बोलेल. एखाद्याची एका क्षणी मनधरणी करेल आणि दुसऱ्याच क्षणी त्याचे निष्कारण मन दुखावेल. मन कुणालाही चटकन बाजूला सारते आणि कुणापुढेही गरजेपोटी झुकते. मन हे विचारी असते तर दुसरीकडे ते विकारीही असते. परंतु तरीही आपल्या मनासारखा आपला दुसरा मित्र नाही आणि आपल्या मनाशी मैत्री म्हणजेच **देवाशी मैत्री'योयं योगसत्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन। एतस्याहं न पश्यामि चंचलत्वात्स्थितिं स्थिरां।। चञ्चलं हि मनः कृष्ण प्रमाथि बल्वददृढम। तस्याहं निग्रहम मन्ये वायोरिव सुदुष्करं।।'** भगवंताने अर्जुनाला जो समदर्शनाचा योग्य विदित केला, तो ऐकल्यानंतर अर्जुनाला आपल्या मनाच्या चंचलतेची कल्पना आली आणि बलसंपन्न मनाला निग्रहपूर्वक वळण लावणे किती कठीण आहे, याची कल्पना आली. माउली लिहिते... **'अर्जुन म्हणे देवा । तुम्ही सांगा कीर आमुचिया कणवा । परि न पुरो जी स्वभावा। मनाचिया।। हे मन कैसे केवढे। ऐसे पाहो म्हणो तरी न सापडे। एरवी राहाटावया थोडे। त्रैलोक्य यया।। जे विवेकाते भुलवी। संतोषासी चाड लावी। बैसिजे तरी हिंडवी। दाही दिशा।।'** गीतेतील आत्मसंयमयोग अध्यायात धनुर्धर अर्जुनाने विचारलेल्या वरील प्रश्नाला उत्तर देताना भगवान म्हणतात... **'असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलं। अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते।।'** सतत अभ्यास आणि वैराग्य तसेच निग्रह याने मन थाऱ्यावर येते. एकदा मन स्थिर झाले की, भावनांवर नियंत्रण येते.

(पान ६ वर)

# त्यांचे काय चुकलं?

ललित

प्रीती वडनेरकर

कशिश नववधूच्या वेशात उभी होती. समोर तिच्या पतीच्या चितेच्या लालपिवळ्या ज्वाळा भडकत होत्या. ती मूक अवाक् झाली होती. डोळ्यातले अश्रू रडून रडून आटले होते. काही तासांपूर्वी, तिचा पती कशन आणि तिच्या घरचे २४-२५ नातलग, अतिरेक्यांच्या गोळ्यांना बळी गेले होते. कशिशला काहीच समजत नव्हतं. जाणीव-नेणिवेच्या पलीकडे गेली होती ती. काही तासांपूर्वीची अल्लड, अवखळ तरुणी, क्षणाची नववधू आणि अनंत काळाची विधवा झाली होती. तिचं लग्न ठरल्यापासूनचा एकेक प्रसंग, एखाद्या चित्रपटासारखा, तिच्या डोळ्यांसमोरून सरकत होता...

जम्मूच्या खोऱ्यातल्या पहाडावरच्या जमातीतल्या प्रत्येक कुमारिकेचं एकच स्वप्न असतं, ते म्हणजे नववधू होण्याचं. आपल्या मनाप्रमाणे पती मिळाला की, नवी नवरी बनून त्या पतीच्या घरी, सासरी गेल्या की त्यांच्या आयुष्याची परिपूर्ती होत होती. कशिशचं स्वप्न तरी यापेक्षा वेगळं काय असणार? माधवलाल, कशिशचे वडील, जेव्हा तिचं लग्न ठरवून आले, तेव्हा ती अत्यानंदाने नाचली होती. कशन तिचा नियोजित पती देखणा, थोडा शिकलेला आणि प्रेमळ तर होताच; शिवाय बाजारपेठेत, त्याच्या वडिलांची दोन दुकानं होती. भरीला माधवलालपेक्षा थोडी मोठी जमीनही होती.

कशिशच्या भावांना आपल्या लाडक्या छोट्या बहिणीसाठी बाबांनी जमवलेलं लग्न खूपच पसंत पडलं होतं. कशिशच्या आईनं लग्न अगदी थाटामाटात लावून दिलं. सारे वऱ्हाडी खूश होते. कशिश तर होतीच. लग्न यथासांग पार पडल्यावर कशिश डोलीत बसली. आईबाबांनी पोटाशी घेऊन उरावर दगड ठेवून तिला निरोप दिला होता. तिची बिदाई झाली. भाऊसुद्धा वरातीत सामील झाले. सारे बाराती डोलीत बसलेल्या कशिशला घेऊन निघाले. घुंघट घेऊन तिनं आपला चेहरा झाकून घेतला होता. वरात सासरी पोहोचल्यावर 'मुँहदिखाई' घेऊनच ती आपला मुखचंद्र सगळ्यांना दाखवणार होतीअगदी तिच्या पतीलासुद्धा. चंपनारीला येऊन बाराती थांबले. बसमधून प्रथम डोडाला आणि नंतर चिनाब नदीच्या पलीकडे प्रेमानगरला त्यांना पोहोचायचं होतं. कशिशच्या अवतीभवती तिचा चेहरा झाकून घ्यायला मदत करणारी, ढालीसारख्या तिच्या नातलग स्त्रिया होत्या; ज्या तिला बसमध्ये चढायला, बसायला, उतरायला मदत करणाऱ्या होत्या. साऱ्याजणी तिची आणि कशनची चेष्टामस्करी करत होत्या. बसची वाट बघत असतानाचा एक पांढरी व्हॅन, बराती लोकांजवळ येऊन थांबली. पाचसहा दाढीधारी आणि बंदूकधारी पुरुष त्यातून उतरले. बारातींना अजिबात भीती वाटली नाही. अतिरेक्यांना पकडायला आलेले भारतीय पोलिस असतील, अशी त्यांची समजूत झाली. बारातींची थट्टामस्करी हास्य विनोद चालूच होते.

अचानक दाढीवाले त्यांच्या जवळ आले. ''तुमच्यापैकी गावच्या सुरक्षा समितीत कोण आहेत, जे अतिरेक्यांविरुद्ध तक्रार करतात?'' इतका वेळ हसणारे, खिदळणारे सारे बाराती स्तब्ध झाले. त्यांच्या अंगावर सर्रकन काटा आला. त्यांना आपलं भविष्य कळून चुकलं. आता धडधड करण्यात काहीच अर्थ नव्हता. मशिनगन आणि स्टेनगन घेतलेल्या त्या सशस्त्र अतिरेक्यांच्या डोळ्यातून रागाच्या ठिणग्या बरसत होत्या.

प्रत्येकाच्या काळजाचा ठोका चुकला. त्या राक्षसांनी आपला मोर्चा प्रथम स्त्रियांकडे वळवला. लग्नासाठी प्रत्येकीनं ठेवणीतले कपडे आणि दागिने घातले होते. क्षणार्धात साऱ्या लंकेच्या पार्वती झाल्या. डोलीत बसलेली कशिश आतमध्ये थरथरत कापत होती. भीतीनं तिला घाम फुटला होता. ते राक्षस डोलीजवळ आले. कशिशनं आधीच सारे दागिने काढून ठेवले होते. ते पटकन तिनं त्यांच्या स्वाधीन केले. कशिशची भाभी किरना, दोन दिवसांपूर्वीच शादी करून त्यांच्या घरी आली होती. कशिशचा भाऊ शिशरायशी तिची शादी झाली होती.

तिच्या अंगावरची हळद अजून ओली होती. तीसुद्धा क्षणार्धात निष्कांचन झाली. स्त्रियांकडून दागिने, पैसे हिसकल्यावर, ते राक्षस निघून जातील, अशा विचारांनी पुरुष गप्प होते. ते नुसते राक्षस नव्हते, नराधम होते. आपला मोहरा पुरुषांकडे वळवून त्यांनी त्यातून हिंदूंना बाजूला काढलं. ४० हिंदू पुरुष होते. त्यांच्या धमन्यांमधलं रक्त संतापानं तापलं होतं. डोळ्यातून रागाच्या ठिणग्या उडत होत्या. परंतु ते लाचार होते. कारण सारेच नि:शस्त्र होते... डोळ्याचं पातं लावतं ना लावतं, तोच अतिरेक्यांच्या बंदुकीतून धडाधड बेछूट गोळीबार सुरू झाला.

एकामागून एक पुरुष गतप्राण होऊन खाली कोसळायला लागला. स्त्रियांच्या लक्षात आल्यावर त्यांनी किंचाळायला, रडायला, ओरडायला, आक्रोश करायला सुरुवात केली. गोळीबाराच्या आवाजात त्यांचा आवाज दबला गेला. जवळजवळ २४ पुरुषांचा बळी घेऊन अतिरेकी व्हॅनमधून पसार झाले.


रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या आपल्या पतीला, भावांना, नातलगांना पाहून कशिशचं रक्तच गोठलं. ती अक्षरश: पांढरी फटक पडली. किरना आणि इतर स्त्रियांची अवस्था यापेक्षा वेगळी नव्हती. बातमी क्षणार्धात वाऱ्यासारखी पसरली. कशिशचे आई-वडील, सासूसासरे, इतर नातलग जमले. गतप्राण झालेल्यांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. कशिश निश्चल झाली. वृत्तपत्रे, टी.व्ही. वेगवेगळे पत्रकार जमले. ''या भ्याड हल्ल्याचा आम्ही निषेध करतो. या अमानुष कृत्याचा बदला घ्यायलाच पाहिजे. त्यासाठी कारवाई चालूच होईल.

तुमची सरकारकडून काय अपेक्षा आहे?'' कशिश पुढे आली, तिच्या तोंडून एकच शब्द उमटला- ''पैसा!'' कशिश आता नववधू, विधवा, मनहूस, पांढऱ्या पायाची ठरली होती. तिच्या भविष्यात अंधार अंधार पसरला होता. भविष्यात कुठल्याच समारंभात, आनंदोत्सवात ती सहभागी होऊ शकणार नव्हती. या साऱ्यातून पैसा तिला वाचवू शकणार होता. अन्यथा उपासमारीनं ती संपून जाणार होती. केवळ आत्महत्याच तिला या त्रासातून मुक्त करणार होती. बरोबरच्या २४ विधवांपुढे मोठं प्रश्नचिन्ह उभं होतं. सुखी संसाराचं स्वप्न पार चकनाचूर झालं होतं.

काय गुन्हा होता, तिच्या पतीचा, भावांचा, नातलगांचा? 'एकाला मारा आणि हजारोंवर दहशत बसवा' हा पाकिस्तानी अतिरेक्यांचा स्थायीभाव आहे. जातीय धार्मिक परिवर्तनाचं हे लोण, श्रीनगरमधून जम्मतू, जम्मूतून डोडात, डोडातून पूंछकडे पसरायच्या मार्गावर आहे. आज या खोऱ्यांमध्ये राहणाऱ्या हिंदू नागरिकांचं जीवन सुरक्षित नाही. घटना जुनी असली तरी चित्रं बोलकं आहे.

रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य (भाग ४७)

# सहजपाठ : रवींद्रनाथांची अनमोल देणगी (१)



उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे

भ्र. ९४०३७४९९३२

रवींद्रनाथांच्या स्वत:च्या शिक्षण विषयक काही कल्पना होत्या. मुलांना औपचारिक पारंपारिक शिक्षण देण्यापेक्षा नैसर्गिकरित्या ते कसे शिकतील यावर त्यांचा भर होता. त्या दृष्टीनेच त्यांनी शांतिनिकेतन मधील मुलांना शिकवले. रटाळ घोकंपट्टी त्यांना कधीच मान्य नव्हती. तर भोवतालचे वातावरण, निसर्ग यांचे निरीक्षण करता करता मुलांनी त्यातून सहज शिकावे, असे त्यांना वाटत होते. त्यातूनच त्यांचे सहजपाठ निर्माण झाले. रवींद्रनाथ केवळ व्यासपीठावरून भाषण देणारे किंवा वृत्तपत्रात मोठ-मोठे शिक्षण विषयक लेख लिहिणारे शिक्षणतज्ज्ञ कधीच नव्हते.

कोणत्याही गोष्टीची सुरुवात स्वत:पासून आणि मुळापासून करणारे ते प्रायोगिक शिक्षण-तज्ज्ञ होते. म्हणून केवळ शिक्षणसंस्था काढून ते शांत बसले नाहीत तर विद्यार्थ्यांसाठी त्यांनी अतिशय सुंदर पाठ्यपुस्तके तयार केली. ही पाठ्यपुस्तके म्हणजेच सहजपाठ आणि हे सहजपाठ म्हणजे त्यांनी बंगालला दिलेली सर्वात मोठी देणगी असे म्हणावे लागेल! मुळात 'सहजपाठ' हे नावच किती सुंदर आहे! सहजपाठ होणारे ते सहजपाठ!

पुल देशपांडे आपल्या 'वंगचित्रे' या पुस्तकात त्याबद्दल लिहिताना म्हणतात, रवींद्रनाथांनी हजारो कविता लिहिल्या, नाटके लिहिली, कादंबर्या, प्रवासवर्णने' पत्रे, निबंध- खूप काही लिहिले, पण रवींद्रनाथ टागोर या माणसापुढे मी जर मनोमन लोटांगण घातले असेल तर प्राथमिक शाळेची ही पाठ्यपुस्तके रचल्याबद्दल! 'वृद्धत्वी निज शैशवास जपणे बाणा कवीचा असे' असे केशवसुतांनी म्हटले आहे. पण शैशवाचे स्मरण म्हणजे काय ते टागोरांचे हे सहज पाठ वाचल्यावर कळते. ही पाठ्यपुस्तके म्हणजे रस, रंग, गंध, नाद यांच्या सृष्टीतील आनंददायक सहल आहे. बंगाल्यांच्या गेल्या चार पिढ्या ह्या पाठ्यपुस्तकातून शिकत आहेत.

आज देखील सरकार कुठल्याही पक्षाचे असो, पाठ्यपुस्तके गुरुदेवांचीच! रवींद्रनाथ लहानपणी शाळेत जे शिकले होते ते शिक्षण त्यांना नीरस आणि कंटाळवाणे वाटत होते. आपल्याकडील काय किंवा बंगालमधील काय पाठ्यपुस्तके सदैव उपदेशाचा डोस पाजणारी होती. खोटे कधी बोलू नये, चोरी कधी करू नये, आळशीपणा करू नये यासारख्या उपदेशात्मक गोष्टी सतत सांगणारी आणि हे करू नको, ते करू नको अशा नकारात्मक गोष्टी सांगणारी पाठ्यपुस्तके अस्तित्वात होती. मुलांच्या बालविश्वाशी अत्यंत विसंगत अशा प्रकारची ही गोष्ट होती. ढग, पाऊस, फुलपाखरे, नदी, चांदण्या, पाखरे यासारख्या निसर्गाच्या घटकांमध्ये काही सौंदर्य असते आणि त्यातूनही आपली मुले सहजपणे शिकू शकतात याचा गंध ना शाळाखात्याला होता ना शिक्षणतज्ज्ञांना! खेळ म्हणजे मुलांच्या आवडीची गोष्ट! दैनंदिन नित्य खेळातून सुद्धा मुले सहजपणे शिकू शकतात याची जाणीव शिक्षणखात्याला कधी झालीच नाही. पण या सगळ्या गोष्टींची दखल रवींद्रनाथांनी घेतली. त्यांच्या या पाठ्यपुस्तकांमुळे प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात खर्या अर्थाने क्रांती झाली. खर्या अर्थाने ते 'गुरुदेव' या उपाधीला पात्र होते.

थोरांची चरित्रे, राष्ट्रप्रेम, सदाचार यासारख्या लहान मुलांच्या वयाला न पेलणार्या गोष्टी त्यांनी आपल्या पाठ्यपुस्तकात ठेवल्याच नाहीत. या गोष्टींना त्यांचा विरोध होता अशातला भाग नव्हता परंतु मुलांना सहजपणे कसे शिकता येईल त्यांचे शिक्षण आनंददायी कसे होईल यावर त्यांचा भर होता. त्यांनी मुलांचे बालसृष्टीतील मित्र होऊन, त्यांच्या पातळीवर जाऊन या पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली. या पाठ्यपुस्तकातील एक एक धडा म्हणजे सुंदर शब्दचित्रच आहे! सभोवतालच्या जगाचे निरीक्षण करता करता मुले सहजपणे यातून शिकत जातात आणि आपण काही शिकतो आहोत याची जाणीव न होता सहज शिकत जातात हे या पाठ्यपुस्तकांचे वैशिष्ट्य आहे. यातील पाठ गाता येतात, पाहता येतात, ऐकता येतात आणि अनुभवता येतात. शांतिनिकेतनमध्ये त्यावेळी प्रख्यात चित्रकार नंदलाल बोस विद्यार्थ्यांना चित्रकला शिकवत. त्यांच्या सुंदर चित्रांनी ही पुस्तके नटलेली आहेत. रवींद्रनाथांचे शब्द आणि नंदलाल बोस यांची बोलकी चित्रे यांचा सुरेख संगम या पाठ्यपुस्तकांमध्ये झाला आहे. पुल देशपांडे यांनी शांतिनिकेतनमध्ये काही काळ वास्तव्य केले होते. या पुस्तकांबद्दल बोलताना ते म्हणतात, माझ्या शांतीनिकेतन मधल्या वास्तव्यात या सहजपाठांनी माझे हरवलेले बालपण मला परत आणून दिले. ज्याला म्हणून बंगाली शिकायचे असेल त्याने सहजपाठाचे हे चार भाग पुन्हा पुन्हा वाचावेत. बंगाली भाषेच्या अंगाखांद्यावर खेळल्यासारखे वाटेल. सहजपाठ म्हणजे गुरुदेवांचे बंगालवर असलेले महान उपकार!

बंगालमधील खेड्यात राहणारी मुले मुली डोळ्यासमोर ठेवूनच रवींद्रनाथांनी हे सहजपाठ लिहिले. सकाळचे वर्णन ते किती सुंदर करतात ते पहा-

आलो हॉय- गॅलॉ भोय, चारी दिक झिक मिक- (उजेड होतो, भय जाते, चारी बाजूला झुंजूमुंजू होते.)

हे सगळे मुले गात-गात आनंदाने म्हणू शकतात. सकाळ झाल्यानंतर गावातील माणसे कशी कामाला लागली याचेही चित्र सोप्या शब्दातून ते मुलांसमोर उभं करतातद्यण.

**पाडे पेरू हरी हर, मधू राय बांधे घर**
**होडी हाके पातू पाल, धान्य आणे जयलाल**
**धरे सुकाणू दीनानाथ, अविनाश रांधे भात.**

आपल्याकडे शाळेतील मुलांना कविता पाठ केल्या की परीक्षेला मार्क मिळतात एवढेच ठाऊक. परंतु त्यातून मिळणार्या आनंदाला ही मुले पारखी होतात. कविता या चालीवर सुंदर गाता येतात, त्या म्हणताना नाचता येते. त्या गात गात भाषा शिकता येते, याची जाणीवच आमच्याकडे करून दिली गेली नाही. बंगालमधील मुले खरोखरच भाग्यवान म्हणावी लागतील कारण रवींद्रनाथांनी त्यांना शेकडो सुंदर गाणी रचून दिली. त्या गीतांना सुंदर चाली लावल्या गेल्या. बंगाली माणसाचे बालपण या गीतांनीच समृद्ध झाले.

# ग्रहसंकेत

**(रविवार, १८ मे ते शनिवार, २४ मे २०२५)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.

✽ **रविवार, १८ मे-** श्री रामसिद्ध महाराज यात्रा रामहिंगणी (सोलापूर), दत्त महाराज कदम पुण्यतिथी देवडे (ता. वाळवा) ✽ **सोमवार, १९ मे-** धनिष्ठा, नवरात्रारंभ, श्री सिद्धेश्वर महाराज उत्सव कोल्हापूर ✽ **मंगळवार, २० मे-** कलाष्टमी, महाराजा मल्हारराव होळकर पुण्यदिन, वासुदेव आरे महाराज जयंती पंढरपूर, पंचक सकाळी ७: ३४ नंतर ✽ **बुधवार, २१ मे-** राजीव गांधी स्मृतिदिन, दहशतवाद विरोधी दिन,✽ **गुरुवार, २२ मे-** भारतीय ज्येष्ठ मासारंभ, संत मुक्ताबाई पुण्यतिथी मुक्ताईनगर (जि. जळगाव), दिन बाबा पुण्यतिथी इचलकरंजी ✽ **शुक्रवार, २३ मे-** अपदा एकादशी, संत श्री पारेनकर महाराज वार्षिकोत्सव पारनेर ✽ **शनिवार, २४ मे-** शनि प्रदोष (दुपारी १: ४४ पर्यंत), पंचक, नारद जयंती

**मुहूर्त:-** ✽ **साखरपुडा-** २०, २३, २४ मे (१९ पर्यंत) ✽ **बारसे-** २४ मे (१९ पर्यंत) ✽ **गृहप्रवेश-** २३, २४ मे

**मेष :- घर दुरुस्तीसाठी खर्च**
भाग्येश गुरु लोहपादने तृतीयात आला आहे. फल कष्ट आहे. सुखस्थ मंगळ व्ययात शनी त्यामुळे घराच्या दुरुस्तीसाठी खर्च करावा लागेल. विनाकारण धावपळ वाढवू नका. रविवारचा बुध- मंगळ केंद्रयोग यांत्रिक क्षेत्रात प्रगती करणार आहे. उत्तरार्धात सरकारी कामे होतील. स्पर्धा परीक्षा द्याव्यात. यश मिळेल. गुंतवणूक विचाराने करावी. उष्णतेपासून त्रास होईल. शुभ ता. २३

**वृषभ:- कलेतून अर्थार्जन**
अष्टमेश, लाभेश गुरु धनस्थानी ताम्रपादाने आला आहे. फल श्री प्राप्ती आहे. मनातील चिंता, धास्ती आता कमी होईल. आपले सर्व कुशल होणार आहे. नोकरीत वरिष्ठांची मर्जी लाभेल. ज्ञानदान, बँक, विमा क्षेत्रात अनुकूलता वाढेल. उत्साह, धडाडीने विविध कामे मार्गी लावू शकाल. कलेतून अर्थार्जन घडेल. आर्थिक व्यवहार विचाराने करावेत. शुभ ता. २१, २३

**मिथुन:- वादाचे प्रसंग टाळावेत**
सप्तमेश, दशमेश गुरु सुवर्णपादाने राशीत आला आहे. फल चिंत आहे. धनस्थ मंगळामुळे नाही त्या खर्चाला सामोरे जावे लागेल. नवीन आव्हाने विचारपूर्वक स्वीकारावीत. कार्यक्षेत्रात विलंबाने पण प्रगतीच्या घटना घडतील. अडचणींवर मात करू शकाल. वादाचे प्रसंग टाळावेत. धार्मिक कार्यात अधिक लक्ष घालावे. सरकारी कामास विलंब होईल.शुभ ता. २३

**कर्क:- धावत्याला गती येई**
षष्ठेश, भाग्येश गुरु रौप्यपादाने व्ययस्थानी आला आहे. फल शुभ आहे. धावत्याला गती येईल आणि रस्ता साफडे हे खरेच आहे. प्रयत्नाने चांगले यश मिळणार आहे. सरकारी सेवेत अनुकूलता राहील. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. फार आग्रही भूमिका ठेवू नका. कमिशनवर चालणाऱ्या व्यवसायात प्रगती होईल. शुभ ता. २३, २४

**सिंह:- आर्थिक गणित बिघडेल**
पंचमेश, अष्टमेश गुरु लोहपादाने लाभस्थानी आला आहे. फल कष्ट आहे. अष्टमात शनि तर व्ययात मंगळ त्यामुळे आर्थिक गणित बिघडण्याची शक्यता आहे. बुध, मंगळ केंद्रयोग यांत्रिक क्षेत्रात प्रगती करणार आहे. प्रकृतीच्या तक्रारींची वेळीच दखल घ्यावी. गुंतवणूक विचाराने करावी. प्रशासन सेवेत असणाऱ्यांना चांगल्या संधी लाभतील. प्रतीतीच्या घटना. शुभ ता. २०

**कन्या:- चिंता कमी होईल**
सुखेश, सप्तमेश गुरु ताम्रपादाने कर्मस्थानी आला असून फल श्री प्राप्ती आहे. राशी स्वामी बुधाचा मंगळाशी होणारा केंद्रयोग यांत्रिक क्षेत्रात प्रगती करणार आहे. व्यावसायिक चिंता कमी होईल. विचाराने राहावे, चांगली प्रगती साधता येईल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित संधी लाभल्याने समाधान वाढेल. नवे विचार मार्गी लावता येतील. शुभ ता. २३

**तुला:- अडचणींवर मात कराल**
तृतीयेश, षष्ठेश गुरू रौप्यपादाने भाग्यस्थानी आला आहे. फल शुभ आहे. भाग्यवृद्धिगत करणाऱ्या घटना घडतील. कार्यक्षेत्रात अपेक्षित फलप्राप्ती होईल. पूर्वार्धात महत्त्वाची कामे करून घ्यावीत. कलागुणांचा विलंबाने विकास होईल. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. अडचणींवर मात कराल. वैद्यकीय क्षेत्रात अनुकूलता. शुभ ता. २०

**वृश्चिक:- निर्धाराने वाटचाल करावी**
धनेश, पंचमेश गुरु सुवर्णपादाने अष्टमात आला आहे. फल चिंता आहे. छोटी साडेसाती संपलेली आहे. त्यामुळे आता फारशी चिंता करू नका. नोकरी व्यवसायात विचाराने राहावे. जुने येणे वसूल करून घ्या. आत्मविश्वास वाढविणाऱ्या घटना घडतील. अडचणींची चिंता नको. मार्ग निघत जाईल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. निर्धाराने वाटचाल करावी यश मिळेल. शुभ ता. २४

**धनु:- श्रद्धा सबुरी ठेवावी**
राशी स्वामी (लग्नेश, सुकेश) गुरु लोहपादाने सप्तमात आला आहे. फल कष्ट आहे. चौथा शनि, आठवा मंगळ आपले मार्गक्रमण रोखण्याचा प्रयत्न करतील. श्रद्धा व सबुरी ठेवावी. अपेक्षित फल प्राप्त करू शकाल. स्थावर प्रश्न वाढवू नका. नवीन कामे विचारपूर्वक स्वीकारावीत. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. स्पर्धांमध्ये यश मिळेल. शुभ ता. २४

**मकर:- नव्या संधी लाभतील**
तृतीयेश, व्ययेश गुरु सुवर्णपादाने अष्टमात आला आहे. फल चिंता आहे. कौटुंबिक जीवनात, भागीदारीच्या व्यवसायात सामंजस्याने राहावे. पंचमात रवि, बुध राहणार आहेत. त्यामुळे आर्थिक अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या संधी लाभतील. साडेसाती संपली आहे. त्यामुळे चांगली वाटचाल करू शकाल. स्फोटक निर्णय घेऊ नका. शुभ ता. २३, २४


**कुंभ:- अपेक्षित संधी लाभतील**
धनेश, लाभेश गुरु ताम्रपादाने पंचमात आला आहे. श्री प्राप्ती आहे. विवाह विषयक रेंगाळलेली कामे मार्गी लागतील. उत्साह, धडाडी वाढेल. प्रगतीसाठी अधिक परिश्रमाची, चिकाटीची गरज आहे. शिक्षण अनुभवातून चांगली प्रगती करू शकाल. योजलेल्या कामात गती मिळेल. अडचणींवर मात कराल. अपेक्षित संधी लाभतील. शुभ ता. २३, २४

**मीन:- चांगलेच होत जाणार आहे**
राशी स्वामी (लग्नेश, दशमेश) गुरु रौप्यपादाने सुखस्थानी आला आहे. फल शुभ आहे. राशीत शनि, राहू असल्याने चांगल्या घटनांसाठी थोडी प्रतीक्षा करावी लागेल. यांत्रिक क्षेत्रात मनासारखी प्रगती साधता येईल. उत्तरार्धात सरकारी कामे होतील. फार चिंता करू नका. आपले सर्व काही चांगलेच होत जाणार आहे. मनात तणाव ठेवू नका. शुभ ता. २०

!! शुभ भवतु !!

पान २ वरून

## आचार्य देवो भव!



''मनस्येकं वचस्येकं कर्मस्येकं महात्मनां। मनस्यन्यद् वचस्यन्यद् कर्मस्यन्यद् दुरात्मनां ।।'' ज्याच्या मनात, शब्दांत आणि कर्मात एकवाक्यता असते तो महात्मा आणि ज्याच्या मनात, बोलण्यात आणि वागण्यात कसलाच ताळमेळ नसतो तो दुरात्मा. असा महात्मा विद्यार्थी घडवायचा तर स्वत: आचार्यांनी महात्मा असणं अपेक्षित आहे. म्हणजेच त्यांच्या मनी वाची कर्मी सुसंगती असावी आणि हेच ते पाचवं व्रत आहे आचरण परायणता.

यात स्वत:च्या उदाहरणानं त्यानं जीवनाचे आदर्श निर्माण करावेत, 'स्वयमाचरते'. म्हणून त्या पदाला आचार्य हे नामाभिधान आहे. या पंचसूत्रीतून विद्यार्थी घडवण्याची पर्यायानं पुढची पिढी आणि त्यातून राष्ट्र निर्माण करण्याची क्षमता तिच्यात असावी. म्हणूनच द्रोणाचार्यांनी अर्जुनासारखा अद्वितीय धनुर्धर महारथी निर्माण केला. तक्षशिला विद्यापीठात आचार्यपदावर काम करणारे विष्णुगुप्त अलेक्झांडरच्या विरोधात देश जागवत वणवण फिरले.

मगधाच्या राजसभेत अपमान झाला म्हणून उन्मत्त राजसत्ता उलथवून टाकली. चंद्रगुप्त मौर्यासारखा एक प्रजाहितदक्ष सम्राट गादीवर बसवला. राज्याचा गाडा (राजशकट) व्यवस्थित चालवता यावा म्हणून 'अर्थशास्त्र' नावाचा नीतिग्रंथ लिहून सिद्ध केला. एक परम वैभवी समाज आणि एक सशक्त भव्य समृद्ध राष्ट्र निर्माण करण्याचा ध्यास घेत तो पूर्णत्वास नेणारे आचार्य चाणक्य. हे याच परंपरेचे कंठमणी आहेत. श्रीमद् आदिशंकराचार्यांनी आसेतुहिमाचल आसिंधुसिंधु सगळा हिंदुस्थान आपल्या अद्वैत वेदान्तानं एकसंध केला. चार दिशांना चार वेदांच्या संरक्षणासाठी चार मुख्य पीठांचं निर्माण केलं.

प्रस्थानत्रयींवर (ब्रह्मसूत्र, उपनिषदे व भगवद्गीता) आणि अन्य विषयांवर सुखोल चिंतन करणारे भाष्यग्रंथ, तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ रचना केली. शिवाय विविध देवी-देवतांचं माहात्म्य वर्णन करणारी अनुप्रासादी काव्यालंकारांनी ओसंडणारी, शब्द चमत्कृतीनं रसरसलेली संस्कृत स्तोत्रकाव्यं रचलीत.

'मठाम्नाय' या ग्रंथात, भारतातील दशनामी संन्यास प्रणाली, चारही मठ, दशनामी आखाडे व त्यांच्या आधाराने चालणारे कुंभपर्व या बाबतच्या नीती, रीती व नियम, विधान व सिद्धांत यांचे विवेचन करीत आपली प्रशासकीय व्यवस्थापन कौशल्य स्पष्ट केलं आहे. अवघ्या ३२ वर्षांचं आयुष्य लाभलेल्या या आचार्यांनी आपल्या अद्भुत प्रतिभेनं आणि नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञेनं सनातन हिंदू तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांसाठी एक अमूल्य ठेवा निर्माण करून ठेवला आहे. त्याचप्रमाणे विशिष्टाद्वैत वेदान्ताचे प्रवर्तक आणि महान समाजसुधारक रामानुजाचार्य यांचीही स्मृती या निमित्तानं जागवायलाच हवी.

१२० वर्षांचे पूर्णायुष्य जगलेले (जन्म : १०१७ - मृत्यू : ११३७) आचार्य रामानुज दक्षिण भारतात होऊन गेलेले महान वैष्णव तत्त्वज्ञानी संत. तमिळ वैष्णव भक्तिपरंपरेवर त्यांचा प्रगाढ प्रभाव आहे. ज्या आचार्यांकडे शिकता यावं म्हणून १०० योजनं लांबून शिष्य येतात त्यांना 'वीजनशतिक' असं विशेष नाव प्राचीन भारतीय शिक्षण प्रणालीत होतं. तर, अशा व्यक्तिनिर्माणातून राष्ट्र निर्माण करणारे 'आचार्य' ज्याचे देवता आहेत अशी/अस्तु तू हो' हा एक अमूल्य संस्कार आपल्या पूर्वजांनी आपल्याला देऊ केलेला आहे. म्हणूनच काळाच्या ओघात गेल्या अनेक सहस्र वर्षांपासून आपला देश आणि आपली संस्कृती अक्षुण्ण आहे. या आपल्या भारतीय संस्कारांचं कसोशीनं पालन करणं हे आपलं नैतिक कर्तव्य आहे.

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

## नाणेघाट

'स'ह्याद्री' हा मराठी माणसाचा अभिमान आहे. त्याच्या कडे-कपारीत आजही शौर्यगाथा ऐकू येतात आणि आपल्या हृदयात राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलित करतात. सह्याद्रीच्या पर्वतरांगातील काही सोप्या तर काही अवघड वाटा, गडकिल्ले, सरळसोट सुळके, कातळशिल्प, लेणी, गुंफा, पुरातन मंदिरे, यामुळे सह्याद्री सदासर्वदा पर्यटकांना आकर्षित करीत असतो. पुरातत्त्व दृष्टिकोनातून महत्त्वाची असलेली कातळशिल्पे, लेणी अशा खोदीव शिल्पकलेने नटलेला हा परिसर अद्वितीय आहे. महाराष्ट्राचा शिल्पशास्त्रीय इतिहास साधारण सातवाहन काळापासून सुरू होतो.

सातवाहन काळात हा प्रदेश समृद्धीने नटलेला होता. सर्वत्र आनंद व समाधान विलसित होते. सातवाहन काळात महाराष्ट्राचे सांस्कृतिक व धार्मिक वैभव वाढले. वैदिक अनुष्ठाने, यज्ञ, दानधर्म यामुळे सर्वत्र सकारात्मक वातावरण होते. या काळात महाराष्ट्रातील शिल्पकला, स्थापत्यकला भरभराटीस आली, शिलामंदिरे आणि लेणी यांची निर्मिती झाली. सह्याद्रीच्या अग्निजन्य खडकात खोदलेल्या बौद्ध, चैत्य विहार गुंफांपैकी बहुसंख्य गुंफा सह्याद्रीत आहे. सह्याद्रीतील या लेणी विविध परिसरात विखुरलेल्या वाटल्या तरी एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की, सह्याद्रीच्या पोटातील घाटखिंडी पार करून देशपठारावर पोहोचणाऱ्या मार्गावर त्या बहुसंख्य प्रमाणात आढळतात. कोकणातील समुद्रकिनारे, बंदरे यावर उतरलेला माल देशपठारावर पाठविणे, आपल्याकडील वस्तू बंदरांवर पोहोचविणे अशा व्यापार दृष्टीने महत्त्वाच्या मार्गावर विश्रांतीसाठी, मुक्कामासाठी, मालाची देवाणघेवाण करण्यासाठी त्या काळात हे महत्त्वाचे पडाव होते. प्रत्येक लेणी समूहाच्या जवळ तत्कालीन वसाहतीचे अवशेष आढळतात तसेच घाटमार्ग संपल्यावर मोठ्या वसाहती होत्या, असेही दिसून येते. घाटमार्ग, गुंफा, लेणी, घाटातील मंदिरे, बौद्धविहार ही धर्मस्थाने सर्व दृष्टीने महत्त्वाची असल्याने, यांच्या संरक्षणासाठी या परिसरात बुलंद दुर्ग बांधले गेले.

घाटमार्गांची बांधणी, दुर्गबांधणी व शिल्पलेणी खोदणे हे तिन्ही कार्य सातवाहन काळात मोठ्या प्रमाणात करण्यात आले. नाणेघाट हा सातवाहन काळात बांधलेला घाटमार्ग आहे. सह्याद्रीच्या पूर्वे कडील महाराष्ट्र व कोकण प्रांत यांना जोडण्यासाठी हा घाटमार्ग खोदण्यात आला. या मार्गाचे एक टोक जुन्नर बाजूला तर दुसरे कोकणातील मुरबाड येथे आहे. नाणेघाट हा उत्तरेकडून कोकणात उतरण्याचा मुख्य मार्ग आहे. व्यापारासाठी सोयीचे व्हावे यासाठी या घाटमार्गाची निर्मिती करण्यात आली. डोंगराला भिडलेली ही वाट अत्यंत देखणी असून कोकणात उतरणारी महत्त्वाची वाट आहे. सातवाहन हा राजवंश बराच काळ भारताच्या मोठ्या भूप्रदेशावर राज्य करीत होता. या कुळातील सर्व राजे पराक्रमी व निर्मितिप्रिय होते. सह्याद्रीच्या कठीण अग्निजन्य खडकात त्या काळात अनेक लेणी, शिल्प खोदण्यात आली.

येथील दगडात असलेल्या आडव्या भेगा, हे दगड फोडणे सुलभ करतात. नाणेघाट दोन उंच कड्यांमधील नैसर्गिक अंतराचे रुंदीकरण करून, खोदून तयार केलेली वाट आहे. या वाटेत जी नैसर्गिक उतरण आहे तिची उंची वाढवून एक वळणदार पायवाट तयार केली आहे. या मार्गावरून पायी जाता येते तसेच प्राणी व प्राण्यांच्या साहाय्याने चालणारी वाहने जाऊ शकतात. या मार्गाने जलदगतीने मुरबाड कल्याण परिसरात पोहोचता येते. साधारण दोन हजार फूट उंचावर खोदलेला नाणेघाटाच्या चढणीची सुरुवात वैशाखरे गावापासून होते. हा भाग दुर्गम आहे परंतु ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वपूर्ण व निसर्गसौंदर्याने नटलेला आहे. जुन्नर ही सातवाहनांची पहिली राजधानी होती. त्याकाळी कल्याणवरून नाणेघाट किंवा माळशेजघाट मार्गे होणाऱ्या प्रवासात जुन्नर हे महत्त्वाचे केंद्र होते. या परिसरात कातळशिल्प, गुंफा, लेणी, पाण्याची कुंडे, घाटमार्ग संरक्षणार्थ गडकिल्ले मोठ्या प्रमाणात आहेत. सातवाहन राज्य पुढे माळवा, राजस्थान व थेट आंध्रप्रदेशपर्यंत विस्तारले.

सातवाहन काळात व्यापार व उद्योग भरभराटीस आला. कल्याण, नालासोपारा, चौल बंदरांचा विकास झाला. या बंदरातून ग्रीस, इटली, इजिप्त येथे आंतरराष्ट्रीय व्यापार चालत असे.



सातवाहन काळात नाशिक, जुन्नर, पैठण तसेच अनेक गावे भरभराटीस आली, पैठण हे पुढे राजधानीचे शहर झाले. जुन्नर हे व्यापारी केंद्र असल्याने तिथे अनेक रोमन, ग्रीक व्यापारी वस्तीला असत, म्हणून सातवाहनकालीन घराच्या उत्खननात काचेचे सामान, रोमन घडणावळ असलेली भांडी, मदिरा कुंभ, ब्राँझचे पुतळे सापडले आहेत. नाणेघाट चढून वर गेल्यावर एक प्रशस्त गुंफा आहे. दगडात कोरलेली ही लेणी त्या काळात अनेक व्यापारी लोकांचे आश्रयस्थान असणार. खडकात छोट्या छोट्या गुहा आहेत. त्यातील एका गुहेत श्रीगणेशाची मूर्ती आहे. येथे जवळच पाण्याची टाकी आहेत आणि एक मोठा दगडी रांजण आहे. व्यापारी जेव्हा या मार्गाचा वापर करीत तेव्हा या रांजणात जकात म्हणून नाणी टाकत असावे. घाटमार्गावर लक्ष ठेवण्यास वरती जीवधन किल्ला आहे. सातवाहनकालीन शिल्पकलेची एक वेगळी शैली होती, महाराष्ट्रात अनेक लेण्यांमध्ये या शैलीचे उत्कृष्ट नमुने पाहता येतात. कान्हेरी गुंफा, कार्ले येथील लेण्या येथे काही दगडात कोरलेल्या प्रतिमा पाहायला मिळतात.

सध्या नाणेघाटातील ही प्रशस्त लेणी जाळी आणि दरवाज्याने बंद केली आहे. कारण असंवेदनशील पर्यटक प्लॅस्टिकचा कचरा, दारूच्या बाटल्यांचा खच करून जात होते. आपल्या संस्कृतीची, अद्वितीय स्थापत्याची ही धरोहर अशा पद्धतीने कलंकित करणे म्हणजे खरे तर अक्षम्य अपराध आहे. मात्र आपल्या देशात लोकशाही आहे आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकार आहे. शिवाय टोकलेले, शिकवलेले कोणाला आवडत नाही. त्यामुळे इतकी सुंदर लेणी जी एकेकाळी पांथस्थ विश्रांतीसाठी वापरत असत, बंद करावी लागली. घाटातील या लेणीत सातवाहनांची राणी नागणिका हिचा शिलालेख आहे, प्राकृत भाषेतील हा शिलालेख ब्राह्मी लिपीत लिहिला आहे. साधारण २० ओळींच्या या शिलालेखात यज्ञ, दान, दक्षिणा असा उल्लेख असल्याचे तज्ज्ञ मंडळींनी अभ्यासांती लिहून ठेवले आहे. महाराष्ट्राचा 'महारठी' असा उल्लेख या शिलालेखात आढळतो. अभ्यासकांनी या शिलालेखाचे विस्तृत वर्णन केले आहे, या शिलालेखाची सुरुवात इंद्रदेव, प्रजापती, धर्म, सूर्य, वरुण, कुबेर इत्यादी देवतांना अभिवादन करून होते. या शिलालेखात अश्वमेध, राजसूय, अंगिरस, अग्निचय, वाजपेय अशा अनेक यज्ञ परंपरांची यादी आहे. दक्षिणा म्हणून गोधन, हत्ती, घोडे व गावे दिल्याचाही उल्लेख आहे, यावरून त्याकाळी असलेल्या समृद्धीची प्रचीती येते. सातवाहन काळात वैदिक धर्माला पुन्हा चालना मिळाली. कारण सातवाहन घराणे वैदिक धर्माचे अनुयायी होते. त्या काळी बौद्ध धर्मीय धर्मप्रसारासाठी सतत यात्रा करीत असत. त्यांच्यासाठी विहार व चैत्यगृहे सातवाहन राजांनी बांधली. सातवाहन काळात समाज सधन होता, धार्मिक वातावरण होते आणि महाराष्ट्रात सुख नांदत होते. सातवाहन राजांची राज्य कारभाराची भाषा प्राकृत होती, ज्यातून पुढे मराठी भाषेची उत्क्रांती झाली. सातवाहनकालीन बहुतेक शिलालेख प्राकृत भाषेत आहेत. 'गाथासप्तशती' हा महत्त्वाचा ग्रंथ या काळात संकलित झाला असून या ग्रंथातून तत्कालीन समाजजीवनाचे यथार्थ दर्शन घडते. सातवाहन घराण्याने महाराष्ट्रावर रामराज्य केले. त्या काळात पराक्रम, वैराग्य, विद्वत्ता, कलाप्रेम, रसिकता, धार्मिकता एकत्र नांदत होते. या सातवाहन घराण्यात गौतमी नावाची पुण्यशील व सत्त्वशील राणी होती. तिचा पुत्र राजा सातकर्णी कीर्तिवंत, यशवंत राजा होता. त्यांनी नेहमी अत्यंत नम्रतेने स्वत:चा उल्लेख गौतमीपुत्र सातकर्णी असाच केला.

सातवाहन राजा सातकर्णी यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी, राणी नागणिका हिने राज्य कारभार चालविला कारण त्यांचा पुत्र वेदीश्री तेव्हा लहान होता. या गुहेत सातवाहन कुळातील सात व्यक्तींच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. आता त्या प्रतिमांच्या पायाचे अवशेष फक्त शिल्लक आहेत. यावरून एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की, या दुर्गम भागात त्या काळी एका राणीने समर्थपणे राज्य कारभार केला आहे. स्त्रियांच्या बाबतीतील भारतीय दृष्टिकोन अशा अनेक उदाहरणांनी स्पष्ट होतो. परकीय आक्रमणे, त्यांची जुलमी सत्ता व त्यांची स्त्रीविषयक असलेली हीन भावना, यामुळे कालांतराने भारतात स्त्रीला घरात सुरक्षित ठेवणे सुरू झाले. भारतीय संस्कृतीत स्त्रियांना उच्चतम अधिकार होते, त्यांना शिक्षणाचा, राज्य कारभार करण्याचा, इतकंच काय तर स्वयंवर पद्धतीत स्वत:चा जोडीदार निवडण्याचा अधिकार होता. महाराष्ट्राच्या इतिहासात नाणेघाटाचे महत्त्व केवळ एक घाटमार्ग म्हणून नाही, तर दोन हजार वर्षांपासून संस्कृतीची देवाणघेवाण वाढविणारा, व्यापारवृद्धीस सहायक व सातवाहन राजवंशाचा साक्षीदार म्हणून आहे. या भागातील चार किल्ले शिवनेरी, हडसर, चावंड व जीवधन यांना नाणेघाटाचे संरक्षक दुर्ग म्हणतात. घाटातून नानाचा अंगठा नावाने विख्यात असलेला एक कातळकडा आहे. नाणेघाटातील टाक्यांच्या शेजारून नानाचा अंगठ्याला जाता येते. अंगठ्याच्या टोकाच्या थोडे अलिकडे सुळका आरोहण करण्यासाठीचा मार्ग सुरू होतो. सह्याद्रीतील दुर्गम सुळके प्रस्तरारोहण मोहीम आखून गिर्यारोहक सर करतात. गोरखगड, हरिश्चंद्रगड, कोकणकडा, सिद्धगड व परिसरातील किल्ल्यांचे येथून विहंगम दृश्य दिसते. सह्याद्रीच्या उंच, सरळसोट, दुर्गम कड्यांवर आपल्या पूर्वजांनी हे अप्रतिम घाटमार्ग बांधले. अद्वितीय शिल्पे साकारली आणि बुलंद दुर्ग बांधले, यावरून त्यांच्या दुर्दम्य साहसी स्वभावाचे दर्शन होते.

पान ४ वरून

## ग्रीष्माच्या वळीव- वेळात भिजलेली...

एखादी म्हातारी बाई, उरलेलं धान्य कवडीसारखं गोळा करून, उंबऱ्यावर बसून ओल्या वाऱ्याकडे पाहते. ती म्हणते- हा वळीव म्हणजे गतजन्मीचा श्वास आहे, माय तिचं बोलणं झाडाच्या पानांसारखं हलकं वाटतं, पण खोल अर्थानी ओझरतं. आणि गाणं होऊन झरत, वळीवाच्या पाण्यात माझ्या लेकीचं नांदण, ओल्या झाडांखाली बाई तिच्या सुखाचा रांजण असे हे सहज ओठावर येणारे गीत केवळ सृष्टीचं वर्णन नाही, तर एका स्त्रीच्या अंत:करणातल्या नात्यांचं ओलसर प्रतिबिंब असते.

वड, पिंपळ, उंबर ही वळीवाच्या पावसात भिजून बुंध्याजवळ कोरडी राहणारी ही झाडे केवळ वनस्पती नव्हेत, ती आठवणींच्या स्मृतिरक्षक स्तंभ आहेत. यांना पूर्णपणे ओलावणं म्हणजे काळाच्या प्रवाहाला स्पर्श करणं...पण तेवढं धाडस वळीवाच्या थेंबात नसतं. आंबा, करवंद, चिंच ही झाडांही वळीवाला ओळखतात. आंब्याच्या झाडाखाली जर वळीवात ओली झाली, तर फळाच्या गाभ्याला अधिक चव येते. हे कसं ते उलगडत नाही मात्र ८० वर्षांच्या ज्या म्हाताऱ्यान हे झाड लावलं तो हे छाती ठोकून सांगतो. त्याने पेरलेल्या टाकलेल्या कोयीचे फळ आपण तरी आंबट म्हणावे अशी भावना ठेवली की रसदार आंब्याची फळ जास्तच गोड वाटू लागतात. देऊळगाव कुंडपळाच्या आमच्या घराच्या परसात एक उंबर होता. वळीवात जर उंबराचा पाला डोलला, तर घरातल्यांचं आयुष्य वाढतं. असं आजी म्हणत असे खरंखोट ठाऊक नाही पण आजी आणि आजोबा नव्वदीच्या आसपास टिकले.आता आपल्या अंगणात तर उंबर नाहीच पण ज्या परिसरात राहतो त्या भागातही उंबर दिसत नाही. असो. दिवसा साधारण आश्वासक वाटणारा वळीव रात्रीच्या वेळी उगाच भयावह चेहरा घेऊन येतो. गडद अंधाराशी स्पर्धा करत रात्र वाढते. आभाळात मधून मधून वीज चमकते. लांब एखाद्या चुलीतल्या खमंग वासानं घराचं अस्तित्व कळतं. आणि त्या धूसर गंधात एक आश्वासक गारवा घेऊन आलेला वळीव आता हळूहळू थांबू लागतो. अंधार पसरलेला असतो. पण त्यात भिती नाही असं नाही पण तो एक ओलसर अंधार आहे. जसा एखाद्या आईच्या पदराखाली शिरलेल्या बाळाला वाटतो. ह्या अवेळीच्या पावसाच्या थेंबात स्त्री, पुरुष, झाडं, प्राणी, पक्षी, आणि आभाळ अस सगळं नातं गहिरं होतं. वळीवाच्या रात्री जे जे ओलं होतं, ते केवळ बाहेरचं नाही. मनातल्या खोल तहानांना स्पर्श करणारी ही ओल ही खरी भेट असते! निसर्गाकडून!! साऱ्या सजीवांसाठी, नाही का?

पान ४ वरून

## नाना विचारणा करावी, अरिमित्रांची

अ अर्थ असा की, याने माणूस संवेदनहीन होत नाही; उलट जास्त संवेदनशील होतो. सर्व संवेदनांचे कारक आपले मनच तर आहे. मुळात मन कसे आहे हे मनालाच उमजत नाही. मग म्हणजे नेमके काय? ती एक उत्तमतेची जाणीव आहे. आपले व्यक्तिमत्त्व ज्यातून स्वच्छपणाने प्रतिबिंबित होईल अशी समोरच्याला होणारी जाणीव.

आपली वाणी, करणी, वर्तन यातून जे आपण व्यक्त होतो ते आपले मन. आपल्या डोळ्यात आपले मन दिसते. मनाची एक अशी व्याख्या करताच येत नाही. मन ही एक सतत घडणारी क्रिया आहे. मन हे आयुष्यात अनुभवलेल्या प्रसंगाप्रसंगातून साधत जाते. आपण ज्याला विसरूनही जातो, त्याने उपकाराची जाण ठेवून केलेली मदत जशी सुखावून जाते तशीच, आपण ज्याच्यावर निरतिशय प्रेम केले आणि विश्वास ठेवला त्याने आपली निष्कारण केलेली अवहेलना दु:खाच्या डागण्या देते. अशा प्रसंगांमधून मन घडतही जाते आणि बिघडतही जाते.

समर्थ रामदासांनी अन्य कुणालाही उपदेश न करता आपल्या मनाला केला याचे मर्म समजून घेतले पाहिजे. ते समजले तर आयुष्यात आलेल्या आणि येणाऱ्या निराशेच्या, अनपेक्षित अपमानाच्या आणि अपेक्षाभंगाच्या दु:खाला आपण धैर्याने सामोरेजाऊ शकतो....

'मना मानसी दु:ख आणू नको रे। मन सर्वथा शोक चिंता नको रे।। विवेके देहेबुद्धि सोडोनि द्यावी। विदेहीपणे मुक्ती भोगीत जावी।।' देवाशी मैत्री ही अशी असते.

स्वत:शी मैत्री आपल्यातच आहे. संत जनाबाईंने विठ्ठलाला आपला मित्र केले होते. संत मीराबाईने भगवान श्रीकृष्णाला सखा बनवले होते. अशी कितीतरी उदाहरणे येतील कारण त्यांचा सखा, त्यांचा मित्र हा त्यांच्या अंतरंगातच होता आणि तो त्यांचा देव होता. म्हणूनच कोणाशीही मैत्री नसली, कोणाचीही ओळख नसली तरी स्वत:ची ओळख असणे, स्वत:शीच मैत्री असणे म्हणजेच देवाशी मैत्री असणे.

कविश्रेष्ठ श्री. रा. बोबडे म्हणतात.... **'सागर पोहत बाहूबळाने, नाव तयास मिळो न मिळो रे स्वयेच जो तेजोनिधी तरणी,तदगृही दीप जळो न जळो रे।।** जो करी कर्म अहेतू निरंतर, **वेद तयास कळो न कळो रे । ओळख पटली ज्यास स्वत:ची,देव तयास मिळो न मिळो रे ।।'**

सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# दया- आत्मप्रवाहाची रसद



सकारात्मकतेचे तत्वज्ञान २६७

दयावंत असणे दिसायला सोपे वाटत असले तरी त्याच्या तळाशी एक प्रभावी मानसशास्त्रीय प्रभाव दडलेला असतो.

## दया

✲ कोणावरही दया दाखविणे ही आपल्या चारित्र्याची मूलभूत ताकत असते कारण त्यात जाणीवपूर्वक केलेल्या अशा कृती असतात ज्यामुळे सकारात्मक नाती जुळतात, घट्ट होतात आणि टिकतातही. अंततोगत्वा समाजाचे भले होते.

✲ दया दाखविणे म्हणजे स्वतःचा आनंद दुप्पट करणे, मानसिक स्वास्थ्य टिकवून ठेवणे.

✲ दिनक्रमात दयावंत असणे म्हणजे अधिक कणव व समानुभूतीचे वातावरण निर्माण करणे.

गुंडगिरी, दादागिरी, धमकावणे, छळ करणे अशा प्रवृत्ती शिक्षणक्षेत्रात तसेच संस्थांमध्ये वाढीला लागलेल्या आहेत याचा सतत प्रत्यय येत असतो आणि अशावेळी प्रत्युत्तर म्हणजे अनुकंपा, कणव यांच्या मुळांचे पुनरुज्जीवन करणे क्रमप्राप्त ठरते.

आजकाल खूप देशांमध्ये कणवेचा प्रकाश पसरावा म्हणून अभ्यासक्रमांमध्ये दयाळू वृत्तीचा समावेश असलेले धडे/ कविता शिकविले जाताहेत आणि अनुकंपा, दया यांची गरज विविध उपक्रमांमधून साजरी करण्याकडे कल वाढलेला आहे. अगणित धार्मिक, अध्यात्मिक संस्था दया भावना हेच आपले ध्येय समजून काम करताहेत.

**मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून दया या भावनेचे निरीक्षण**

दया दाखविणे म्हणजे केवळ एखाद्याशी मृदू, सौम्य बोलणे नसते. ती केवळ जनहिताची, परोपकाराची निःस्वार्थी कृतीही नसते. परतफेडीची अपेक्षा करणारी व्यक्ती दयाळू असणे प्रत्यक्षात शक्य आहे कां? दयाभाव म्हणजे इतरांची निर्लेप सेवा, की स्वतःची सेवा की दोन्ही?

मानसशास्त्रज्ञ, मनोविकासतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि धर्मशास्त्रज्ञ या प्रश्नांची उकल करण्यात गुंतलेले आहेत. प्रत्यक्ष, पटेल असे उत्तर अजून अवगत झालेले नसले तरीही आपापल्यापरीने प्रयोग करून काही आत्मबोध होतोय कां याचे प्रयत्न अखंड सुरु आहेत. काही संशोधकांच्या मते, मानवाला सहकार्याची आस असते, इतरांबरोबर जुळवून घ्यायचे असते. रँड, ग्रीन आणि नोवॅक यांना २०१२ साली असं आढळून आलं- सहकार्यातून निर्णय घेण्याचा वेग आणि निर्णयांची गुणवत्ता वाढविता येते.

**मानसशास्त्राच्या शब्दकोशात पाम यांनी २०१३ साली एक व्याख्या दिलीय दया या शब्दाची-**

परोपकारी आणि मदतीची कृती म्हणजे दया दाखविणे. ती व्यक्तीला असो वा संस्थेला. त्यातून कोठल्याही परतफेडीची अपेक्षा नसावी. एखाद्याला मदत करण्याची इच्छा म्हणजेच त्या व्यक्तीचे दुःख कमी करण्यासाठी उचललेलं पाऊल!

परहितवाद म्हणजे निःस्वार्थी वर्तन. इतरांच्या सेवेत स्वतःला झोकून देता आले तर सर्वभूतहीत साधता येते. उदा. एखाद्या वयस्कर व्यक्तीला आगगाडीत बसायला जागा नसेल तर कोणीही उठून स्वतःची जागा देऊ करणे याला परहितवाद म्हणतात. दयाभाव अंगीभूत, नैसर्गिक असतो कां? हेपाच, वैश आणि टोमासेल्लो यांना २०१२ साली संशोधनात असं आढळलं की मानवात इतरांसाठी प्रामाणिक तळमळ असते आणि ती अगदी बालवयापासून दिसून येते. अर्थात यावर संशोधन सुरु आहे.

हान्स सिल्ये यांच्या उल्लेखाशिवाय दया या भावनेवरील कोणतीही चर्चा, लेखन पूर्ण होत नाही. आपल्या दिनक्रमातील नकारार्थी प्रभाव नाहीसे करायचे असतील, कमी करायचे असतील तर त्यासाठी इतरांचे भले करणे, इतरांचे भले चिंतणे एवढेच आपल्या हाती असते. असं केल्याने आपले शरीर तणावांना देणारा प्रतिसाद बदलू शकते. आपल्या परमार्थाचा, परार्थ बुद्धीचा अहंकार बाळगावा असंही त्याने सुचविले. अंतर्यामी सुखी आणि ठणठणीत राहायचे असेल तर हा अहंकार मदतीला येतो. आपण इतरांना मदत करावी, प्रेम आणि कृतज्ञ भाव दाखवावा म्हणजे समाधान वाढते आणि सुरक्षितही वाटते.

**दुःखी माणसे अधिक दयाळू असतात का?**

आनंदी माणसे दुःखी माणसांपेक्षा अधिक कनवाळू असतात का? स्वप्रेमात मग्न असलेली माणसे स्वतःवरच खुश असतात. वेदना कमी कराव्यात आणि आनंद वाढावा यासाठी सुखानुभूतीचा शोध अव्याहत सुरु असतो. स्वतःला आणि इतरांना दयेच्या मार्गाने आत्मबोधाकडे नेता येते हे आता पटायला लागलंय.

हुता आणि वॉटरमॅन यांनी २०१४ साली नवे वर्गीकरण आणि परिभाषा रूढ केली.

**१) हमीची शक्यता-**

संकल्पना मूलभूत किंवा त्याच्या जवळ जाण्याची शक्यता आहे कां?

**२) विश्लेषणाचे वर्गीकरण-**

स्त्रोत, हेतू, नीतिमूल्ये, जीवनहेतू व्याख्येत अंतर्भूत आहेत का?

**३) मोजपट्टी-**

आपण नेमके काय मोजतोय? वैशिष्ट्ये की तुलना करतोय?

ओतके, शिमाई आणि फ्रेड्रिकसन यांनी २००६ साली दया या मूलभूत अनुभूतीमध्ये तीन घटक असतात असं वर्णन केलं.

(अ) दया दाखविण्यामागची प्रेरणा

(ब) इतरांमधील दयावृत्तीची नोंद, स्वीकार

(क) रोज वर्तनामध्ये दयाळूपणाचा समावेश करणे

**या संशोधनात त्यांचे लक्ष्य होते**

(१) दयाभाव आणि व्यक्तिनिष्ठ आनंद यांच्यात काय नाते?

(२) दयाळू वर्तनामुळे माणसे अधिक सुखी होतात कां?

पहिल्या शोधासाठी त्यांनी व्यक्तिनिष्ठ आनंदाची मोजपट्टी वापरली आणि दिवसातील आनंदी आणि दुःखी अनुभव मोजले. प्रश्नावलीत वर्तनविषयक, प्रेरणा/स्फूर्ती आणि श्रेयनिर्देश असे मुद्दे होते. दुसऱ्या घटकासाठी सहभागी सदस्यांना दिवसात केलेल्या दयाळू कृतींचे मोजमाप करायला सांगितले. साधारण आठवडाभर हा उपक्रम सुरु होता. सर्वेक्षणापुर्वी आणि नंतरही एकच मोजपट्टी वापरण्यात आली. सोबत कृतज्ञताही मोजण्यात आली.

**संशोधनांती त्यांना असं आढळून आलं**

१) समाधानी, खुश असलेल्या मंडळींना प्रेरणा, श्रेय आणि दयाळू वर्तनाबद्दल जास्त गुण मिळाले.

२) संख्यात्मक आणि गुणात्मकदृष्ट्या आनंदी लोकांकडे अधिक सुखद स्मृती असतात.

३) आठवडेभरातील दयाळू कृतींची निव्वळ मोजदाद केल्यावर वस्तुनिष्ठ आनंद वाढलेला होता.

४) आनंदी मंडळी अधिक दयाळू आणि कृतज्ञ बनली कारण त्यांनी दयाळू कृतींची मोजणी केली.

दयाळूपणाची व्याख्या त्याची मोजदाद करण्यात अडथळे आणते. दुसरे म्हणजे नक्की कशी मोजायची एखादी कृती, ज्यात दया समाविष्ट आहे, अंतर्निहित आहे? कॅन्टर, यंग्स आणि यानेवा यांनी २०१७ साली यावर तोडगा काढला-

**१) सहिष्णुता** - स्वीकार, सौम्य प्रेम आणि नम्रता

**२) समानुभूतीचा प्रतिसाद**- इतरांच्या भावनांचा, संवेदनांचा उचित आदर

**३) तात्विक कृती** - परोपकार आणि सन्मान यांची जोड

या तिन्हीवरील छत्र म्हणजे अंगीभूत, जन्मजात दयाळू स्वभाव. हे समानुभूतीच्या जवळ जाते फक्त त्यांत इतरांबद्दलच्या भावनांमधून उपजणारे आविर्भाव असायला हवे. एक मात्र वादातीत आहे. दयाळू असणे आणि दया लाभणे सर्वांसाठी चांगलीच गोष्ट असते. त्यावर फारसे वादविवाद होत नाहीत.

**दयाळू वृत्ती आणि सकारात्मकता**

सकारात्मकतेवर पुरेसे संशोधन आणि साहित्य नसण्याच्या काळात संशोधक अनैसर्गिक वर्तनावर विसंबून असायचे. लोकांचे कोठे चुकते आणि ते कसे दुरुस्त करता येईल यावरच त्यांचा भर असे. मानवी जीवनात काय हवे आणि ते अनुभव कसे वाढविता येतील याचे संशोधन सकारात्मकता करते.

दयावृत्तीच्या पाठपुराव्यामधील वाढ खालील तीन गोष्टींमुळे शक्य झाली.

(१) सकारात्मकता या विषयाला कायदेशीर मान्यता

(२) समानुभूती आणि परोपकार यांच्यातील नाते पुराव्यानिशी सिद्ध झाले.

(३) नकारांचा भडीमार असह्य झाल्याने शेवटी एखाद्या आनंदी बातमीचा शोध सुरु झाला.

आमच्या सगळ्या धर्मग्रंथांमध्ये- बायबल, कुराण इत्यादी दया ही मूलभूत भावना असंख्य वेळा हाती लागते.

१) स्वतःवर दया दाखविण्याचा लाभ होतो, पण दुष्ट व्यक्ती मात्र स्वतःला जखम करून घेते.

२) लहान बालकांवर शब्दांमधून प्रेम करू नये, ते कृतींमधून व्यक्त केले जावे.

३) चैतन्याची फळे- आनंद, सुख, प्रेम, संयम, दयाभाव, चांगुलपण आणि निष्ठा असतात.

झिया शाह यांनी कुराणातील असंख्य उल्लेख लिहून काढले आहेत.

अल्लाला न्याय प्रिय आहे, इतरांचे भले करण्याकडे ज्यांचा कल आहे, त्यांच्यावर तो प्रेम करतो. जे इतरांची सेवा करतात, अल्ला त्यांच्यासोबत असतो. चांगुलपणाचे फळ चांगुलपण असते.

दयाळू व्यक्तींच्या छोट्या छोट्या कृतींचा नकळत मोठा प्रभाव पडत असतो. विशेषतः छुप्या भावनिक जखमांवर, ज्यांच्यामुळे वारंवार नकार घोंघावत असतो आसपास, तेथे खोलवर जाऊन फुंकर घालण्याचे काम दयाभाव करीत असतो. या जखमांच्या मूळ कारणांशी पोहोचून दया ही भावना त्यांना कायमचे बरे करते.

हास्योपचार आपल्या यादीत पहिल्या क्रमांकावरील औषध असेल तर दया हे दुसरे औषध मानायला हरकत नाही. ही वृत्ती दात्याचे, घेणाऱ्याचे इतकेच काय तर निरीक्षकाचेही भले चिंतिते. अभ्यासांती असं दिसून आलंय. दयेची कृती मदतीच्या हाताला चालना देते.

डोपामिन, ऑक्सिटोसिन आणि सेरोटोनीन या अंतःस्रावांना प्रवाहित करते परिमाणस्वरूप ताण घटतात, खिन्नमनस्कता उणावते आणि चिंता/वैफल्य या भावनांचा प्रभाव ओसरतो. मेंदूतील ही रसायने रक्तदाब कमी करणे, रोगप्रतिकारक शक्ती वाढविणे, शरीरातील पेशींची झीज मंद करणे याबाबतीत परिणामकारक असतात. दयावृत्ती हा शास्त्रसंमत आणि विज्ञानसंमत मार्ग मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारायला मदत करतो. दयावृत्ती जीवनप्रवाहात तरंग निर्माण करते आणि त्याचा जगावर दीर्घकालीन प्रभाव पडू शकतो. दयाभाव म्हणजे फक्त कनवाळू वृत्ती नसून ती परिवर्तनाच्या चक्राला गती देत. म्हणूनच स्कॉट अडॅम्स म्हणतो- दया म्हणजे कोणतीही छोटीशी कृती नसते. तिच्यातून ज्या लहरी, तरंग उठतात त्यांना अंत नसतो.

**एक सोपा उपक्रम**

**दयेची अनियोजित (स्वैर) कृत्ये-**

ल्युबोमिरस्काय, ताकच्य आणि येल्व्हर्टोन यांनी २००४ साली सुचविलेला हा छोटा आणि सोपा उपक्रम मानवी स्वास्थ्यावर दयेचा काय परिणाम होऊ शकतो याची ग्वाही आहे. त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना दर आठवड्याला पाच दयेची स्वैर कृत्ये करायला सांगितली- सहा आठवड्यांसाठी. या कृतींमधून आपल्या वर्तनातून इतरेजन आनंदी व्हायला हवीत किंवा त्यांना फायदा/फायदे व्हायला हवे अशी पूर्वअट ठेवली. अर्थात दात्याला काही खर्च करायला मोकळीक होती, उदा. एखाद्यासाठी अन्न शिजविणे, रक्तदान, वृद्ध/ अपंग/गर्भवती स्त्रीला आपले आसन देणे इत्यादी. या अभ्यासातून असं निदर्शनास आलं, ज्यांनी जाणूनबुजून आणि नेमाने दयेच्या विविध कृतींमध्ये सक्रिय सहभाग घेतला त्यांना खूप छान वाटलं.

**माइंडसेट:**

ट्रान्सफॉर्म युवर ब्रेन विथ द न्यू सायन्स ऑफ काइंडनेस या डॅनियल सीगल यांच्या पुस्तकात मज्जासंस्था आणि मानसशास्त्र यांच्यातील मेंदू- वर्तन संलग्नता अभ्यासण्यासाठी आणि त्यातून स्व-जागृती कशाप्रकारे कणव, आरोग्य आणि स्वतःशी सुसंवाद साधण्याला मदत करते याचे इत्यंभूत वर्णन आहे.

साधता संवाद
प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी(वतनी)
भ्र. ९४०३०२९१७८

# जीव विसावला । विटेखाली ।। (भाग-५२)

**खऱ्या अर्थाने पाहिल्यास आई-वडील आहेत तोपर्यंतच आपण सर्व बाबतीत सुरक्षीत असतो. वाटतं आपल्या आजूबाजूचं जग फार प्रेमळ आणि निरागस आहे. आपण आपल्याच नजरेतून त्या जगाला अतिशय निरागसपणे पहात असतो. कुणाच्या मनातील खलवृत्तीची आपल्याला पुसटशीही कल्पना नसते. (खल म्हणजे काय ही संज्ञाच त्यावेळी माहीत नसते.) त्यातल्या त्यात अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून वर आलेल्या आणि त्या परिस्थितीची जाणीव असणाऱ्या हळव्या जीवाला तर फारच प्रकर्षाने हे जाणवते.**

आई-वडीलांचं छत्र कायमचंच क्षितीजापल्याड जातं तेव्हा आजुबाजुचं जग सरड्यासारखं रंग बदलत जातं. आई-वडीलांच्या धाका खाली दबा धरून बसलेल्या खलवृत्तीचा लाव्हा उफाळून डोकं वर काढायला लागतो, आणि स्वार्थाची हडळ थैमान घालू लागते घरभर. तरी या अनाथ जीवाला समजत नाही काहीच, त्यांचे कसलेच डावपेच! वेडा फकीर आपल्याच आदर्शात आणि निष्ठेत पुरता गुंगून गेलेला असतो. अनाथाची जागा कुत्र्या जवळ सुध्दा नसते हे याचं वेडं मन मान्यच करायला तयार होत नाही. आणि नियती जेव्हा याचे डोळे उघडते तेव्हा फार उशीर झालेला असतो.

आपण तर दगडावर डोकं आपटून आपलाच कपाळमोक्ष करून घेतला या पश्चतापात तो आणखीनच खचून जातो. वारसाहक्काने मिळालेली बापाची तुळशीची माळ आणि आईची सात्विकता उराशी कवटाळून तो मुक होतो, एकांताचा प्रवासी होतो. उरात सारी वादळं दडपून तो आत्ममग्न होतो. तेव्हा त्याची पावलं अनाहत टाळांच्या नादाच्या दिशेने वळतात. कधी काळी आई वडीलांनी केलेली ती दिव्यत्वाची दिंडी त्याला साद घालु लागते आणि त्याच्या मुकेपणाला मौनाची झळाळी येते. जन्मोजन्मीच्या पुण्याईचं दान त्याच्या झोळीत पडतं. आणि **ज्ञानियांचा राजा गुरू महाराज ।** आणि स्नेहाळ स्मित करत अगदी समोर उभे राहतात. त्या दिव्य तेजाने त्याचे डोळे दिपून जातात पण पुन्हा अंतरातून मायेच्या पान्ह्याने ओलीचिंब झालेली ओवी धावून येते सावध करायला, आणि म्हणते, अरे मुर्खा आता गाफिल राहु नकोस, चर्म चक्षु बरोबरच तुझे अंतःचक्षुही सताड उघडे ठेव. नाही तर...

**तरी प्रप्तीचिये वेळे। निदैवा अंधळेपणाचे डोहाळे। की आपुलेच डोळे। आपण झाकी।।** अशी तुझी गत होईल. आणि जन्मोजन्मीची फजिती तुझ्या भाळी फत्कल मरून बसेल. त्याबरोबर मन भानवर आलं. आणि...

**सावध झालो सावध झालो। हरिच्या दर्शनासी आलो।।** याची आठवण झाली आणि चर्मचक्षु सह अंतःचक्षु दोन्हीही सताड उघडे ठेवले, आणि अनमिष लोचनाने पाहु लागलो तर मोगऱ्याचा मंदसा परिमळ अंतरात दर्वळू लागला, पैलतिराच्या काऊचं कोकावणं कानी पडु लागलं. चालणारी भिंत आणि वेद बोलणारा रेडा पासून तर मन हरखून गेलं. तुळस मंजिरीच्या गंधाने तर साऱ्या देहासह आत्मा गंधाळून निघाला. समोर तेजःपुंज ज्ञानसूर्य तळपु लागला. संकोचाने पाऊल मागे उचलताच कोणीतरी अलगद उचलून कुशीत घेतलं आणि गोंजारू लागलं तेव्हा अनंत जन्मीचा दाटलेला हुंदका मोकळा होऊ लागला. गच्च भरून आलेलं आभाळ मनसोक्त बरसावं आणि शुभ्र स्वच्छ मोकळं व्हावं तस्स...तस्सच झालं. आणि...

**मन सांगे आता सुटली रे गाठ।।**
**अंतरीचा पट। शुभ्र झाला।।**



पुर्वायुष्यातलं सारंच देणं घेणं संपलं, शुन्य झालं. जन्मोजन्मीच्या संचिताची पाटी कोरी कोरी झाली. पूर्वपुण्याईने आत्मारामाशी शेजार घडला आणि अनाथ जीव कायमचाच सनाथ झाला. खरं तर आता या जीवाला आणिक काय हवं होतं? तरीपण या जीवाची ही कसली धडपड चालू आहे? या जीवाचं म्हणनं तरी काय आहे? या साऱ्या प्रश्नांचा सविस्तर विचार आपण **जीव विसावला विटेखाली** या अभंग रचनेत करूया...

**खल बुध्दि माझी। होऊ दे निर्मळ ।।**
**ऐसे भक्ति बळ। लाभो मज ।।१।।**

देवा एकवेळ मनातला खळ (मळ) बुद्धी धुवून काढेल पण जर बुद्धीच खलमय झाली तर ती कुठं धुवावी? इथे तर क्षणोक्षणी खलवृत्ती छळत आहे या जीवाला. नुसती छळतच नाही तर जाळत आहे उभ्या आयुष्याला. माऊली, आयुष्याच्या या टप्प्यावर आपण विश्वात्मक देवा जवळ 'पसायदान' मागताना सर्व प्रथम **जे खळांची व्यंकटी सांडो** हेच मागणं का मागितलत ते थोडं थोडं कळु लागलंय. कारण पिकलिया शेंदा कडुपण गेले वाळुक कितीही कडू असले तरी ते पिकल्यावर म्हणजे शेंदाड झाल्यावर त्याचा कडूपणा जसा जातो. तसं सुख-दुःखाच्या अग्नित तावून सुलाखून निघाल्या शिवाय आत्मप्रौढी येऊन त्यातलं खलपण (कडुपण) कसं जाणार? आणि अशी आत्मप्रौढी आल्याशिवाय माऊली या पामराला 'जे खळांची व्यंकटी' तरी कशी कळणार? हा भवसागर पार करून, आत्मस्वरूपाला ओळखून, आत्मसुखाची प्राप्ती करून, ह्या जन्म मरणाच्या चक्रातून सुटका करून घ्यायची असेल तर माऊली प्रथम आमच्यातली खलवृत्ती संपूर्ण नष्ट झाली पाहिजे हीच तर आपली तळमळ आहे ना? खलवृत्तीचा नाश ही मनुष्यत्व ते संतत्व या प्रवासातील पहिली पायरी आहे. हे आपण निक्षून सांगीतलं आहे. आणि आम्ही बध्द जीव इथेच अडकून पडतो. त्यामुळे पुढे सत्कर्मातली गोडी, मैत्र जीवांचे, दुरिताचं तिमिर जाणं, विश्व स्वधर्म सूर्य पाहणं आणि मग जो जे वांच्छिल तो ते लाभो हे आम्हा बध्द जीवसाठी तर फार दूरची गोष्ट आहे. यासाठी किती जन्म जावे लागतील ते सांगता येत नाही. म्हणून काय सुरूवातच करायची नाही का?

माऊली तुम्ही कोणत्या विश्वात्मक देवाकडे मागणं मागितलय ते या मुढ पामरला नाही माहीत. हां पण एक माहित आहे की, ज्यानं माझं अनाथपण कायमचंच घालवलं आणि या अडाणी, अजाण बालकाला सनाथ केलात ते आपणच माझ्यासाठी विश्वात्मक देव आहात. आपण माझी माऊली आहात, आई आहात, मग एकच मागणं आहे माझं आपल्याकडे. वाटलं तर हा माझा बालहट्ट समजा माऊली की, या जन्मात किमान माझी खल बुध्दी तरी स्वच्छ निर्मळ होऊ द्या. पहिली पायरी पूर्ण करण्याची पात्रता तरी माझ्या अंगी येऊ द्या. पुढच्या पायऱ्याचा मी आग्रह करून तुम्हाला त्रास देणार नाही.

आपणच सांगितल्याप्रमाणे मला हेही माहित आहे माऊली की, यासाठी भक्तिमार्गासारखा दुसरा सोपा मार्ग नाही. तेव्हा माऊली या पामराची हात जोडून नम्र विनंती आहे, हट्टच आहे म्हणा या अजाण बालकांचा की, आपल्या कृपेने आपल्याप्रती असलेला माझ्यातला भक्तिभाव एवढा बळकट व्हावा की, त्याच्यावर कोणत्याही संगतीचा, विकारांचा किंवा अहंकाराचा किंवा तत्कालीन परिस्थितीचा यत्किंचितही परिणाम होणार नाही. सदासर्वकाळ तुमच्या आणि परब्रह्म परमात्मा पांडुरंगाच्या चरणीच मी लीन व्हावे. ऐसी बळकट भक्तिचा लाभ मला होऊ द्या माऊली. कारण...

**भाव भोळा तुज । अर्पिला निष्ठेने ।।**
**झालो निश्चिंतीने । दास तुझा ।।२।।**

खरच मी अडाणी, अज्ञानी बालक आहे. मला अध्यात्म, परमार्थ, योग यातलं काही काही कळत नाही. साधा, सरळमार्गी चालणारा मी एक संसारी माणूस आहे. **तुमच्या कृपेने फक्त हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा । पुण्याची गणना कोणी करी ।।** या पलीकडे काहीच येतही नाही आणि समजतही नाही. पण आपल्या हरि मुखे म्हणावर मात्र माझा दृढ भाव आणि नितांत श्रद्धा आहे.

डोळे मिटले तरी तुमचंच रूप आणि त्याच्या ठायी विठ्ठलाचं रूप दिसतं आणि डोळे उघडले तरी तुमच्या दोघातलं अद्वैत रूपच दिसतं. मग मी त्यालाच आत्मरूप समजतो. हाच माझा भोळा भाव आहे माऊली आणि तोच मी अत्यंत निष्ठेने श्रध्दापूर्वक तुमच्या चरणी अर्पण केला आणि मी निश्चिंत झालो, आणि संसारी तापापासून मुक्त झालो.

खरोखरच मी भाग्यवान आहे माऊली कारण 'मी' आणि 'माझं' सर्वस्व तुमच्या चरणी अर्पण केलं आणि मी आज तुमचा दास झालो. तुमचं दास्यत्व लाभलं यासारखं दुसरं भाग्य ते काय माऊली? **सद्गुरू सारिखा असता पाठीराखा। इतरांचा लेखा कोण करी।।**

माऊली तमच्यासारखी आई, सद्गुरू लाभल्यावर मी फुकाची चिंता का करू? हाती चिंतामणी आल्यावर कोणत्या चिंतेला तिथे थारा मिळेल? आपल्या कृपेच्या कल्पवृक्षाची छया लाभल्यावर मनाची कल्पना शक्ती खुंटणार नाही तर काय? म्हणून माऊली भोळा भाव माझा मी निष्ठेने आपल्याला अर्पण केला आणि निश्चिंतीने तुमच्या चरणांचा दास झालो. (क्रमशः)




## ऑपरेशन सिंदूर..!

पहलगामच्या सावल्या जेव्हा रक्तरंग
घेऊन आल्या.. नभ गेला गहिरेपणात
जणू व्यथा ताऱ्यांनी सांगितल्या...
दहशतीच्या काळोखावर आक्रोशाचा
सूर उमटला.. सैनिकांच्या छातीतून
तेव्हा शौर्याचा सूर्य पेटला...
वायुसेनेच्या पंखावरती न्यायाची वीज
वाजली.. शौर्यगाथेच्या झंकारांनी
रणभूमी दुमदुमू लागली...
नऊ ठिकाणी ठिणग्यांची निःशब्द
वज्रपात झाली.. अंधाराच्या गर्भात
ज्वालांची कुसुमे फुलली...
सिंदूर म्हणजे सौंदर्य निखळ तो
तेजाचा रक्षणगंध.. ज्यांनी पुसायचं
केला प्रयत्न तिथे पेटला रणसंघ...
ही लढाई सीमांची नाही अस्मितेची
साक्ष आहे.. प्रत्येक थेंबात श्रद्धा
आणि प्रत्येक श्वासात धग आहे...
जो पुन्हा उघडेल डोळा त्याच्यावर
होईल वज्रप्रहार सिंदूर आता सौंदर्य
नसून तो झाला रणधार...
ही गाथा विसरणे नाही ती काळाच्या
नभी कोरली.. ऑपरेशन सिंदूर कथा
नाही ती वीरता अमर ठरली...

ज्योती चव्हाण

## रात्र

अवचित सुटतो वारा भिजलेला चंद्र
डोहात झाडातून गळती पाने
वाहती संथ ओढ्यात. भवताली मंद
धुक्याचे चांदण्यात विणले जाळे रानात
शोधण्या तुजला भिरभिरती माझे डोळे.
त्या वळणावर वाटेच्या
तू पाहशी वळूनी मागे आभास एक
हलकासा अडकून राहिले धागे.
तांबूस चंद्र मावळता बघ गेला
क्षितिजाखाली रेंगाळत मनात
राही स्वप्नात रात्र सरलेली.

डॉ. रमेश जलतारे

# पन्नास पिढ्यांचा युद्ध वारसा



नोंद

**प्रतिनिधी**

भारत व पाकिस्तान यांच्यात संघर्ष सुरू झाल्यावर डोनाल्ड ट्रम्प यांनी आश्चर्यकारकरित्या एक शहाणपणाचे विधान केले. भारत आणि पाकिस्तान हे हजार वर्षे लढत असून त्यांचे ते आपसात पाहून घेतील, असा त्यांच्या बोलण्याचा अर्थ होता. त्यावेळी त्यांच्या या वक्तव्याची बरीच चेष्टाही केली गेली. परंतु, त्याच्या नकळतपणे ते सत्य बोलून गेले. कारण, या युद्धाला पाक लष्कर प्रमुख असीम मुनीर यांचे जे भाषण झाले, त्यात त्यांनी हीच भूमिका मांडली होती. 'हिंदू आणि मुस्लीम हे एकमेकांपासून पूर्णपणे भिन्न असून, ते एकत्र राहू शकत नाहीत,' या फाळणीच्या द्विराष्ट्रवादाच्या सैद्धांतिक पायाची त्यांनी आठवण करून दिली. आपल्या पुढच्या पिढीलाही या ऐतिहासिक वारशाची आठवण करून देण्याचे त्यांनी आवाहन केले. त्याचेच व्यवहारिक प्रतिबिंब म्हणजे पहलगाममध्ये धर्म विचारून दहशतवाद्यांनी केलेल्या केवळ पुरुषांच्या हत्या. त्यामागे कोणताही स्त्रीदाक्षिण्यवादी विचार नसून, पुरुष गेल्यावर महिला आमच्या जनानखान्यात राहू शकतात, हा घृणास्पद विचारही दडलेला आहे.

३०-४० वर्षांपूर्वी काश्मीरमध्ये 'हमे चाहिऐ आजादी काश्मिरी पंडितों के बिना, लेकिन काश्मिरी पंडित महिलाओं के साथ' अशा घोषणा दिल्या जात होत्या किंवा भिंतीवर लिहिल्या जात होत्या. पण, गेल्या काही वर्षांत काश्मीरमधील परिस्थिती आमूलाग्र बदलली आहे. मात्र, पहलगामला जे नृशंस कृत्य झाले, ते त्याचेच विकृत एक रूप होते. म्हणूनच या कारवाईला 'ऑपरेशन सिंदूर' हे जे समर्पक नाव दिले गेले, ते कुंकवाचं सामर्थ्य काय असतं, याची त्या विकृत मनोवृत्तीला प्रचिती देणारे होते. आपल्या भाषणात असीम मुनीर हजार वर्षांच्या युद्धाची आठवणही करून देत होते. पाकिस्तानने आपल्या विविध क्षेपणास्त्रांनाही 'बाबर', 'घोरी', 'गझनी' अशी मुस्लीम आक्रमकांची नावे दिली आहेत. त्याचेही कारण ही हजार वर्षे लढण्याची मानसिकता त्यात आहे.

कारगील, पहलगाम हे सर्व काश्मीरला पुन्हा एकदा जगाच्या व्यासपीठावर आणण्याचे पाकिस्तानचे खेळ आहेत. उरीच्या नापाक हल्ल्यानंतर पाकवर केलेला 'सर्जिकल स्ट्राईक', बालाकोटच्या हल्ल्यानंतर केलेला 'एअर स्ट्राईक' आणि आता 'ऑपरेशन सिंदूर'च्या रूपाने भारताने दिलेले सडेतोड प्रत्युत्तर, ही चढत्या क्रमाने भारताने दिलेली प्रत्युत्तरे आहेत. 'ऑपरेशन सिंदूर' हा भारताच्या पाकिस्तान विषयक धोरणातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या टप्प्याचे महत्त्व कळण्याआधी १९७१ सालानंतर झालेल्या काही महत्त्वाच्या घटनांचा विचार केला पाहिजे.

**गेल्या हजार वर्षांत हिंदू समाजाने अनेक वेळा मानवतेचा व्यापक विचार करून हिंदू-मुस्लीम परस्परसंबंध सौहार्दपूर्ण करण्याचा प्रयत्न केला. परंतु, 'आपण या देशावर राज्य केले आहे,' या मानसिकतेतून बाहेर पडून जोवर मुस्लीम समाज सहअस्तित्वाच्या भावनेतून वागायला तयार होणार नाही, तोवर हा संघर्ष संपणारा नाही.**

मोरारजी देसाई पंतप्रधान असताना 'रॉ' या आपल्या गुप्तचर विभागाने कहुटा येथे पाकिस्तान अणुबॉम्ब बनविण्याच्या तयारीत आहे, अशी माहिती आणली होती व ते केंद्र उद्ध्वस्त करण्याची इस्रायलने तयारीही दाखविली होती. परंतु, मोरारजींनी त्याला नकार दिला व ती माहिती झिया यांच्यापर्यंत पोहोचू दिली. त्यावेळी जर ते केंद्र उद्ध्वस्त झाले असते, तर पुढचे दहशतवादी हल्ले करण्याचे धाडस पाकिस्तानला झाले नसते. त्यानंतर इंद्र कुमार गुजराल पंतप्रधान असताना, त्यांनी पाकिस्तानमधील 'रॉ' या गुप्तहेरखात्याची यंत्रणाच बंद करून टाकली. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना, भारत बलुचिस्तानच्या लढ्याला पाठिंबा देणार नाही, हे मान्य करून टाकले. असे भारताचे पंतप्रधान असताना मिळालेल्या मोकळ्या रानाचा फायदा पाकिस्तानने घेतला नसता तरच आश्चर्य! त्यामुळे गेली २५ वर्षे आम्ही अण्वस्त्रांचा उपयोग करू, अशी धमकी देत पाकिस्तान भारताला व जगाला ब्लॅकमेल करत आहे. हे सर्व घडण्यात भारताच्या नेतृत्वाचाही मोठा वाटा राहिला आहे. आता आपण अशा भावनिक व डावपेचात्मक ब्लॅकमेलिंगला बळी पडणार नाही, हे भारताने उरी, बालाकोट व 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने दाखवून दिले आहे.

पाकिस्तानची युद्धविरामाची याचना स्वीकारताना यापुढे दहशतवादी हल्ला झाला, तर ते भारताविरुद्धचे युद्ध मानले जाईल, असा भारताने इशारा दिला आहे. भारत जसा इशारा देतो तसा तो वागतो, हा आताचा अनुभव असल्याने जर पाकिस्तानने हा इशारा गांभीर्याने घेतला नाही, तर त्याची फळे पाकिस्तानला भोगावी लागतील. उरी हा एका ठिकाणावर हल्ला होता, बालाकोट हा पाकिस्तानची सीमा ओलांडून केलेला हवाई हल्ला होता, 'ऑपरेशन सिंदूर'ने हल्ल्याचे क्षेत्र अधिक व्यापक करून पाकव्याप्त काश्मीर सोबत पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील दहशतवाद्यांची केंद्रेदेखील उद्ध्वस्त केली. त्यानंतर पाकिस्तानने ड्रोन व अन्य हवाई साधनांनी प्रतिहल्ला करण्याचा प्रयत्न केला, त्याचा यशस्वी प्रतिकार केला व आपली संरक्षण क्षमता सिद्ध केली व पाकिस्तानच्या विविध शहरांतील संरक्षण व्यवस्थेवर प्रतिहल्ला करून आपली मारक क्षमताही दाखवून. भारताने पुढे हल्ला झाला तर ते युद्ध समजले जाईल, या इशाऱ्याचा अर्थ म्हणजे यापुढचा प्रतिहल्ला केवळ दहशतवाद्यांच्या तळापर्यंत मर्यादित राहणार नाही, तर त्यात संरक्षण व्यवस्थेचाही समावेश असेल. या संरक्षण व्यवस्थेवरील हल्ला म्हणजे, पाकिस्तानवर सत्ता गाजविणार्या लष्करी नेतृत्वावरचाच हल्ला! 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताच्या गुप्तहेर खात्याने मिळविलेल्या विश्वासार्ह माहितीपासून निश्चित केलेल्या ठिकाणांचा अचूक वेध घेण्याची भारतीय लष्कराची क्षमताही जगासमोर आली. त्यामुळे पुढच्या एकाच हल्ल्यात पाकिस्तानची आघात क्षमता नष्ट करण्याचा भारताचा प्रयत्न असेल, हे निश्चित!

याच बरोबर पाकिस्तानसोबतचा सिंधू नदीच्या पाण्यासंबंधीचा जलकरार संस्थगितीचा आपला दृष्टिकोनही भारताने स्पष्ट केला आहे. गेल्या हजार वर्षांत हिंदू समाजाने अनेक वेळा मानवतेचा व्यापक विचार करून हिंदू-मुस्लीम परस्परसंबंध सौहार्दपूर्ण करण्याचा प्रयत्न केला. परंतु, 'आपण या देशावर राज्य केले आहे,' या मानसिकतेतून बाहेर पडून जोवर मुस्लीम समाज सहअस्तित्वाच्या भावनेतून वागायला तयार होणार नाही, तोवर हा संघर्ष संपणारा नाही. धर्माच्या आधारे फाळणी होऊनही पाकिस्तान व बांगलादेश एकत्र राहू शकले नाहीत. आपल्याच धर्मबांधवांकडून जे अत्याचार झाले, त्यातून मुक्तता मिळविण्यासाठी बांगलादेशला भारताची मदत घ्यावी लागली. तोच बांगलादेश आता पुन्हा धर्मांध नेतृत्वाच्या मागे लागून पाकिस्तानप्रमाणे दिवाळखोरीची वाट चालू लागला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर, भारतातील मुस्लीम समाजाने आत्मचिंतन करणे आवश्यक आहे. पाकिस्तान, बांगलादेशप्रमाणे दिवाळखोरीच्या मार्गाने जायचे की हिंदू समाजासोबत प्रामाणिक सहअस्तित्वाच्या भावनेने राहून भारताच्या विकासयात्रेत सामील व्हायचे, हा त्यांच्यापुढचा पर्याय आहे. त्यासाठी गेल्या हजार वर्षांच्या परस्पर संघर्षाच्या इतिहासाशी फारकत घेऊन नव्या इतिहासाचे पान उघडावे लागेल. मोरारजी देसाई, इंद्र कुमार गुजराल, डॉ. मनमोहन सिंग यांच्यासारख्या नेतृत्वाचे दिवस आता संपले आहेत. शौर्य, संख्या, आर्थिक बळ अशा सर्वच क्षेत्रांत वरचढ असूनही, आजवर हिंदू नेतृत्वाचा मानसिक कमकुवतपणा हीच पाकिस्तानी नेतृत्वाची प्रमुख शक्ती होती. भारताचे नेतृत्व त्या कमकुवतपणातून बाहेर पडले आहे, हा नव्या संघर्षाचा इशारा आहे. आपला वरचष्मा असतानाही भारताने आपली शस्त्रे खाली ठेवली , याबद्दल अनेक जण नाराज आहेत. पण, हजार वर्षांचा संघर्ष अशा एखाद्या चकमकीने संपत नसतो. ती लढाई धैर्य, शक्ती, योग्य डावपेच आणि संयम या आधारे लढावी लागते. या सर्व गोष्टी आपल्यापाशी आहेत, हे भारताच्या राजकीय व लष्करी नेतृत्वाने सुसंघटितपणे सिद्ध केले आहे. ही या संघर्षातील महत्त्वाची उपलब्धी आहे.



# भारतासाठी 'भूषण'

**सध्या संविधानाचे अमृतमहोत्सवी वर्ष सुरू आहे. याच काळात न्यायमूर्ती भूषण गवई यांनी १४ मे रोजी भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. न्यायमूर्ती गवई हे भारताच्या संविधानाच्या सर्वोच्चतेवर विश्वास ठेवतात. त्यांच्या या ऐतिहासिक नियुक्तीमुळे महाराष्ट्राला अभिमान वाटतो. या सगळ्या पार्श्वभूमीवर गुणवान, कर्तृत्ववान व्यक्तीला देशाच्या सरन्यायाधीशपदी कार्य करण्याची संधी लाभणे, हीच संविधानाची महत्ता आहे. सरन्यायाधीश गवई हे केवळ महाराष्ट्रा साठी नव्हे तर भारतासाठी भूषण ठरले आहेत.**

गौरव

**प्रतिनिधी**

सध्या संविधानाचे अमृतमहोत्सवी वर्ष सुरू आहे. याच काळात न्यायमूर्ती भूषण गवई यांनी १४ मे रोजी भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान लिहले. समता, बंधुता आणि स्वातंत्र्य यांचा जयघोष केला. या जयघोषाला भारतीयत्व आणि देशनिष्ठेचे कोंदण दिले. या सगळ्या पार्श्वभूमीवर गुणवान, कर्तृत्ववान व्यक्तीला देशाच्या सरन्यायाधीशपदी कार्य करण्याची संधी लाभणे, हीच संविधानाची महत्ता आहे. अर्थात, त्यांनी सरन्यायाधीशपदाची शपथ घेणे, यात त्यांचे कर्तृत्व आणि न्यायिक क्षेत्रातील योगदान यांची भूमिका मोठी आहे. या त्यांच्या धवल यशाचे परिमाण शब्दात मांडणे अशक्य आहे.

'सब समाज को साथ लिए'चे सूत्र त्याचबरोबर पं. दीनदयाळ उपाध्याय यांची 'अंत्योदया'ची संकल्पना प्रत्यक्षात साकार होण्याचा सध्याचा काळ आहे. 'अंत्योदय' संकल्पनेचा संदर्भ यासाठी की, आज समाजविघात शक्ती देशामध्ये आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास समाजबांधवांना भडकवत असतात की, 'हा देश तुमचा नाही. या देशात तुमचा हिस्सा काय आहे?' या सगळ्या समाजविघातक व्यक्तींनी गवई यांचे कर्तृत्व पाहायलाच हवे. खरे तर आमच्या देशाच्या राष्ट्रपती अनुसूचित जमातीतील एक महिला आहेत, आमच्या देशाचे पंतप्रधान इतर मागासवर्गीय समाजाचे आहेत आणि हो, देशाचे सरन्यायाधीश हेसुद्धा बौद्ध समाजाचे आहेत. अर्थात, राष्ट्रपती, पंतप्रधान किंवा नुकतेच सरन्यायाधीश झालेले गवई यांनी कधीही स्वतःच्या जातीचे कार्ड खेळले नाही. या तिघांसाठीही त्यांचे काम, त्यांचा देश हेच महत्त्वाचे होते आणि आहे. आमचा देश संविधानावर चालतो. त्यामुळेच देशात जात, धर्म, लिंग यांच्यापलीकडे जाऊन गुणवत्तेनुसार माणसांची भूमिका ठरते. त्यामुळेच संविधानाची मूल्यता सिद्ध करत न्या. भूषण गवई यांचे सरन्यायाधीश होणे, हे अवघ्या भारतासाठी भूषणावह!

पर्यावरण

**मिलिंद बेंडाळे**

**महासागर सध्या ९० टक्के जागतिक उष्णता आणि सुमारे ३० टक्के कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतात. महासागरातील भौतिक आणि जैविक बदलांमुळे हे दर कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यकाळात वातावरणातील तापमानात वाढ होईल. परिणामी येत्या काळात परिसंस्थेच्या लवचीकतेत घट होऊन अन्नपुरवठा आणि उपजीविकेवर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे.**

# सागरातील बदलांचा जीवसृष्टीवरील परिणाम



मानवजात पूर्णपणे महासागरांवर अवलंबून आहे. आपल्या अनेक महान संस्कृतींचा विकास महासागरांच्या किनाऱ्यावर झाला आहे. आज आपण आपल्या आर्थिक, सामाजिक आणि भौतिक कल्याणासाठी महासागरावर अधिक अवलंबून आहोत. जागतिक व्यापारापासून पर्यटनापर्यंत सागरी क्रियाकलाप वार्षिक ३० ट्रिलियन डॉलरपेक्षा अधिक रकमेची उलाढाल करतात. 'ओशन इकॉनॉमी' ही जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था आहे.

पाणबुडीच्या केबल्सपासून शिपिंग, मत्स्यपालन आणि मत्स्यपालनापर्यंत आपण निळ्या अर्थव्यवस्थेवर अधिकाधिक अवलंबून राहात आहोत. आपण खात असलेल्या प्राणी प्रथिनांपैकी २० टक्के समुद्री माशांपासून येतात; परंतु गेल्या शतकात महासागर नाटकीयरीत्या बदलत असून भविष्यात आणखी बदल घडू शकतात. आज मानवता सामाजिक, राजकीय, पर्यावरणीय आणि वैज्ञानिक बदलांच्या केंद्रस्थानी आहे. समुद्राचे निरीक्षण करण्याची, मॉडेल करण्याची आणि समजून घेण्याची आपली क्षमता अलिकडच्या वर्षांमध्ये प्रचंड वाढली आहे; परंतु मानवी कल्याणावर लक्ष केंद्रित करणे आणि त्याचे सागरी प्रक्रियांवर अवलंबून राहणे हे एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकते.

आज समुद्राच्या तळाच्या प्रक्रियेद्वारे चाललेल्या हवामान बदलाच्या मोठ्या घटनांचा अंदाज घेण्याची आपली क्षमता सुधारणे आवश्यक आहे. सागरी भूकंप, त्सुनामी, चक्रीवादळ आणि वादळामुळे मानवी कल्याणाला गंभीर धोका निर्माण होतो. आज या घटनांचे निरीक्षण करण्याची, समजून घेण्याची आणि भाकित करण्याची क्षमता सुधारणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. महासागर संशोधन आणि मूलभूत अभ्यासासाठी सतत निधी मिळणे आवश्यक आहे. महासागर विज्ञान पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीवर अवलंबून असते. आपण उदयोन्मुख तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि विद्यमान महासागर पायाभूत सुविधांचा विस्तारित वापर एकत्र केला पाहिजे. यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य आवश्यक आहे, कारण यापैकी काही आव्हाने प्रत्यक्षात स्थानिक आहेत. तात्कालिक समस्यांकडे लक्ष देण्याची गरज असली, तरी गंभीर संशोधनासाठी आपली वचनबद्धता महासागरातील जटिल बदलांचे व्यवस्थापन करण्याची क्षमता निश्चित करते. त्यामुळे सामूहिक कृती आवश्यक आहे. त्यासाठी संशोधन संस्थांनी आपला दृष्टिकोन बदलायला हवा. धोरणकर्त्यांनी दीर्घकालीन तपासाला महत्त्व देणारी चौकट तयार करायला हवी. हंपबॅक व्हेल दरवर्षी आग्नेय पॅसिफिक महासागर ओलांडून एक लांब आणि आव्हानात्मक प्रवास करतात. ते अन्नासाठी मध्य आणि दक्षिण अमेरिकेपासून अंटार्क्टिकापर्यंत सुमारे १० हजार किलोमीटरचा प्रवास करतात.

नवीन संशोधनात दिसून आले आहे की, व्हेल त्यांच्या स्थलांतराची वेळ निश्चित करण्यासाठी पर्यावरण आणि समुद्राच्या परिस्थितीतील बदलांच्या त्यांच्या भूतकाळातील आठवणी वापरतात; पण हवामानात बदल होत असताना, सागरी परिस्थिती झपाट्याने बदलत असल्याने ही रणनीती तितकी प्रभावी ठरणार नाही, अशी शास्त्रज्ञांची चिंता आहे. मध्यंतरी मॅकगिल विद्यापीठाशी संबंधित शास्त्रज्ञांच्या नेतृत्वाखाली एक अभ्यास करण्यात आला. या अभ्यासात २००९ ते २०१६ दरम्यानचा 'सॅटेलाईट ट्रॅकिंग डेटा' वापरला. या कालावधीत कोस्टा रिका, पनामा आणि इक्वाडोरजवळ ४२ टॅग केलेल्या व्हेलचा मागोवा घेण्यात आला. अंटार्क्टिका ओलांडून दक्षिणेकडे त्यांच्या हालचालींचे अनुसरण करून शास्त्रज्ञांना समजून घ्यायचे होते की, व्हेलला दरवर्षी स्थलांतर कधी करायचे हे ठरवण्यासाठी कोणते संकेत मदत करतात. या अभ्यासाचे निष्कर्ष 'सायंटिफिक रिपोर्ट्स जर्नल'मध्ये प्रकाशित करण्यात आले आहेत. अभ्यासात असे दिसून आले आहे की, व्हेल समुद्राचे तापमान आणि अन्न उपलब्धता यासारख्या स्थानिक संकेतांकडे लक्ष देतात. हवामान बदलामुळे महासागरातील आवाज पाच पटीने वाढू शकतो, सागरी जीवांना त्याचा फटका सहन करावा लागतो. त्यांच्या स्मृती आणि विद्यमान संकेतांच्या मदतीने ते लांबचा प्रवास कधी सुरू करायचा हे ठरवतात.

दक्षिण महासागरात त्यांचे मुख्य अन्न केव्हा मुबलक असेल हे निर्धारित करण्यात ही माहिती त्यांना मदत करते. क्रिल हा एक लहान क्रस्टेशियन प्राणी आहे. तो अंटार्क्टिकामधील व्हेलचे मुख्य अन्न आहे. दर वर्षी, एका विशिष्ट हंगामात क्रिलची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. यासंदर्भात या अभ्यासाशी संबंधित प्रमुख संशोधक प्रा. व्हर्जिनी मिलियन यांनी म्हटले आहे की, त्याला त्याच्या मुक्कामाची योग्य वेळ ठरवण्यास मदत होते. त्यामुळे ते अगदी त्याच वेळी पोहोचतात, जेव्हा त्यांचे अन्न मुबलक असते. व्हेल मासे हवामानातील बदलांशी जुळवून घेऊ शकत नाहीत. हजारो वर्षांपासून व्हेल या वेळेची पद्धत वापरून स्थलांतर करीत आहेत; मात्र हवामानातील बदलांमुळे हे अवघड होत आहे. गरम होणारे महासागर आणि समुद्रातील बर्फातील बदल क्रिलच्या वाढीच्या वेळेवर परिणाम करीत आहेत. व्हेल या बदलांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करीत असले, तरी असमर्थ ठरत आहेत.

२०१६ पासूनचे प्रत्येक वर्ष अधिकाधिक उष्ण ठरत आहे. प्रकाश प्रदूषणामुळे सागरी जीवांच्या पुनरुत्पादक आणि हार्मोनल चक्रात अडथळा निर्माण होत आहे. नर आणि मादी व्हेल वेगवेगळ्या प्रकारे स्थलांतर करतात, असेही या अभ्यासातून समोर आले आहे. नर हंपबॅक व्हेल जलद प्रवास करतात आणि सरळ मार्ग घेतात. दुसरीकडे मादी, विशेषतः संतती असलेल्या, भक्षक टाळण्यासाठी आणि विश्रांतीसाठी वेळ मिळावा यासाठी लांब किनारी मार्ग स्वीकारतात. शास्त्रज्ञांच्या मते व्हेलचे स्थलांतर मार्ग आणि खाद्य क्षेत्रांचे संरक्षण अत्यावश्यक आहे.

किनारपट्टीवरील जहाजांची वाहतूक वाढत जाते, तसतसे व्हेल माशांपुढील धोकेहीवाढतात. अशा वेळी व्हेल माशांची जहाजांशी टक्कर होणे आणि स्थलांतराच्या मार्गात अडथळा येणे यामुळे या प्राण्यांची संख्या कमी होते. व्हेल समुद्राला निरोगी ठेवण्यास मदत करतात. ते सागरी परिसंस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहेत. ते खाऊन कचरा उत्सर्जित करतात, तेव्हा पाण्याद्वारे महत्त्वपूर्ण पोषक तत्त्वांचे वितरण करण्यास मदत करतात. हे 'फायटोप्लँक्टन'सारख्या लहान वनस्पतींना वाढण्यास मदत करते. या वनस्पती कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतात आणि ऑक्सिजन सोडतात. हे सागरी अन्न साखळीला समर्थन देते आणि जमिनीवरील हवामानावरदेखील परिणाम करते. व्हेल शार्कसाठी शिपिंग हा मोठा धोका आहे.

व्हेल त्यांच्यावर अवलंबून असलेल्या इतर सागरी प्राण्यांसाठी अन्नाच्या नवीन संधी निर्माण करतात. म्हणजे त्यांचे अस्तित्व जैवविविधतेलाही प्रोत्साहन देते. दुसरीकडे व्हेल नामशेष झाल्यास समुद्राची उत्पादकताही कमी होईल. अशा परिस्थितीत संशोधकांनी हंपबॅक व्हेलचे खाद्य क्षेत्र आणि स्थलांतर मार्गांच्या संरक्षणावर भर दिला आहे.

विशेषतः हवामान वेगाने आणि सतत बदलत असताना हे केले जात आहे. शास्त्रज्ञांच्या मते या भागांच्या संरक्षणामुळे व्हेललाच फायदा होणार नाही, तर संपूर्ण सागरी अन्नसाखळीलाही आधार मिळेल. सतत हवामान बदल आणि शक्तिशाली 'एल निनो' इव्हेंटचा परिणाम जागतिक स्तरावर, विशेषतः होनोलुलूसारख्या बेट शहरांसाठी किनारपट्टीवरील समुदायांसाठी धोक्याची घंटा आहे. येथे वाढत्या महासागरांनी वास्तविक तत्काळ धोका निर्माण केला आहे. हा केवळ नजीकच्या काळातला धोका नाही, तर सध्याचे वास्तव आहे, जे अनेक लोकांचे दैनंदिन जीवन बदलत आहे. समुद्रसपाटीपासूनची उंची मोजण्यासाठी शास्त्रज्ञ अनेक आधुनिक साधने वापरतात. उपग्रहांवरील विशेष उपकरणे समुद्रात मायक्रोवेव्ह सिग्नल पाठवतात आणि सिग्नल परत येण्यासाठी किती वेळ लागतो हे मोजतात.

गेल्या ३० वर्षांमधील उपग्रह निरीक्षणांनी एक स्पष्ट चित्र रंगवले आहे. १९९३ पासून जागतिक सरासरी समुद्रपातळीमध्ये तब्बल ४ इंच वाढ झाली आहे. सर्वात वाईट बाब म्हणजे या वाढीचा वेग अधिक आहे. १९९३ पर्यंत समुद्राची पातळी दरवर्षी सुमारे ०.०७ इंच वाढत होती. आता वार्षिक वाढ दुप्पट झाली आहे. २०५० पर्यंत जागतिक सरासरी समुद्रपातळीत आणखी २० सेंटीमीटर वाढ होण्याच्या मार्गावर आहे. त्याचा परिणाम समुद्री जीवावर होऊ शकतो. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)